


रायगड, शनिवार, दि. २१ मार्च २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

सी साईट रिसॉर्ट (नागांव)
कुक, वेटर व हाऊसकिपींग स्टाफ पाहिजे
संपर्क : ९४२२८५६३३६ ७३८५९६५८८५

## वेधक

### खालापुरात खाद्यतेल तस्करीचा पर्दाफाश

**खोपोली :** खालापूर तालुक्यातील कुंभिवली परिसरात सुरू असलेल्या खाद्य तेलाच्या अवैध तस्करीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. स्थानिक नागरिकांच्या तक्रारीमुळे ही कारवाई शक्य झाली असून, घटनास्थळावरून तेलाने भरलेले व रिकामे डबे तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी अवैध धंद्यांविरोधात कडक भूमिका घेतल्याने काही काळ हे प्रकार थांबले होते. मात्र, कुंभिवली गावाच्या हद्दीत निर्जन भागात रात्रीच्या वेळी पुन्हा खाद्य तेलाचा काळाबाजार सुरू असल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाली होती. या पार्श्वभूमीवर स्थानिक तरुणांनी पुढाकार घेत पोलिसांना माहिती दिली. त्यानुसार खालापूर पान २ वर

### ‘भाकरी सेंटर’मुळे महसूल धोक्यात

**उरण :** उरण नगरपरिषद हद्दीत नगरपालिका मालकीच्या जागांवर बेकायदेशीर अतिक्रमणांचे प्रमाण वाढत असून, सरकारी जागांवर परवानगीशिवाय व्यवसाय सुरू असल्याचे प्रकार समोर येत आहेत. विशेषतः मुख्य मार्गावरील सरकारी दवाखान्याच्या जागेत अनधिकृत ‘भाकरी सेंटर’ सुरू असल्याने हा मुद्दा चर्चेत आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, जुन्या दवाखान्याची इमारत पाडल्यानंतर उभारलेल्या शेडमध्ये कोणतीही अधिकृत परवानगी न घेता चुली लावून भाकरी भाजून विक्री केली जात आहे. मात्र, हा प्रकार एकटाच नसून शहरातील इतरही अनेक नगरपालिका जागांवर अशाच प्रकारे अतिक्रमण करून व्यवसाय सुरू असल्याचे पान २ वर

### वेबसाईटवरील ओळख महागात

**पनवेल :** लग्नासाठी वापरण्यात येणाऱ्या वेबसाईटवरून ओळख वाढवत विश्वास संपादन करून एका ३८ वर्षीय महिलेची तब्बल १० लाख ४० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना पनवेलमध्ये उघडकीस आली आहे. या प्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहितीनुसार, संबंधित महिलेच्या पतीचे निधन झाल्यानंतर त्यांनी दुसऱ्या विवाहासाठी एका मॅट्रिमोनियल वेबसाईटवर नोंदणी केली होती. यावेळी स्वतःला ‘अमन सिंग’ असे सांगणाऱ्या इसमाने यूकेहून बोलत असल्याचे भासवून महिलेचा विश्वास संपादन केला. व्हॉट्सॲपद्वारे संवाद वाढवत त्याने पान २ वर

## महाडमध्ये चवदार तळे सत्याग्रह दिन उत्साहात

# 55 कोटींची विकासकामे

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

| महाड | प्रतिनिधी |

दलितोद्धार चळवळीतील ऐतिहासिक टप्पा ठरलेल्या महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाला आज ९९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर महाड येथे शुक्रवारी (दि. २०) कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चवदार तळे सुशोभीकरण आणि जलशुद्धीकरण प्रकल्पाचं भूमीपूजन करण्यात आलं. या कामासाठी राज्य शासनाकडून ५५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चवदार तळे सत्याग्रह हा केवळ पाण्यासाठीचा लढा नसून, समतेची क्रांती असल्याचं सांगितलं. समाजातील विषमता आणि जातिभेद दूर करण्यासाठी बाबासाहेबांनी उभारलेली ही चळवळ



ऐतिहासिक असल्याचं त्यांनी नमूद केले. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याचं आवाहन करत महाडमध्ये शिवसृष्टी आणि भीमसृष्टी उभारण्याची मागणी केली.

मंत्री भरत गोगावले यांनी आपल्या भाषणात पुढील वर्षी चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी मोठ्या प्रमाणावर साजरी करण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच महायुती सरकारच्या काळात शिवसृष्टी आणि भीमसृष्टी उभारण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली. आम्ही असे कार्यक्रम कधीच चुकवले नाहीत. त्यामुळे जनतेनं आम्हाला निवडून दिले, असेही ते म्हणाले. पुढील वर्षी चवदार तळ्याचं पाणी सर्वांसाठी पिण्यायोग्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मंत्री संजय शिरसाट यांनी दलित समाजाच्या शिक्षणासाठी १२०० कोटींचा निधी, समाजकल्याण विभागात ८८९ जणांना नोकऱ्या आणि भविष्यात वसतिगृह उभारण्याची घोषणा केली. पुढील वर्षीच्या शताब्दी सोहळ्याची पायाभरणी याच कार्यक्रमातून केली. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मंत्री संजय शिरसाट, मंत्री उदय सामंत, मंत्री भरत गोगावले, मंत्री अदिती तटकरे, खा. सुनील तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आचल दलाल आदी उपस्थित होते. पोलीस दलामार्फत बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली.

# पनवेलमध्ये तीव्र पाणीटंचाई

## नवीन बांधकाम परवानग्या स्थगित करण्याची मागणी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी नवीन बांधकामांना परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्याची मागणी आयुक्तांकडे केली आहे.




निवेदनात कळंबोली, नवीन पनवेल, कामोठे, खारघर, तळोजा आणि नावडे या भागांमध्ये गंभीर पाणीटंचाई निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून वारंवार होणाऱ्या शटडाऊनमुळे परिस्थिती अधिकच बिकट होत असून, अनेक ठिकाणी अत्यल्प दाबाने पाणीपुरवठा होत असल्याचे सांगण्यात आले. काही रहिवासी संस्थांमध्ये तर पाणीच पोहोचत नसल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. यामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना जलस्रोत आणि वितरण व्यवस्थेत आवश्यक वाढ झालेली नसल्याने ही समस्या अधिक गंभीर बनत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत नवीन बांधकामांना परवानगी देऊ नये, तसेच संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# ‘एचसीसी’चा कारभार, परवानगीशिवाय बांधकाम



**नियम धाब्यावर, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार**

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील सावली आणि टोकेखार परिसरात नियम धाब्यावर बसवून अनधिकृत बांधकाम सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनी या नामांकित कंपनीने कोणतीही शासकीय परवानगी न घेता शेतजमिनीत थेट दोन मजली इमारतीचे बांधकाम सुरू केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते महेश जानू ठाकूर यांनी केला आहे.

सावली आणि टोकेखार येथील शेतजमिनीवर (गट नं. १२३ आणि ३२) सध्या आगरदांडा क्रीक ब्रिज प्रोजेक्टचे काम सुरू आहे. या प्रकल्पाच्या नावाखाली एचसीसी कंपनीने प्रशासनाची पान २ वर

### स्थानिक नागरिकांचा संताप

सामान्य माणसाला साध्या बांधकामासाठी सर्व परवानग्यांची अट घातली जाते, मग एवढ्या मोठ्या कंपनीला नियम लागू नाहीत का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे. या बेकायदेशीर बांधकामामुळे शासनाचा महसूल बुडत असल्याचेही अर्जात नमूद करण्यात आले आहे.

# व्यावसायिक सिलिंडर ४५०० हजार रुपयांना

| उरण | प्रतिनिधी |

उरणमध्ये व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या टंचाईमुळे हॉटेल व्यवसाय अडचणीत सापडला असून, काळाबाजारही वाढल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. सुमारे १९०० रुपयांचा सिलिंडर काळ्या बाजारात ४००० ते ४५०० रुपयांना विकला जात असल्याची माहिती समोर आली आहे. गॅसअभावी अनेक हॉटेल्समध्ये स्वयंपाक ठप्प झाला असून, काहींनी तात्पुरते व्यवसाय बंद केला आहे. दरम्यान, प्रशासनाकडून टंचाई नसल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात बाजारात वेगळीच परिस्थिती असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## ‘उमटे’चा गाळ काढण्यासाठी

# ठेकेदारच सापडेना?

## प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह



| अलिबाग | प्रतिनिधी |

उमटे धरणाच्या गाळ काढण्याच्या प्रश्नावर शासन आणि प्रशासनाची उदासीनता पुन्हा एकदा उघड झाली असून, ठेकेदार मिळत नसल्याच्या कारणावरून काम रखडल्याने ७७ गावांतील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर उमटे धरण संघर्ष ग्रुपचे ॲड. राकेश पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देत प्रशासनाच्या कारभारावर तीव्र टीका केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, उमटे धरणावर अवलंबून असलेल्या ७७ गावांतील नागरिकांच्या शुद्ध पिण्याच्या पाण्याचे स्वप्न धोक्यात आले आहे. धरणाच्या संरक्षण भिंतींची दुरुस्ती आणि साचलेला गाळ काढण्याचे काम ठेकेदार न मिळाल्यामुळे पूर्णपणे ठप्प झाले आहे. त्यामुळे गाळमिश्रित पाणी पिण्याची वेळ नागरिकांवर पुन्हा ओढवली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या कामासाठी पान २ वर

> उमटे धरणाचा गाळ काढण्यासाठी शासनाची भूमिका पूर्णतः फसवी आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या धरणासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने निविदा काढणे हीच विसंगती आहे. एकही पात्र ठेकेदार मिळत नसेल, तर शासनाने निविदेच्या अटी व शर्ती बदलून काम मार्गी लावावे. चवदार तळ्याच्या ऐतिहासिक संघर्षाला शंभरी जवळ आली, तरी आजही पाण्याचा प्रश्न सुटत नसेल, तर हे सरकारचे अपयशच म्हणावे लागेल.
>
> – ॲड. राकेश पाटील, उमटे धरण संघर्ष ग्रुप

# रुपाली चाकणकरांचा राजीनामा घ्या

## शेतकरी कामगार पक्षाची मागणी

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

नाशिकमधील महिला अत्याचारातील आरोपी अशोक खरात (कॅप्टन) प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरले आहे. या प्रकरणाने महिला सुरक्षा, प्रशासनाची भूमिका आणि राजकीय जबाबदारी यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. अशोक खरात यांच्याशी संबंधित गंभीर आरोपांमुळे सामाजिक संताप उसळला आहे. अशातच अशोक खरात या भोंदूबाबाने स्थापन केलेल्या श्री शिवनिका संस्थान या मंदिराच्या विश्वस्त पदावर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. परिणामी, अत्याचाराच्या संवेदनशील प्रकरणात महिला आयोगाची भूमिका निष्क्रिय असल्याचे समोर



येत आहे. त्यामुळे अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अथवा सरकारने त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडावे, अशी मागणी शेकापच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केली आहे.

मागची काही प्रकरणे पाहता चाकणकर यांनी महिलांना न्याय मिळावा, यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली असल्याचे दिसत नाही. त्यामुळे न्याय नसेल तर पदावर राहण्याचा पान २ वर

### भोंदूबाबा खरातची कुंडली उघड

**मुंबई :** भोंदूबाबा अशोक खरातचे एक पाठोपाठ एक कारनामे उघड होऊ लागले आहेत. या खरातने १०० हून अधिक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा दावा केला जात आहे. उच्चभ्रू आणि सेलिब्रिटींचा सतत गराडा असणाऱ्या अशोक खरात ५०० कोटींचा मालक असल्याचे समोर आले आहे. भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरातच्या लैंगिक शोषणाच्या व्हिडिओने महाराष्ट्र हादरला आहे. याप्रकरणी नाशिक पोलिसांनी भोंदूबाबाला अटक केली आहे. पान २ वर

> भोंदू बाबाच्या आहारी जाऊन त्यांना बळकट करण्याचे काम रुपाली चाकणकर यांनी केले आहे, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत महिला दिनाच्या कार्यक्रमात नुकतेच त्यांनी पुरोगामी विचार मांडत पोथ्या-पुराणे बंद करून सासरी जाणाऱ्या मुलीच्या हाती संविधानाची प्रत द्या, असे सांगितले. मात्र, प्रत्यक्षात विरोधाभासी भूमिका घेत असल्याने भोंदूबाबापेक्षाही त्या भोंदू आहेत, असे वाटते. त्यांचा तात्काळ राजीनामा घेणे क्रमप्राप्त आहे. तसेच महिला आयोगात सर्वपक्षीय महिलांना सदस्यत्व देण्यात यावे.
>
> – ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख

**संवर्धनाची अद्याप प्रतीक्षाच | शिवरायांनी टेहळणीसाठी उभारला होता गड**


# सामराजगडाचे अस्तित्व धोक्यात

सुधीर नाझरे

| मुरुड-जंजिरा |

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यात एकदरा गावाजवळ वसलेला सामराजगड हा शिवकालीन दुर्ग आजही इतिहासाच्या साक्षीने उभा असला, तरी दुर्लक्षामुळे हळूहळू अस्तित्व गमावत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जंजिरा मोहिमेदरम्यान टेहळणीसाठी उभारलेला हा गड सध्या संवर्धनाच्या प्रतीक्षेत असून, त्याचे बुरुज व तटबंदी मोठ्या प्रमाणात नष्ट झाले आहेत.

मुरुडच्या दक्षिणेस सुमारे ८० मीटर उंचीवर असलेला हा गड धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत



महत्त्वाचा मानला जातो. येथून जंजिरा किल्ला, पद्मदुर्ग किल्ला, राजपुरी खाडी तसेच अरबी समुद्राचा विस्तीर्ण परिसर नजरेत ठेवता येतो. मराठा आरमारासाठी आणि सिद्दींच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी या गडाचा प्रभावी वापर होत असे.

इतिहासाच्या नोंदीनुसार, जंजिरा जिंकण्याच्या मोहिमेदरम्यान या गडाची उभारणी करण्यात आली असावी. काही इतिहासकारांच्या मते, १६५९ ते १६६१ दरम्यानच्या मोहिमांमध्ये या गडाची निर्मिती झाली. शामराज निळकंठ या पेशव्यांच्या नावावरून ‘सामराजगड’ हे नाव पडल्याचीही पान २ वर




# शेतकऱ्यांची मालकी संकटात

## दुरुस्तीच्या नावाखाली लाखो शेतकऱ्यांच्या जमीन उताऱ्यात बदल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शुद्धलेखनातील चुका दुरुस्तीच्या नावाखाली राज्यातील तब्बल दीड लाख शेतकऱ्यांच्या जमिनींच्या उताऱ्यामध्ये परस्पर बदल करण्यात आला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कबुली दिली आहे. राज्याच्या महसूल विभागातील सर्वात मोठा सातबारा उतारा घोटाळा असल्याची चर्चा सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा सातबारा धोक्यात आला असून, मालकी संकटात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ चा वापर प्रामुख्याने ७/१२ उताऱ्यावरील टायपिंगच्या चुका किंवा शुद्धलेखन दुरुस्त

**● महसूलमंत्र्यांची विधान परिषदेमध्ये कबुली**

करण्यासाठी केला जातो. मात्र, महसूल विभागातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी या कलमाचा आधार घेऊन शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मालकी हक्कातच परस्पर बदल केल्याची माहिती समोर येत आहे. त्यामध्ये जमिनीचे क्षेत्रफळ कमी-जास्त केले.

अनेकांची नावे ७/१२ वरून बेकायदेशीरपणे वगळण्यात आली आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी हे मान्य केले की, पुणे जिल्ह्यासह राज्याच्या अनेक भागांत हा गंभीर प्रकार घडला आहे. मंत्र्यांनी स्पष्ट केले की, हा महसूल खात्याच्या इतिहासातील सर्वात मोठा घोटाळा असून, यामध्ये १ ते १.५ लाख शेतकरी भरडले गेले आहेत. या घोटाळ्याची व्याप्ती पाहता सरकारने कठोर पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत. या प्रकरणात सामील असलेल्या महसूल अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कलम १५५ चा गैरवापर करून जे चुकीचे फेरफार झाले आहेत, ते सर्व आदेश रद्द करून ७/१२ पुन्हा मूळ स्थितीत आणले जातील. प्रवीण घेडा समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, त्यानुसार कारवाई सुरू करण्यात आली आहे. शुद्धलेखन दुरुस्तीच्या नावाखाली मालकी हक्क बदलणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. कितीही मोठा अधिकारी असला तरी त्याला सोडले जाणार नाही. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

दुरुस्तीच्या नावाखाली राज्यातील शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यामध्ये परस्पर बदल करण्याचा घोटाळा सुरु झाला असल्याची चर्चा आहे. सातबाऱ्यासह शेतावरील असलेली मालकी शेतकऱ्यांची संकटात येण्याची भीती आहे. त्यामुळे राज्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सातबारा उताऱ्यावरील नोंद खात्री करून घ्यावी, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून करण्यात येत आहे.

# ‘कमळ’चा व्यवसाय एक हजार कोटींच्यावर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील कमळ नागरी सहकारी पतसंस्थेने २२७ कोटींच्या व्यवसायासह एकत्रित एक हजार कोटींचा टप्पा पार केला. बचत गट, मध्यम मुदत कर्ज अशा वेगवेगळ्या घटकांसाठी कर्ज योजना राबवून शेवटच्या घटकाला आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न कमळ नागरी पतसंस्थेने केले आहे. जिल्हास्तरिय कार्यक्षेत्र असणाऱ्या पतसंस्थांमध्ये कमळ नागरी सहकारी पतसंस्थेने अग्रक्रम मिळविला आहे, असे कमळ नागरी पतसंस्थेचे संस्थापक गिरीश तुळपुळे यांनी सांगितले.

यावेळी पतसंस्थेचे चेअरमन मधुकर चाळके, माजी चेअरमन सतिशचंद्र पाटील, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थे एक हजार ६ कोटींचा व्यवसाय टप्पा पार केला. अलिबागच्या मध्यवर्ती भागात जागा खरेदी केली. २१ मार्चला या नूतन जागेत धार्मिक विधी तसेच कमळ परिवार मेळावा, सहकार स्वरसंध्या हा भावगीतांचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. यानिमित्ताने पत्रकारांशी संवाद साधत असताना ते बुधवारी (दि.१८) बोलत होते.

यावेळी कमळ नागरी पतसंस्थेचे चेअरमन नंदकुमार चाळके व संस्थापक गिरीश तुळपुळे यांनी सांगितले की, कमळ नागरी पतसंस्थेची स्थापना ४ एप्रिल १९९२ मध्ये झाली. आज पतसंस्थेला ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. किरकोळ स्वरुपात भांडवल असलेल्या पतसंस्थेने प्रगतीशील मार्गावर टप्पा पार केला. सुरुवातीच्या कालावधीत ३१ हजारहून अधिक ठेवी होत्या. १९९२ मध्ये ६० लाखाचा एकत्रित व्यवसाय होता. पाच वर्षात तो सहा कोटींच्यावर पोहोचला.२००३ मध्ये ३३ कोटी २९ लाख रुपये, २०२३ मध्ये हा टप्पा ५३१ कोटींच्यावर गेला. २०२५-२०२६ मध्ये एक हजार ३ कोटीपेक्षा अधिक व्यावसायिक टप्पा पार करण्यात पतसंस्थेला यश आले आहे. रायगड जिल्ह्यात एक मुख्यालय व १६ शाखा आहेत. पतसंस्थेमध्ये १२४ अधिकारी व कर्मचारी काम करीत आहेत.

रायगड जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती आहेत. पतसंस्था ७७६ ग्रामपंचायतींपर्यंत पोहोचली असून, एक हजार ९४९ पैकी एक हजार ३०० वाड्यांपर्यंत पोहोचण्यास पतसंस्थेला यश आले आहे. कमळ नागरी पतसंस्थेचा स्वनिधी ५० कोटी ३६ लाख इतका असून, खेळते भांडवल ६२३ कोटीहून अधिक आहेत. जिल्ह्यामध्ये १२ हजार ६४८ कर्जदार असून, ४६ हजार २४२ इतके ठेवीदार आहेत.

पतसंस्थेच्या माध्यमातून महिला बचत गटांसह गृह कर्ज, शैक्षणिक कर्ज, मध्यम मुदत कर्जत अशा वेगवेगळ्या कर्ज योजना राबवून शेवटच्या घटकाला आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आतापर्यंत पतसंस्थेने ४३९ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत केले असून, पतसंस्थेच्या ५६४ कोटींहून अधिक ठेवी आहेत. आगामी काळात पतसंस्था मुंबईत स्थापन करण्याचा मानस आहे. आर्थिक व्यवसाय करीत असताना पतसंस्थेने सामाजिक बांधीलकीदेखील जपण्याचे काम केले आहे. अलिबागपासून दहा किलोमीटर अंतरावर गोशाळा उभारण्यात आली आहे. आज शंभरहून अधिक गो धन या ठिकाणी आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेदेखील पतसंस्थेने पाऊल उचलून कमी दरात डायलेलीस सेंटरची निर्मिती केली आहे. महिन्याला ९२ हून अधिक रुग्णांहून अधिक या सेंटरमध्ये उपचार केले जात आहेत.

पतसंस्थेचे सुरुवातीचे कामकाज ऑफलाईन होते. बदलत्या काळानुसार पतसंस्थेने कामकाजही गतीमान केले आहे. संगणकीकरणासह कोअर बँकिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे कमळ नागरी पतसंस्था आज वेगळ्या उंचीवर पोहोचली असून, आगामी काळात दहा हजार कोटींचा टप्पा पार करण्याचा मानस असणार असल्याचे सांगण्यात आले.

# मुरुडमध्ये स्वच्छतेसाठी विशेष कृती आराखडा बैठक

## ● नागरिकांच्या सहभागावर भर

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

(छायाचित्रः गणेश चोडणेकर)



मुरुड-जंजिरा नगरपरिषद आणि कोळी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने मच्छी मार्केट, मटण मार्केट व कोळीवाडा परिसरातील स्वच्छतेसंदर्भात विशेष कृती आराखडा बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत स्वच्छ आणि सुंदर मुरुड घडवण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी केले.

नगराध्यक्षा दालनात पार पडलेल्या या बैठकीत स्वच्छतेचे महत्त्व आणि अस्वच्छतेचे दुष्परिणाम दर्शविणारी चित्रफीतही दाखविण्यात आली. यावेळी करनिरीक्षक अनिकेत जगदाळे, नगरसेविका प्रांजली मकु, अंकिता गुरव, आरोग्य उपसभापती सुगंधा मकु, नगरसेवक पांडुरंग आरेकर, आदेश दांडेकर, महादेव कोळी समाज नवापाडा अध्यक्ष कृष्णा बळी, तसेच शहर समन्वयक आणि कोळी समाजाचे महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्षा दांडेकर यांनी कोळीवाडा, मच्छी मार्केट आणि समुद्रकिनारी वाढलेल्या अस्वच्छतेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. सांडपाणी, कचऱ्याचे ढीग आणि दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. नगरपरिषदेच्या नियमित स्वच्छतेनंतरही काही नागरिकांकडून पुन्हा कचरा टाकला जात असल्याने परिस्थिती गंभीर बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अस्वच्छतेमुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असून सागरी पर्यावरण आणि जलचर जीवसृष्टीला देखील धोका निर्माण होत आहे. याचा पर्यटनावरही परिणाम होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला फटका बसू शकतो, असे त्यांनी सांगितले. कोळीवाड्याची स्वच्छता ही मुरुडच्या आर्थिक विकासाची गुरुकिल्ली असून, स्वच्छ समुद्रकिनाऱ्यांसाठी सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ब्ल्यू फ्लॅग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करत त्यांनी प्लास्टिक वापर टाळणे, कचरा वेगळा करून घंटागाडीत देणे आणि नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. कचरा रस्त्यावर किंवा समुद्रात टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

बैठकीत कोळी समाजाच्या महिलांनीही आपली मते मांडली. घंटागाडी वेळेत येणे, प्रत्येक घरातून कचरा संकलन करणे आणि कचरा टाकणाऱ्यांवर नियंत्रणासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी करण्यात आली. यावर सकारात्मक चर्चा होऊन नगराध्यक्षा दांडेकर यांनी लवकरच कोळीवाडा आणि समुद्रकिनारी परिसरात सीसीटीव्ही बसवण्याचे आश्वासन दिले.

# स्वीकृत सदस्यांच्या प्रवेशाला मंजुरी

**मुंबई :** राज्यातील महानगर पालिका आणि नगरपालिकांप्रमाणेच आता जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती विधेयक मंगळवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. हे विधेयक कायद्यात रूपांतरित झाल्यानंतर जि.प.मध्ये २०१ नवीन सदस्यांची वाढ होईल. तर पं.स.मध्ये ८०४ जणांना नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्त करण्याचा मार्ग मोकळा होईल. महाराष्ट्राच्या ३४ जि.प. आता २०१ मंजूर सदस्य आणि २,०१२ निर्वाचित सदस्य असतील. ३०१ पं.स.मध्ये ४,०२४ सदस्य असतील, ज्यात ८०४ नामनिर्देशित सदस्य असतील.

# स्वामी समर्थ मठात प्रकटदिन

## ● हजारो भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**



मुरूड डोंगरी सुभा येथील श्री स्वामी समर्थ महाराज मठात प्रकट दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला आहे. दर्शनासाठी आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

मुरूड डोंगरी-सुभा येथील श्री स्वामी समर्थ महाराज मठात आज चैत्र शुद्ध द्वितीयेला महाराजांचा प्रकट दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने या मठाच्या अधिपती गुरू माऊली सौ त्रिशा दत्तात्रेय पाटील यांनी गेली २० वर्षे हा सोहळा साजरा करत आहेत. या निमित्ताने मठात पहाटे पासून महाराजांना अभिषेक विधीवत पूजन करून दिवसभर नामस्मरण दुपारी महाआरती व महाप्रसाद करण्यात आला होता. याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. सायंकाळी सहा वाजता पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

(छायाचित्रः गणेश चोडणेकर)



# सार्वजनिक वाचनालयात शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड सार्वजनिक वाचनालयात शिवकालीन शस्त्र व नाणी प्रदर्शनाचे उद्घाटन मुरूड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या हस्ते फीत कापून तर राजे शिवछत्रपती महाराजांना पुष्पहार अर्पण करून उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनात कॅनडाचे विदेशी ब्रेंडा ली विल्सन व जीन एल.एफ. लॅम्बर्ट पर्यटक महिलांनी सहभाग नोंदविला आणि शिवकालीन शस्त्रे व नाणी ची माहिती घेतली.

यावेळी सार्वजनिक वाचनालय अध्यक्ष -जयवंत आबाजी,उपाध्यक्ष दिपाली जोशी, इतिहास अभ्यासक अनिकेत पाटील,अतुल मोरे, अच्युत चव्हाण, संजय गुंजाळ, सांस्कृतिक समिती अध्यक्ष सिद्धेश लखमदे, पुस्तक निवड समिती अध्यक्ष -प्रवीण बैकर, विश्वस्त शैलेश वारेकर नैनिता कर्णिक, नयन कर्णिक तसेच वाचनालयाचे सभासद वाचक नागरिक व शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी इतिहास अभ्यासक अनिकेत पाटील व अतुल मोरे यांनी शस्त्र प्रदर्शनाकरिता तलवार, राज्यशस्त्र-पट्टा, ढाल, भाला, विटा शस्त्र, कट्यारींचे प्रकार-खंजीर, वाघनखे, बिचवा, माडू, गुर्ज कत्ती, जरनाल, चिलखत, अडकित्ता, तोफगोळ्यांचे विविध प्रकार तबर आदींसह शस्त्रे प्रदर्शनला ठेवून माहिती सांगण्यात आली.

# फणसाड अभयारण्यात आजपासून पक्षीगणना

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

ग्रीन वर्क्स ट्रस्ट मुंबईतर्फे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सहकार्याने शाश्वत सहभाग, पुनर्संचयन आणि वन्यजीव संरक्षणाद्वारे संवर्धन या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र वन विभाग व ठाणे वन्यजीव विभाग यांच्या सहयोगाने फणसाड अभयारण्यात आजपासून तीन दिवसीय या कालावधीत पक्षी गणना कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. यामध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागातून पक्षीजीवनाचे शास्त्रीय पद्धतीने निरीक्षण व नोंद ठेवण्याचे काम केले जाणार आहे. तरी वन्यजीव व पक्षी प्रेमी इच्छुकांनी निसर्गाच्या सान्निध्यात पक्षीगणना करून आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन ग्रीन वर्क्स ट्रस्ट चे अध्यक्ष निखिल भोपाळे यांनी केले आहे.

# माथेरानमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव

## प्रशासनाविरोधात नाराजी

**। माथेरान । प्रतिनिधी ।**



जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेले पर्यटनस्थळ माथेरान येथे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांच्या समस्यांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आवश्यक सुविधा आणि वाहतूक व्यवस्थेअभावी सर्वसामान्य नागरिकांसह पर्यटकांनाही अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे.

कर्जत- माथेरानदरम्यान चालणारी मिनीबस सेवा सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून, ती कधीही बंद पडू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. ११ ऑक्टोबर २००८ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष मनोज खेडकर यांच्या प्रयत्नातून सुरू झालेली ही सेवा विद्यार्थ्यांपासून ते व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, घाटातील तीव्र चढावर बसचा गियर वेळेवर न लागणे, तसेच वारंवार तांत्रिक बिघाड होऊन बस अर्ध्या मार्गावर बंद पडणे, यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. अनेक वेळा प्रवाशांना लहान मुलांसह पायपीट करावी लागत असल्याने मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. नवीन मिनीबस देण्याचे आश्वासन वारंवार दिले गेले असले तरी अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

दुसरीकडे, दस्तुरी ते माथेरान रेल्वे स्थानक दरम्यान ई-रिक्षा सेवा उपलब्ध करण्यात आली असली, तरी ती अपुरी ठरत आहे. एकूण ९४ परवानाधारक हातरिक्षांपैकी केवळ २० जणांना ई-रिक्षा देण्यात आल्या असून उर्वरित ७४ परवानाधारकांना अद्याप या सुविधेपासून वंचित ठेवण्यात आले आहे. सर्व परवानाधारकांना ई-रिक्षा मिळाल्यास पर्यटकांची प्रतीक्षा कमी होऊन वाहतूक अधिक सुरळीत होऊ शकते, अशी मागणी होत आहे.

नेरळमार्गे माथेरान हा एकमेव प्रवेशमार्ग असल्याने सुट्टीच्या हंगामात दस्तुरी नाक्यावर पार्किंगची अपुरी व्यवस्था मोठ्या अडचणी निर्माण करत आहे. परिणामी, घाटात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून पर्यटकांना तासन्तास अडकून राहावे लागते. या समस्येवर पर्यायी उपाययोजना करणे गरजेचे असतानाही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, माथेरानमधील नागरिक आणि पर्यटकांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन आणि प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

पान १ वरून

## खालापुरात खाद्यतेल तस्करीचा पर्दाफाश

पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नितीन सांगळे, पोलीस हवालदार शेखर मोरे व पथकाने रात्री कारवाई केली. पोलिसांच्या येण्याची चाहूल लागताच तस्करांनी घटनास्थळावरून पलायन केले. घटनास्थळी १७ तेलाने भरलेले डबे, ४८ रिकामे डबे, सुमारे ५० झाकणे (सील) आणि तेल काढण्यासाठी वापरला जाणारा पाईप असा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांनी हा सर्व साहित्य जप्त केले आहे.

याप्रकरणी मोहपाडा येथील रामदुलार यादव याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, या तस्करीत आणखी कोणाचा सहभाग आहे याचा तपास सुरू आहे. न्यायालयीन परवानगी घेऊन पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, हे प्रकरण दाबण्याचे काही प्रयत्न झाले असले तरी खालापूर पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष करून कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

## एचसीसीचा कारभार, परवानगीशिवाय बांधकाम

कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे दोन मजली इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे. ही जागा महसूल अभिलेखानुसार शेती गटात मोडत असून, तिचे अकृषिक जमिनीत रूपांतर करण्यात आलेले नाही.

या बांधकामाबाबत महेश ठाकूर यांनी ग्रुप ग्रामपंचायत सावली यांच्याकडे माहिती अधिकारांतर्गत विचारणा केली असता, ग्रामपंचायतीने लेखी स्वरूपात कळवले आहे की, हा प्रोजेक्ट किंवा कोणत्याही बांधकामासाठी ग्रामपंचायतीने कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र किंवा परवानगी दिलेली नाही. या बांधकामासाठी संबंधित कंपनीने अद्याप कोणताही अर्जही सादर केलेला नाही. इतकेच नव्हे तर, हे बांधकाम सीआरझेड नियमांचे उल्लंघन करून केले जात असल्याची तक्रार अर्जात करण्यात आली आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव**

महेश ठाकूर यांनी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांनी या अर्जासोबत घटनास्थळाचे फोटो, माहिती अधिकाराचा अहवाल आणि सातबारा उतारे पुरावा म्हणून जोडले आहेत. दोषी कंपनीवर कडक कारवाई करून हे अनधिकृत बांधकाम तातडीने थांबवण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

## ‘भाकरी सेंटर’मुळे महसूल धोक्यात

स्थानिकांचे म्हणणे आहे.

या अतिक्रमणांमुळे नगरपालिकेचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. यासोबतच, प्रशासनाकडून कारवाई का होत नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करत असून, अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. नगरपालिका मालमत्तेचा उघडपणे गैरवापर होत असतानाही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. सर्व बेकायदेशीर अतिक्रमणांची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, बुडालेला महसूल वसूल करावा तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी उरणकरांकडून जोर धरत आहे.

## रुपाली चाकणकरांचा राजीनामा घ्या

त्यांना कोणताच अधिकार नाही. पीडितेला न्याय मिळावा यासाठी आंदोलने आणि सोशल मीडियावर मोहीम सुरू आहे. या प्रकरणात सरकारने ठोस पावले उचलून पारदर्शक चौकशी करावी, अन्यथा जनआक्रोश आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. बलात्काराचा आरोप असलेल्या व्यक्तींशी संबंध ठेवणे आणि त्याच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे, हे महिला आयोगाच्या अध्यक्षपदाला शोभणारे नाही, अशी टीका करीत महिला सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या पदावर असलेल्या व्यक्तीने आपली जबाबदारी ओळखली पाहिजे, असेही चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून रुपाली चाकणकर यांनी महिलांना न्याय मिळवून देणे, हे त्यांचे कर्तव्य आहे. मात्र, त्या महिलांवर अत्याचार करणाऱ्या भोंदूबाबाला पाठीशी घालण्याचे काम करीत आहेत. परिणामी, त्यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राहण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनाही या प्रकरणात लक्ष घालावे. एक महिला म्हणून सुनेत्राताईंनी चाकणकर यांची पाठराखण न करता, त्यांच्या या वागणुकीबद्दल त्यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा.

– श्रद्धा ठाकूर, सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस

## वेबसाईटवरील ओळख महागात

विविध कारणे सांगून पैशांची मागणी सुरू केली.

सुरुवातीला केनियाला जाण्यासाठी अडचण असल्याचे सांगत त्याने रक्कम मागितली. त्यानंतर भारतात येण्यासाठी फ्लाईट तिकीट काढले असून ऑनलाइन व्यवहारात अडचण असल्याचे कारण देत वारंवार पैसे उकळले. अशाप्रकारे महिलेने वेळोवेळी एकूण १०.४० लाख रुपये पाठवले.

यानंतर २ मार्च रोजी एका महिलेने ‘कस्टम अधिकारी’ असल्याचे सांगत फोन केला आणि अमन सिंगवर मनी लॉन्डरिंगची कारवाई होणार असल्याचे सांगून ‘प्रमाणपत्र’ काढण्यासाठी साडेचार लाख रुपयांची मागणी केली. मात्र संशय आल्याने पीडित महिलेने ओळखीच्या व्यक्तीकडे चौकशी केली असता अशा प्रकारचे कोणतेही प्रमाणपत्र नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.पनवेल शहर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## सामराजगडाचे अस्तित्व धोक्यात

शक्यता वर्तवली जाते. तसेच संभाजी महाराजांनी येथून जंजिरावर तोफगोळ्यांचा मारा केल्याच्या उल्लेखामुळे या गडाचे लष्करी महत्त्व अधोरेखित होते. आज गडावर उद्ध्वस्त प्रवेशद्वार, तटबंदीचे अवशेष आणि काही वीरांची स्मारके दिसून येतात. मात्र, कोणतीही देखभाल नसल्याने गड झाडाझुडपांत हरवत चालला आहे. सध्या काही ठिकाणी स्थानिकांनी केलेले बांधकाम आणि तात्पुरत्या स्वरूपातील वापर यामुळे गडाचे मूळ स्वरूप धोक्यात आले आहे. पर्यटनाच्या दृष्टीनेही सामराजगड अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो. मुरुड-जंजिरा आणि पद्मदुर्ग पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना या गडाचा समावेश केल्यास एक समृद्ध ऐतिहासिक अनुभव मिळू शकतो. गडावर बुरुजांचे पुनर्बांधकाम, परिसर सुशोभीकरण आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारल्यास हा परिसर आकर्षणाचे केंद्र बनू शकतो.

राज्यातील अनेक किल्ल्यांसाठी निधी उपलब्ध होत असताना सामराजगड मात्र दुर्लक्षित राहिल्याची खंत व्यक्त होत आहे. या ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी शासनाने तातडीने लक्ष देऊन संवर्धनाची ठोस पावले उचलावीत, अशी मागणी दुर्गप्रेमी व स्थानिकांकडून होत आहे.

## ...गाळ काढण्यासाठी ठेकेदारच सापडेना?

३१ जानेवारी २०२५ रोजी सुमारे ८ कोटी ८१ लाख रुपयांची पहिली ई-निविदा जाहीर केली होती. त्यानंतर २४ फेब्रुवारी, १७ मार्च आणि १५ एप्रिल २०२५ रोजी एकूण चार वेळा निविदा काढण्यात आल्या. मात्र, पहिल्या तीन निविदांना एकही ठेकेदार प्रतिसाद देत नसल्याचे समोर आले. चौथ्या निविदेत दोन ठेकेदारांनी अर्ज केले; पण आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे त्यांच्या निविदा बाद करण्यात आल्या. परिणामी, गाळ काढण्याचा आणि दुरुस्तीचा प्रश्न पुन्हा प्रशासनाच्या दप्तरी अडकून पडला आहे.

दरम्यान, प्रशासन निष्क्रिय असताना उमटे धरण संघर्ष ग्रुपने पुढाकार घेत गाळ काढण्याचे काम हाती घेतले होते. या उपक्रमात शेकापच्या चित्रलेखा पाटील, अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम सभापती प्रशांत नाईक, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र म्हात्रे, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, ॲड. प्रवीण ठाकूर, ॲड. सुहास कारूळकर तसेच स्थानिक सामाजिक संघटनांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी शासनाच्या पातळीवर ठोस उपाययोजना न झाल्याने परिस्थिती पुन्हा पूर्ववत झाली आहे.

आजही उमटे धरणातून पुरवठा होणारे पाणी दूषित असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेष म्हणजे, पिण्याच्या पाण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथील चवदार तळ्यावर ऐतिहासिक आंदोलन केले होते. त्या घटनेला ९९ वर्षे पूर्ण होत असतानाही त्याच रायगड जिल्ह्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, ही अत्यंत लाजिरवाणी बाब असल्याची टीका करण्यात आली आहे. उमटे धरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने केवळ निविदांचे नाटक न करता तात्काळ सक्षम समिती नेमून योग्य ठेकेदार निश्चित करावा, तसेच गाळ काढून स्वच्छ आणि मुबलक पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## भोंदूबाबा खरातची कुंडली उघड

भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरातचे बिंग फोडणाऱ्या नीरज जाधव याला देखील अटक केली आहे. शेकडो महिलांचं शोषण करणाऱ्या खरातच्या प्रॉपर्टीची यादी समोर आली आहे. नाशिकच्या नराधमाचे नाशिक आणि अहिल्यानगर भागातही ३० हून अधिक ठिकाणी प्लॉट्स खरेदी केले आहेत. या सर्व जमिनींची किंमत जवळपास ५०० कोटींच्या घरात जाण्याची शक्यता आहे. अशोक खरातसह त्याची बायको, मुलगी, नातेवाईकांच्या नावावर संपत्ती असल्याचे समोर आलं आहे. या सर्व मालमत्ताची तपासणी होणार का? याकडे साऱ्यांचं लक्ष लागलं आहे. नाशिकच्या सिन्नर तालुक्यात अशोक खरातची मोठी गुंतवणूक आहे. जमिनींसह सिन्नर शिर्डी रस्त्यावर हार्डवेअरचे मोठं शो रूम आहे. शिवसंकल्प हार्डवेअर दुकान पत्नीच्या नावावर आहे. त्याचे शो रूम मेहुणा सांभाळत आहे, तर कोट्यवधींची बेनामी जमिनींसह बांधकाम व्यवसायातदेखील खरातची भागीदारी असल्याची माहिती समोर आली आहे.

## निवडक




### भूमीपुत्रांसाठी माजी विद्यार्थी सज्ज

**तळा :** वेदक कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत एका नव्या सामाजिक चळवळीचा पाया रचला आहे. मराठी एकता संघ रायगड या संघटनेची अधिकृत स्थापना करण्यात आली असून, मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी ही संघटना कार्य करणार आहे.या संघटनेची स्थापना प्रामुख्याने जिल्ह्यातील भूमीपुत्रांच्या न्याय्य हक्कासाठी लढण्यासाठी करण्यात आली आहे. वेदक महाविद्यालयाच्या विविध शाखांमधील माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक अभ्यासानंतर आता सामाजिक ऋणातून ही संघटना उभी केली आहे. केवळ राजकीय हेतू न ठेवता, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात बदल घडवून आणण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची घटत असलेली संख्या महाविद्यालयात तासीकेला कमी असलेली उपस्थिती व अश्या विविध उपक्रमांकारीत मंथन या दृष्टीने ही संघटना प्रयत्न करणार आहे. सन २०१९ च्या बॅच मधील सिद्धेश कदम,अपूर्वा जाधव, श्रेयस रोडे, सुरभी ठाकूर, हर्षल राजमाने, सुमित शिंदे, विश्वजीत गनतांडेल, अक्षय सुतार, ऋतिक मोरे, गणेश कदम, रोशन बाबरे, कल्याणी बाबरे, अक्षता कुंभार या विद्यार्थ्यांनी मराठी




### स्थलांतर संभ्रमामुळे ग्राहक हैराण

**उरण :** उरण शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्या प्रस्तावित स्थलांतराबाबत निर्माण झालेल्या संभ्रमामुळे ग्राहकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. माहितीनुसार, सदर स्टेट बँकेची शाखा लवकरच उरण नगरपरिषद कार्यालयाजवळील नगरपालिका जागेत स्थलांतरित करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. मात्र, प्रत्यक्षात अद्याप बँकेचे स्थलांतर झालेले नसून, ती जुन्याच ठिकाणी सुरू आहे. स्थलांतर झाल्याच्या समजुतीमुळे अनेक ग्राहक नगरपालिका कार्यालयात येऊन बँक कुठे सुरू झाली याबाबत चौकशी करत आहेत. विशेषतः वयोवृद्ध ग्राहकांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत असून त्यांना वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर, स्टेट बँक प्रशासन तसेच नगरपालिका प्रशासनाने तात्काळ स्पष्ट सूचना देणारा फलक लावावा, की बँक अद्याप जुन्याच ठिकाणी कार्यरत आहे. यामुळे ग्राहकांचा होणारा गैरसमज दूर होऊन त्यांना अनावश्यक त्रास टाळता येईल, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### संरचित रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम

**पनवेल :** सुरक्षित आणि जबाबदार प्रवासाची जाणीव वाढवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून होंडा मोटारसायकल अँड स्कूटर इंडिया यांनी महाराष्ट्रातील चिपळूण येथे संरचित रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम आयोजित केली. या उपक्रमात मेरी माथा स्कूल आणि सती इंग्लिश मीडियम स्कूलमधील २४०० हून अधिक सहभागी एकत्र आले आणि दैनंदिन वाहतूक जागरूकतेला एक रंजक व सहभागी शिक्षणाचा अनुभव मिळाला. या मोहिमेत रस्ता सुरक्षा विषयावरील जनजागृती सत्रे, खेळ, क्विझ आणि परिस्थितीआधारित चर्चा यांचा समावेश होता. यामुळे सहभागींना सुरक्षिततेची तत्त्वे प्रत्यक्ष आयुष्यातील परिस्थितींशी जोडून समजून घेण्यास मदत झाली. या उपक्रमात करत करत शिकणे या पद्धतीवर भर देण्यात आला.

### टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील जुना मुंबई-पुणे महामार्गावर गोदरेज सिटी ठोंबरेवाडी, पनवेल येथे टेम्पोने दुचाकीला दिलेल्या धडकेने अपघात झाला. या अपघातात २८ वर्षीय रोहित लखदिवे हा जखमी झाला. याप्रकरणी अनोळखी टेम्पो चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रोहित लखदिवे (रा. घाटकोपर, मुंबई) हा मोटरसायकल वरून पुणे येथे गेला होता. तो पनवेल तालुक्यातील आपल्या घरी रात्री जुना मुंबई-पुणे महामार्गावरून जात असताना गोदरेज सिटी ठोंबरेवाडी, पनवेल येथे आला असता टेम्पोने त्याला धडक दिली. या अपघातात रोहित लखदिवे दुचाकीवरून खाली पडला. या अपघात रोहित लखदिवे जखमी झाला आहे. त्याला तातडीने उपचारासाठी रूग्णालयात हलवण्यात आले आहे.

# श्रीवर्धनमध्ये गॅसटंचाईचा स्फोट





- 'आखाती तणावाचा' परिणाम
- पर्यटन अर्थव्यवस्थेला मोठा धक्का

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

तालुक्यात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या तीव्र तुटवड्यामुळे संपूर्ण पर्यटन पट्टा संकटात सापडला असून, हॉटेल उद्योग अक्षरशः कोलमडण्याच्या उंबरठ्यावर आला आहे. दिवेआगर, श्रीवर्धन आणि हरिहरेश्वर या लोकप्रिय पर्यटनस्थळांमध्ये अनेक हॉटेल्सनी तात्पुरते शटर खाली ओढले असून, उर्वरित व्यवसायही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. या अभूतपूर्व परिस्थितीमुळे स्थानिक अर्थचक्र आणि रोजगारावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचा पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. विशेष म्हणजे घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत असताना व्यावसायिक सिलिंडर मात्र उपलब्ध होत नसल्याने हॉटेल व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. उपलब्ध झाल्यासही सिलिंडरचे दर प्रचंड वाढवले जात असल्याने लहान व मध्यम व्यावसायिकांना व्यवसाय चालवणे अशक्य होत आहे.

सध्या आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीचा अप्रत्यक्ष परिणाम एलपीजी पुरवठ्यावर होत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारत मोठ्या प्रमाणावर एलपीजी आयातीवर अवलंबून असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ-उतार, वाहतूक अडचणी आणि पुरवठा साखळीतील व्यत्यय यांचा स्थानिक स्तरावर परिणाम जाणवू लागला आहे. यामुळे व्यावसायिक गॅस पुरवठा अधिकच अनियमित झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

या संकटामुळे अनेक हॉटेल्सना पर्याय म्हणून लाकूड किंवा पारंपरिक चुलींचा वापर करावा लागत आहे. मात्र, त्यामुळे खर्च वाढत असून, सेवा देण्यात विलंब आणि अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी, पर्यटकांच्या अनुभवावरही परिणाम होत आहे, त्यामुळे हॉटेल उद्योगावर 'अस्तित्वाचा' प्रश्न निर्माण झाला आहे काही ठिकाणी मेन्यू मर्यादित करण्यात आले असून, काही हॉटेल्सनी पूर्णपणे सेवा बंद केली आहे.

श्रीवर्धन हा कोकणातील एक महत्त्वाचा पर्यटन केंद्र असून, सुंदर समुद्रकिनारे आणि धार्मिक स्थळांमुळे येथे वर्षभर पर्यटकांची गर्दी असते. मात्र, सध्याच्या गॅस टंचाईमुळे हॉटेल्स, खानावळी, बीच स्टॉल्स आणि होमस्टे व्यवसायावर थेट परिणाम होत आहे. पर्यटकांना जेवण व निवासाची गैरसोय होत असल्याने अनेकांनी पर्याय म्हणून इतर पर्यटनस्थळांकडे वळण्यास सुरुवात केली आहे, त्यामुळे येथील पर्यटनावर काळे ढग तयार झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

पर्यटनावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात आला आहे. रोजंदारी कामगार, वेटर्स, कुक, वाहनचालक आणि छोट्या व्यावसायिकांवर बेरोजगारीचे संकट कोसळण्याची चिन्हे दिसत आहेत. गॅसटंचाईमुळे निर्माण झालेली ही साखळी प्रतिक्रिया संपूर्ण स्थानिक अर्थव्यवस्थेला हादरा देणारी ठरत आहे, त्यामुळे स्थानिक अर्थचक्र धोक्यात आहे.

हॉटेल व्यावसायिकांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ''घरोघरी गॅस मिळतोय, पण व्यावसायिक वापरासाठी सिलिंडर मिळत नाहीत. अशा परिस्थितीत हॉटेलची चूल विझण्याची वेळ आली आहे,'' अशी खंत त्यांनी व्यक्त केली. व्यावसायिक गॅससाठी स्वतंत्र कोटा, नियमित पुरवठा आणि दर नियंत्रणाची मागणी जोर धरत आहे.

पर्यटन हंगाम सुरू असतानाच स्थानिक पुरवठा बिघाड आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तणाव या दुहेरी संकटामुळे श्रीवर्धनमधील पर्यटन व्यवसायावर मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. भविष्यातील बुकींग, पर्यटकांचा विश्वास आणि या पर्यटन पट्ट्याची प्रतिमा धोक्यात आली आहे.

श्रीवर्धनमधील गॅस टंचाई ही केवळ स्थानिक पुरवठ्याची समस्या नसून, ती जागतिक घडामोडींशी जोडलेली व्यापक समस्या बनत आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर हे संकट दीर्घकालीन बनून श्रीवर्धनच्या पर्यटन ओळखीवरच परिणाम करू शकते.

## रोहा येथे राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाची सांगता



(छायाचित्रः सत्यप्रसाद आडाव

- पथनाट्यांनी वेधले लक्ष

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

औद्योगिक क्षेत्रासमोर भविष्यात अनेक संकटे उभी राहणार असून, त्यांचा सामना करण्यासाठी कामगार आणि उद्योगांनी सज्ज राहणे अत्यावश्यक आहे. सुरक्षा हीच सर्वांत मोठी जबाबदारी असून ती प्रत्येकाच्या हाती आहे, असे प्रतिपादन उद्योजक व आरआयएचे अध्यक्ष पी.पी. बारदेशकर यांनी केले. धाटाव येथील आरआयए सभागृहात आयोजित ५५व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते.

४ ते ११ मार्चदरम्यान रोहा इंडस्ट्रियल असोसिएशन, म्युच्युअल एड रिस्पॉन्स ग्रुप आणि डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रियल सेफ्टी अँड हेल्थ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांनी हा सप्ताह साजरा करण्यात आला.

यंदा प्रथमच अध्यक्ष बारदेशकर यांच्या संकल्पनेतून पथनाट्य व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कामगारांनी सादर केलेली सुरक्षा विषयावरील पथनाट्ये अत्यंत प्रभावी ठरली आणि उपस्थितांची विशेष दाद मिळवली.

बारदेशकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, औद्योगिक क्षेत्रात घडणाऱ्या अपघातांचे मूळ कारण समजून घेणे गरजेचे आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीत उद्योगांना नव्या आव्हानांना सामोरे जावे लागणार असून, सुरक्षित कार्यसंस्कृती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. सजग कामगार बनणे आणि सुरक्षित वातावरण तयार करणे हे आपल्या सर्वांच्या हातात आहे, असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमात आरआयए सेफ्टी अवॉर्ड स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच सुरक्षा जनजागृती भित्तीपत्रके आणि 'शून्य अपघात' साध्य करणाऱ्या कंपन्यांना पुरस्कार देण्यात आले.

यावेळी दयानंद नांदगावकर, नाथासाहेब कोळेकर, नीरजकुमार मिश्रा, प्रसाद देशमुख, मुरगन, सुदाम करपे, राजेश खांडेकर, प्रकाश शेटे, राजेश हजारे, अरुण माने, वैभव नाईक, डॉ. शैलेश नकाते आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात दयानंद नांदगावकर यांनी सादर केलेली सुरक्षेवरील कविता, सुदर्शन युनिट २ चे महिला सुरक्षा विषयक सादरीकरण आणि रोहा डायकेमच्या कामगारांचे गायन पथनाट्य विशेष आकर्षण ठरले.

## लहानग्या हसनैनचा मोठा निर्धार

### रमजानमध्ये पूर्ण ३० रोजे ठेवण्याचा संकल्प

**। महाड । प्रतिनिधी ।**



पवित्र रमजान महिन्यात रोजा ठेवणे हे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक मानले जाते. मात्र महाड शहरातील खारकांड मोहल्ल्यात राहणाऱ्या अवघ्या ८ वर्षांच्या हसनैन हिदायत पठाण या चिमुकल्याने यंदा संपूर्ण ३० दिवस रोजे ठेवण्याचा निर्धार केला आहे.

इतक्या लहान वयात घेतलेला हा संकल्प त्याच्या श्रद्धा, जिद्द आणि आत्मविश्वासाचे उत्तम उदाहरण ठरत आहे. पहाटे सहरीपासून ते सूर्यास्तापर्यंत उपवास पाळत हसनैन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रोजे पूर्ण करत आहे. कुटुंबियांचाही त्याला पूर्ण पाठिंबा असून त्याच्या या प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रमजान हा संयम, त्याग आणि ईश्वरभक्तीचा संदेश देणारा पवित्र महिना मानला जातो. हसनैनसारख्या लहान मुलाने घेतलेला हा प्रेरणादायी निर्णय समाजातील इतर मुलांसाठीही आदर्श ठरत आहे. हसनैनच्या या निर्धारामुळे खारकांड मोहल्ल्यात आनंदाचे वातावरण असून अनेकजण त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत.



## कुटुंब प्रबोधन सत्रात शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शैक्षणिक क्षेत्रात विविधांगी उपक्रम राबवून ज्ञानवृद्धीसाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित व वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगावच्या रायगड विभागातील सहा शाळांचे एकत्रीकरण अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द येथे उत्साहात संपन्न झाले.

ज्ञानरचनावादी दृष्टिकोन ठेवून अध्ययन , अध्यापनात नवनवीन प्रयोग करणाऱ्या सर्व उपक्रमशील शिक्षकांचा प्रतिवर्षीप्रमाणे एकत्रीकरणाचा २६ वा मेळावा संपन्न झाला. छत्रपती शिक्षण मंडळाच्या रायगड जिल्ह्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड, अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द, सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे, जय जवान जय किसान विद्यालय वाघेरी, गोळेगणी पंचक्रोशी संचालित विद्यालय गोळेगणी, वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगाव या सहा शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या एकत्रिकरणात सहभागी झाले होते.

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणचे कार्याध्यक्ष श्रीकांत तरटे, सरचिटणीस डॉ.निलेश रेवगडे, चिटणीस नीला दामले, सदस्य मिलिंद कुलकर्णी,किशोर आल्हाट, सुनील पाटील, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक, कुटुंब प्रबोधन गतिविधि प्रमुख सचिन जोगळेकर, सायली जोगळेकर, माजी मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे, आवटे आदी मान्यवरांच्या हस्ते एकत्रीकरणाची सुरुवात करण्यात आली. या एकत्रीकरणात कुटुंब प्रबोधनात्मक माहिती, कुटुंबाचे महत्व या विषयावर राष्ट्रसेविका समिती कुटुंब प्रबोधन गती विधी जिल्हा संयोजक सायली सचिन जोगळेकर यांनी कुटुंब प्रबोधन या विषयावर मार्गदर्शन केले.

## श्रीवर्धनचा 'लाईव्ह प्रक्षेपण' प्रस्ताव अजेंड्यावर

### नागरिकांच्या तीव्र रेट्यामुळे प्रशासनाने घेतली माघार

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**



श्रीवर्धन नगरपालिकेच्या सभागृहाचे कामकाज 'लाईव्ह प्रक्षेपण' करण्याच्या मागणीला अखेर यश आले असून, पत्रकारांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि नागरिकांच्या तीव्र रेट्यामुळे प्रशासनाने माघार घेतली आहे. यानुसार, २४ मार्च रोजी नियोजित सर्वसाधारण सभा रद्द करून आता २५ मार्च रोजी नव्या अजेंड्यासह जनरल बॉडी सभा आयोजित करण्यात आली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, सुधारित अजेंड्यामध्ये 'नगरपालिका जनरल बॉडी सभेचे कामकाज कॅमेराद्वारे थेट प्रक्षेपित करणे' हा विषय अधिकृतपणे समाविष्ट करण्यात आला आहे.

यापूर्वी हा प्रस्ताव अजेंड्यावरून वगळण्यात आल्याने शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. पारदर्शकतेच्या मुद्द्यावरून विरोधकांनी प्रशासनावर जोरदार टीका केली होती, तर नागरिकांनीही या निर्णयाविरोधात नाराजी व्यक्त केली होती. पत्रकारांनीही या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत मुद्दा उचलून धरल्याने अखेर प्रशासनाला आपली भूमिका बदलावी लागली.

दरम्यान, या घडामोडींनंतर शिवसेना गटनेते देवेंद्र भुसाणे यांनी पत्रकार आणि श्रीवर्धनकर नागरिकांचे आभार मानले आहेत. त्यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, 'हा जनतेच्या एकजुटीचा आणि निर्भीड पत्रकारितेचा विजय आहे. नागरिकांनी आणि पत्रकारांनी आवाज उठवला नसता, तर हा महत्त्वाचा निर्णय शक्य झाला नसता.'

## आज रमजान ईद सर्वत्र होणार साजरी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

ईद-ऊल-फित्र म्हणजेच रमजान ईद शनिवारी (दि.२१) सर्वत्र साजरी होणार आहे.

इस्लामी शाबान महिन्यानंतर पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ होतो. यावर्षी १८ फेब्रुवारी रोजी चंद्रदर्शन झाल्यावर रमजान महिन्याला सुरुवात झाली. या महिन्यात मुस्लिम बांधव रोजे धरीत असतात. तसेच नमाज पठण व कुराण वाचनावर तसेच जकात देणे. यावर मुस्लिम बांधवांचा जास्त भर असतो. या महिन्यात रात्रीची इशाची नमाज झाल्यावर तरविहची विशेष नमाज मुस्लिम बांधव अदा करतात. मशीद व ईदगाहमध्ये मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून ईदची सामुदायिक नमाज अदा करणार आहेत.

यावर्षी २० मार्च रोजी चंद्रदर्शन झाल्याने २१ मार्च रोजी रमजानची ईद साजरी केली जाणार आहे. या रमजान ईदची सामुदायिक नमाज शनिवारी माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील जामा मशिदीत सकाळी होणार असल्याची माहिती येथील मस्जिद मोहल्ल्याचे अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते यांनी दिली.

## श्रीवर्धनकरांचा जीव धोक्यात

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

भटक्या श्वानांचा प्रश्न आता जीवघेणा बनला असून, नगरपरिषदेच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा तीव्र संताप व्यक्त होत आहे. अवघ्या दोन दिवसांत सात नागरिकांना श्वानांनी चावा घेतल्याच्या घटनांनी शहरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. नाका, मुख्य रस्ते आणि वर्दळीच्या भागांत श्वानांची टोळकी मोकाट फिरताना दिसत आहेत. एकट्याने जाणाऱ्या नागरिकांवर झडप घालून हल्ले करण्याच्या घटना वाढल्या असून, नागरिक अक्षरशः दहशतीत जीवन जगत आहेत. 'आज सात जण जखमी झाले, उद्या जीवितहानी झाली तर जबाबदार कोण? नगरपरिषद झोपली आहे का?' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. काही महिन्यांपूर्वी जीवना बंदर आणि दांडा परिसरातही अशाच घटना घडल्या होत्या. प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना न केल्याने ही परिस्थिती पुन्हा उद्भवली आहे. श्वानांवर कारवाई करताना प्राणीप्रेमी संघटनांचा दबाव असल्याचं नागरिकांचं म्हणणं आहे. त्यामुळे नागरिक पुढाकार घेण्यास घाबरत असून, परिस्थिती अधिकच बिकट होत आहे.

**मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घ्यावा | पशुसंवर्धन विभागाचे आवाहन**

## पशुपालक होणार उद्योजक

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना उपयुक्त ठरणार आहे. या योजनेंतर्गत दुध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन आणि कुक्कुटपालन यांसारख्या पूरक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन विभागातर्फे करण्यात आले आहे.

या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे केवळ पशुधन वाटप न करता, शेड उभारणी, विमा आणि आधुनिक साधनसामग्रीसाठीही



मोठे अनुदान दिले जाणार आहे. सदरच्या योजना राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय अशा दोन स्वरूपात राबवण्यात येणार आहेत.

राज्यस्तरीय योजनेत पाच दुधाळ गायी किंवा म्हशींच्या गटासाठी ११.३५ लाख रुपयांचा प्रकल्प असून, शेळी-मेंढी पालन ५० माद्या आणि ५ नर अशा गटासाठी ११.३८ लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. कुक्कुटपालन अंडी देणाऱ्या ५००० पक्ष्यांच्या पालनासाठी ३० लाख रुपयांपर्यंतचा प्रकल्प असून, यात शेड बांधकामासह ऑटोमेशन प्रणालीचाही समावेश आहे. सर्व योजनांमधील सर्वसाधारण लाभार्थ्यांना ५० टक्के आणि अनुसूचित जाती/जमातीतील लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान मिळेल.

**पात्रता आणि आरक्षण**

या योजनेत अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, वनहक्क धारक आणि महिला बचत गटांना प्राधान्य दिले जाईल. तसेच, महिलांसाठी ३०% ते ५०% आणि दिव्यांगांसाठी ५% आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**जिल्हास्तरीय योजना**

१) दुधाळ गट वाटप योजना एक दुधाळ गाय म्हैस व तीन वर्षाचा विमा किंवा दोन दुधाळ गाय म्हैस व तीन वर्षाचा विमा, २) शेळी मेंढी गट वाटप पाच अधिक एक शेळी मेंढी गट प्लस विमा दहा अधिक एक शेळी मेंढी गट अधिक विमा, ३) अंडी देणाऱ्या सुधारित कुकुट देशी पक्ष्यांचे वाटप १६ ते १८ १६ ते १८ आठवडे अंडी देणाऱ्या ५०० पक्षांचे वाटप, ४) वैरण विकास योजना, अ) १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे वाटप योजना, ब) हायड्रोपोनिक तंत्रद्वारे चारा उत्पादन योजना, क) मिनी टीएमआर उपकरण खरेदीसाठी अनुदान, ड) पशुपालकांना कडबा कुट्टी यंत्र खरेदीसाठी अनुदान, इ) सुधारित देशी/पारडांची जोपासनांतर्गत कालवड/पारडू यांना पशुखाद्य पुरवठा योजना, ५) नर पारडू (रेडकू) संगोपन व संवर्धन प्रोत्साहन योजना, ६) पशुपालकांना बैल जोडी खरेदी योजना.

> **विकसित महाराष्ट्र २०४७ चे ध्येय गाठण्यासाठी पशुसंवर्धन क्षेत्राचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. रायगड जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, इथल्या शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घ्यावा. ही योजना केवळ अनुदान देणारी नसून, पशुपालकांना उद्योजक बनवणारी आहे. आम्ही जिल्ह्यात या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कटिबद्ध आहोत.**
> **- डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, रायगड**

## 'चवदार तळे' शताब्दी

जातीव्यवस्थेविरुध्द या देशात अनेक शतकांपासून बंडे होत आली. पण ती बऱ्याचदा वैयक्तिक स्वरुपाची होती. महाराष्ट्रात वारकरी परंपरेतील संतांनी दिलेला समतेचा संदेश व घातलेला जनांचा मेळ हाच त्यातला सर्वात मोठा सामुहिक आविष्कार म्हणावा लागेल. इंग्रज आल्यावर या सामुहिक उद्रेकाला अधिक गती आली. विशेषतः अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातींना सैन्यात, रेल्वेत इत्यादी ठिकाणी नोकऱ्या मिळू लागल्याने आणि त्यांचे शहरांमध्ये वास्तव्य होऊ लागल्याने अभिसरण वेगाने होऊ लागले. खुद्द बाबासाहेबांचे वडीलही ब्रिटिशांच्या सैन्यात होते. महात्मा फुले, शाहू महाराज यांच्यासारख्यांनी महाराष्ट्रात हा मुद्दा मुख्य राजकीय अजेंड्यावर आणला. यातूनच नंतर भारतभरात गाजलेला महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला. या घटनेला आज शंभर वर्षे पूर्ण झाली. २० मार्च १९२७ रोजी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली सुमारे तीन हजार महार व इतर जातीतील स्त्रीपुरुषांनी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी प्राशन करून अस्पृश्यतेच्या भिंतीला जबरदस्त धडक दिली. यामुळे अस्पृश्य मानल्या गेलेल्या जाती हिंदू धर्मव्यवस्थेतील पराकोटीच्या विषमतेला आव्हान द्यायला सिध्द झाल्या आहेत हे स्पष्ट झाले. या एकाच घटनेने बाबासाहेबांना भारतभराच्या दलितांचे पुढारी बनवले. याच प्रसंगाने आपण सत्याग्रहाच्या मार्गाने लढू शकतो असा विश्वासही अस्पृश्यांमध्ये निर्माण केला. त्यानंतर देशभरात मंदिर, पाणवठे इत्यादी सार्वजनिक जागी दलितांना प्रवेश द्यावा यासाठी आंदोलने झाली. खुद्द बाबासाहेबांनीही नाशिकमध्ये काळाराम मंदिरात प्रवेशासाठी सत्याग्रह केला. मात्र आपल्या नेमस्त मार्गांना कथित उच्चवर्णीय व उच्चजातीय हिंदू दाद देत नाहीत हे लक्षात आल्यावर बाबासाहेबांनी तो पर्याय बाद केला व त्यातूनच पुढे जाऊन येवला येथे मी हिंदू धर्मात जन्माला आलो तरी या धर्मात मरणार नाही अशी घोषणा त्यांनी केली. पण या पुढच्या गोष्टी झाल्या. पण बाबासाहेबांच्या आणि दलितांच्या राजकारणाला तेव्हाच्या राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्याचे काम महाडच्या सत्याग्रहानेच केले होते. इंग्लंडहून शिकून आले असले तरी बाबासाहेब नावाचा हा नेता पोषाखी वकील बनून राहणार नाही तर फुले व शाहू महाराजांच्या पावलावर पाऊल टाकून कृतीशील विचारवंत म्हणूनच वावरेल याची द्वाही चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने पूर्ण हिंदुस्थानभर फिरवली

### तेजस्वी इतिहास

पाणवठे, स्मशाने वगैरे सार्वजनिक उपयोगाच्या जागा दलितांसह सर्व जातींसाठी खुल्या असाव्यात अशा प्रकारचे प्रस्ताव ब्रिटीश अंमलाखालील विधिमंडळात १९२० च्या दशकात येऊ लागले होते. तसा एक ठराव रावसाहेब बोले वगैरे सुधारणावादी मंडळींनी मुंबई प्रांतात १९२३ मध्ये मांडला व तो संमत करून घेतला. त्यानुसार महाड नगरपालिकेतही तसा ठराव झाला होता. महाडचे वैशिष्ट्य म्हणजे तेथे सीकेपी व अन्य काही कथित उच्च जातीतील नेतेच हे पुरोगामी पाऊल उचलण्याच्या बाजूचे होते. त्यामुळेच रामचंद्र बाबाजी मोरे या बाबासाहेबांच्या प्रमुख सहकाऱ्यांनी सत्याग्रहाचे आयोजन केले तेव्हा सुरबा टिपणीस, गं.नी. सहस्त्रबुध्दे , अनंत विनायक चित्रे इत्यादींची त्यांना मदत झाली. १९२७ साली सुरेंद्रनाथ टिपणीसांनी नगरपालिकेचे प्रमुख म्हणून सर्व सरकारी संपत्ती/सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली आणि त्यानिमित्ताने आंबेडकरांना सभा घेण्यासाठी आमंत्रण दिले. सभेनंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले. आंबेडकरांनी सर्वात प्रथम त्या तळ्यांमधून पाणी प्यायले आणि त्या नंतर जमलेल्या सर्व लोकांनीही त्या तळ्याचे पाणी पिण्याचा हक्क बजावला. बहुतांश महाडवासियांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला. मात्र काही जणांनी महार मंडळी वीरेश्वराचे मंदिरही बाटवणार आहेत अशी अफवा पसरवली. त्यामुळे कथित उच्च जातीतील मंडळी लाठ्याकाठ्या घेऊन हल्ला करण्यास आली. त्यावेळी सत्याग्रहासाठी जमलेल्यांची संख्या अधिक होती. मनात आणले असते तर त्यांनी हल्लेखोरांना पिटले असते. पण त्यांनी अहिंसेचा मार्ग सोडला नाही. त्यामुळे अनवस्था प्रसंग टळला. त्यानंतर नऊ महिन्यांनी डिसेंबर महिन्यात बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळण्यासाठी पुन्हा महाडचीच निवड केली. चवदार तळ्याच्या निमित्ताने बाबासाहेबांना इथल्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेचे जे दर्शन घडले त्याची ती पावती होती. मनुस्मृती जाळण्याच्या त्या सत्याग्रहामुळे तर दलित चळवळीचे नाव पूर्ण जगात पोचले होते.

### मनुस्मृतीचा पुन्हा उदोउदो

महाड सत्याग्रहाला शंभर वर्षे झाल्यानंतर आज पाणवठे, मंदिरे अशा ठिकाणी किमान उघडपणे अस्पृश्यता पाळली जात नाही. स्मशानांबाबत मात्र तसे ठामपणे म्हणता येत नाही. शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणांमुळे आर्थिक स्थान उंचावण्याची संधी अनेकांना मिळाली आहे. तरीही मधल्या काळात याच म हाराष्ट्रात नुकतेच दिवंगत झालेले बाबा आढाव यांना एक गाव एक पाणवठा असे आंदोलन करावे लागले होते. किंवा १९८० च्या दशकात मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नाचा उद्रेक होऊन राज्यभर दलितांवर अत्याचारांच्या घटना घडल्या होत्या हे विसरता येत नाही. आज राजकीय सत्तेत हरेक जातीला महत्व प्राप्त झाल्याने तिचा सामूहिक अपमान करण्याला कोणी धजावत नाही. पण याचा अर्थ सत्तेत बसलेल्या उच्चवर्णीयांच्या मनातली जात गेली आहे असे नव्हे. आजही आंतरजातीय लग्नांना तीव्र विरोध कायम आहे. मधल्या काळात मराठा किंवा ओबीसी जातीतील मुलींनी दलित मुलाशी लग्न केले तर त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटून गोष्टी खुनापर्यंत गेल्या हे याच महाराष्ट्राने पाहिले आहे. नगर जिल्ह्यातील अशा एकापाठोपाठच्या घटनांनंतर डाव्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तेथे एक मोठी जनजागृती यात्रा काढली होती. आजही सफाई कर्मचारी, उसतोडसारखी कष्टाची कामे करणारे कामगार इत्यादी खूप कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या जातीतून येतात. त्यांना पुरेसे पैसे तर मिळत नाहीतच. पण कामाच्या ठिकाणी सुरक्षित सोयीसुविधा नसल्याने अनेकदा त्यांचे जीव जातात. मध्यंतरी परभणीमध्ये दलितांचा मोर्चा निघाल्यानंतर पोलिसांनी काही जणांची धरपकड केली. त्यातील एकाचा नंतर पोलिस कोठडीत मृत्यू झाला. पण देवेंद्र फडणवीस सरकार ही कोठडीतील हत्या होती हे मान्य करायलाही तयार नव्हते. त्यासाठी प्रकाश आंबेडकर इत्यादींना न्यायायलयाचे दार ठोठावावे लागले. उत्तर प्रदेश वगैरे हिंदी पट्ट्यात तर दलितांची स्थिती अजूनही भयावह आहे. तेथे दर काही दिवसांनी महिलांवर अत्याचाराच्या घटना समोर येत असतात. त्यामुळे आपल्याला एक समाज म्हणून अजूनही पुष्कळ मजल मारायची आहे हे लक्षात येते. दुसरीकडे आजवर ज्या ज्या गोष्टींचा तिरस्कार केला त्यांचा पुन्हा गौरव करु लागण्याची एक पध्दत मोदींच्या भाजपच्या काळात रुढ झाली आहे. मनुस्मृतीचा उदोउदो ही त्यातलीच एक. जातीव्यवस्था ही अन्यायकारक नव्हती, ती खरे तर सामाजिक काम ांच्या विभाजनाची व्यवस्था होती असे मत मांडून अस्पृश्यतेचा प्रश्न गैरलागू करण्याचा सध्या जोरदार प्रयत्न चालू आहे. मनुस्मृतीमध्ये स्त्रिया तसेच दलितांसाठी अत्यंत विघातक अशा तरतुदी असल्याचे अनेकदा सांगून झाले आहे. तरीही नव्या राजवटीतील लोक छुपेपणाने त्याचे समर्थन करत असतात. महाडच्या संघर्षानंतर शंभर वर्षांनी पुन्हा एक नवा संगर उभा करावा लागेल याची ही सारी लक्षणे आहेत.

विचार

# 'जंगलराज' संपवणार कोण?

*गेल्या चार वर्षांपासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू असून दोन वर्षांपासून गाझामध्ये नरसंहार चालू आहे. एव्हाना जग ही जणू रोजची बाब मानू लागले असून जागतिक व्यवस्थेची पायाभरणी ढासळत आहे. नियम, नैतिकता आणि सहभागिता हे या पायाचे मूलभूत मानदंड आहेत. आंतरराष्ट्रीय समुदायाने कोणताही प्रतिकार न करता हे मानदंड मोडू दिले, तर जग 'जंगलराज'मध्ये लढता लढता संपण्याची शक्यता नाकारता येत नाही.*



**कॅप्टन (नि.) भास्कर निपूट**

गेल्या आठ दशकांपासून जागतिक व्यवस्था एका अतिशय नाजूक; पण महत्त्वाच्या तत्त्वावर उभी आहे. ते म्हणजे शक्ती नियमांच्या माध्यमातून नियंत्रणात ठेवणे. संयुक्त राष्ट्र, जागतिक व्यापार संघटना तसेच इतर शेकडो संस्था, करार आणि परिषद दुसऱ्या महायुद्धानंतर 'मत्स्यन्याय' रोखण्यासाठी उभारण्यात आले. हे सर्व पूर्णपणे परिणामकारक ठरले नाहीत, मात्र न्याय आणि नियमांचे एक आवरण जगावर होते. अमेरिका पूर्वी जागतिक व्यवस्थेची सह-निर्माती होती. आता ती डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखाली सहकार्य, कूटनीती आणि तत्त्वांच्या जागी एकतर्फी कारवाई, दिखाऊ शक्तीप्रदर्शन आणि उघड बळाला प्राधान्य देत आहे. ही केवळ अमेरिकन राजकारणाची बाब नाही. जाणीवपूर्वक असे वातावरण तयार केले जात आहे, जिथे 'ज्याची काठी त्याची म्हैस' अशी परिस्थिती असेल. ट्रम्प यांचे काही सहकारी 'धर्मयुद्धा'ची कथा सांगत आहेत आणि 'श्वेत राष्ट्रवादाला' चालना देत आहेत. न्याय विभाग बालशोषकांना वाचवत आहे, तर गृहसुरक्षा विभाग 'अप्रवासी' मुलांना अटक करत आहे. ट्रम्प यांनी आपल्या पहिल्याच कार्यकाळात संकेत दिल्यानुसार, पॅरिस हवामान करार, इराण अणुकरार, जागतिक आरोग्य संघटना, युनेस्को, मानवाधिकार परिषद यांसारख्या अनेक करार आणि बहुपक्षीय संस्थांमधून अमेरिका बाहेर पडली. त्यामधील अमेरिकन गुंतवणूक कमी झाली. या वेळी ट्रम्प यांची गती अधिक आहे. हा केवळ संस्थांपासून दूर जाण्याचा प्रश्न नाही, तर जागतिक समस्यांवर मात करण्यासाठी सामूहिक उपायांची गरज असते, या विचाराचाच त्याग आहे. जेव्हा मोठे आणि संपन्न देशच सहभागी वचनांपासून दूर जाऊन संकुचित स्वार्थ पाहू लागतात, तेव्हा संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हताच कोसळते.

आज संस्थांपलीकडे शक्तिप्रदर्शनाचेही चित्र असेच आहे. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परवानगी अथवा सहमतीशिवाय लष्करी हस्तक्षेप, हल्ले आणि अगदी राष्ट्रप्रमुखांचे अपहरण आणि हत्यादेखील घडून येतात. जिथे जीवनरक्षक औषधांच्या एका पानाच्या निर्यातीसाठी वर्षानुवर्षे चर्चा व्हायची, त्या जागतिक व्यापार संघटनेसमोर आज ट्रम्प यांच्या एकतर्फी शुल्कवाढीचे निर्णय शांतपणे पाहण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. संदेश स्पष्ट आहे, त्वरित फायदा होत असल्यास नियम-कायदे कचऱ्यात फेकले जातील. 'तांत्रिक बाबी'च्या नावाखाली मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांकडे डोळेझाक करता येणार नाही. इराणमध्ये नागरी स्वातंत्र्य आणि महिलांच्या हक्कांबाबत दीर्घकाळ टीका होत आली आहे; पण जागतिक समुदाय प्रत्येक देशासाठी समान निकष वापरेल तेव्हाच मानवाधिकारांची चर्चा अर्थपूर्ण ठरेल. त्यामुळे वादग्रस्त किंवा अमानवी कृत्यांवरही तितक्याच स्पष्टपणे प्रश्न उपस्थित केले पाहिजेत. निवडक टीका केल्यास मानवाधिकार हे सार्वत्रिक तत्त्व न राहता भू-राजकीय वादाचे साधन बनतात. बाह्य शक्तीच्या जोरावर एखादी राजकीय व्यवस्था उद्ध्वस्त केल्याने त्या समाजाची राजकीय संस्कृती किंवा सामाजिक विचारसरणी आपोआप बदलत नाही, याबाबत इतिहासात अनेक उदाहरणे आहेत; परंतु समस्या दुटप्पीपणाची नाही, तर अशा कृत्यांमुळे बेकायदेशीर अडथळे, आर्थिक हल्ले, युद्धे आणि अगदी युद्ध अपराधदेखील हळूहळू 'सामान्य' ठरू लागले आहेत, ही खरी समस्या आहे.

आज युद्धे एखाद्या अंतिम उद्दिष्टासाठी नव्हे, तर देशांतर्गत मतदारांमध्ये प्रतिमा उभारण्यासाठी, उघड शक्तीप्रदर्शनासाठी, भ्रष्टाचाराच्या खटल्यांपासून लक्ष वळवण्यासाठी किंवा इतर वादांपासून जनतेचे लक्ष हटवण्यासाठी केली जात आहेत. भारत ऐतिहासिकदृष्ट्या सार्वभौमत्व आणि हस्तक्षेपहीन संबंधांचा समर्थक राहिला आहे. जगानेही जागतिक नियम आणि नैतिक मूल्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने एक महत्त्वाचा धडा शिकला होता, तो म्हणजे अमर्याद शक्ती आणि अनियंत्रित राष्ट्रवाद मानवतेला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊ शकतो. म्हणूनच युद्धानंतरच्या काळात जागतिक व्यवस्थेची अशी चौकट उभी करण्यात आली, जिथे राष्ट्रांची शक्ती नियम, करार आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून नियंत्रित राहील. या चौकटीत सहकार्य, बहुपक्षीयता आणि नैतिक जबाबदारी यांना महत्त्व देण्यात आले; पण आजच्या भू-राजकीय वास्तवात हा प्रश्न पुन्हा उभा राहतो आहे, की जग खरोखर नियमांवर चालते आहे की पुन्हा शक्तीच्या राजकारणाकडे झुकत आहे? दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या अनेक संस्थांनी या जागतिक व्यवस्थेला आधार दिला. संयुक्त राष्ट्रे, जागतिक व्यापार संघटना, जागतिक आरोग्य संघटना यासारख्या संस्थांनी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा पाया घातला. व्यापार, सुरक्षा, आरोग्य आणि मानवी हक्क या क्षेत्रांमध्ये नियमबद्ध व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. या संस्थांचे उद्दिष्ट साधे होते. ते म्हणजे राष्ट्रांमधील मतभेद युद्धाने नव्हे, तर संवाद आणि नियमांच्या चौकटीत सोडवले जावेत.

जागतिक राजकारणात शक्तीचा प्रभाव कधीच पूर्णपणे संपला नाही. आर्थिकदृष्ट्या बलाढ्य मोठ्या राष्ट्रांनी अनेकदा नियमांना आपल्या हितानुसार वाकवले. आज या प्रवृत्तीचे स्वरूप अधिक स्पष्ट दिसू लागले आहे. बहुपक्षीय संस्थांचा प्रभाव कमी होत असून एकतर्फी निर्णयांचे प्रमाण वाढत आहे. काही मोठी राष्ट्रे आंतरराष्ट्रीय करारांपासून दूर जात आहेत, तर काही वेळा लष्करी शक्तीचा वापर करून आपले राजकीय किंवा सामरिक उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. याचे परिणाम जगभरातील संघर्षांमध्ये दिसून येतात. रशिया-युक्रेन युद्ध आणि इस्त्रायल-हमास युद्ध यासारख्या संघर्षांनी आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या मर्यादा उघड केल्या आहेत. या युद्धांमध्ये केवळ दोन पक्षांमधील संघर्ष नसतो; तर जागतिक शक्तीसंतुलन, राजकीय हितसंबंध आणि सामरिक स्पर्धा यांचे गुंतागुंतीचे जाळे असते. परिणामी, युद्ध दीर्घकाळ चालू राहते आणि त्याची मानवी किंमत प्रचंड असते. याहून गंभीर बाब म्हणजे युद्ध आणि हिंसाचार हळूहळू सामान्य मानले जात आहे. एखादा संघर्ष वर्षानुवर्षे सुरू राहतो आणि आंतरराष्ट्रीय समुदाय त्याकडे केवळ निवेदनांच्या पलीकडे फारसे पाऊल टाकत नाही. या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय कायदे, मानवी हक्क आणि नैतिक मूल्ये केवळ कागदोपत्री राहण्याचा धोका निर्माण होतो. मानवाधिकारांच्या प्रश्नातही दुटप्पीपणाचा आरोप वारंवार केला जातो. काही देशांमधील उल्लंघनांवर कठोर टीका होते तर काही सहयोगी राष्ट्रांबाबत तुलनेने सौम्य भूमिका घेतली जाते. अशा निवडक दृष्टिकोनामुळे मानवाधिकारांची संकल्पना सार्वत्रिक न राहता राजकीय साधन बनते.

नियम सर्वांसाठी समानतेने लागू होत नाहीत, तेव्हा त्यांची नैतिक ताकदही कमी होते. आजचा सर्वात मोठा प्रश्न असा आहे, की जागतिक व्यवस्थेचा पाया नेमका कोणत्या तत्त्वावर उभा राहणार? नियम, संवाद आणि सहकार्य यांवर आधारित व्यवस्था दुर्बल झाली, तर त्याची जागा शक्तीच्या राजकारणाने घेण्याची शक्यता आहे. इतिहास दाखवतो, की अशा परिस्थितीत लहान आणि विकसनशील देश सर्वात जास्त असुरक्षित ठरतात. कारण शक्तीच्या स्पर्धेत त्यांचे हित सहजपणे दुर्लक्षित होते. या पार्श्वभूमीवर बहुपक्षीयतेचे महत्त्व अधिक वाढते. जागतिक समस्यांचे स्वरूप आज इतके गुंतागुंतीचे आहे, की कोणतेही राष्ट्र एकट्याने त्यांचा सामना करू शकत नाही. हवामानबदल, महामारी, सायबर सुरक्षा किंवा जागतिक अर्थव्यवस्था या सर्व प्रश्नांना सामूहिक उत्तरांची गरज आहे. म्हणूनच नियमाधारित जागतिक व्यवस्थेचे संरक्षण करणे ही केवळ नैतिक जबाबदारी नसून व्यवहार्य गरजही आहे. भारतासारख्या देशांसाठी हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. ऐतिहासिकदृष्ट्या भारताने सार्वभौमत्वाचा आदर, अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे आणि बहुपक्षीय सहकार्य यांना पाठिंबा दिला आहे. बदलत्या जागतिक समीकरणांमध्ये भारताने आपल्या रणनीतिक हितसंबंधांचा विचार करतानाच या तत्त्वांचा समतोल राखणे आवश्यक आहे. कारण नियमाधारित व्यवस्था मजबूत राहिल्यास मध्यम आणि विकसनशील देशांना अधिक सुरक्षित आणि न्याय्य जागतिक वातावरण मिळू शकते. जागतिक राजकारणात शक्तीचा प्रभाव पूर्णपणे संपणार नाही, हे वास्तव आहे; परंतु ती शक्ती नियमांच्या चौकटीत राहिली, तरच जागतिक स्थैर्य टिकू शकते.

आजची खरी लढाई राष्ट्रांमधील नाही, तर दोन दृष्टिकोनांमधील आहे. एक नियमांवर आधारित सहकार्याचे जग आणि दुसरे केवळ शक्तीवर उभे असलेले जग. मानवतेच्या भविष्याचा मार्ग कोणता असेल, हे ठरवण्याची वेळ मात्र जगावर आली आहे.

# आता हंगाम उत्सव पालख्यांचा!



**अंतरा पारंगे**

आजच्या डिजिटल युगात मनोरंजनाची नवनवीन साधने, स्रोत उपलब्ध आहे. मात्र पूर्वी ग्रामीण भागांमध्ये मनोरंजनाचे फारसे साधन नव्हते. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी आपल्या शेतीच्या कामात व्यस्त असायचे. यातून त्यांचा थोडा वेळ आनंदात जावा यासाठी अनेक गावांमध्ये उत्सव पालखी मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. वेगवेगळ्या गावांतील देव, देवतांचे उत्सव साजरे करण्यास सुरुवात झाली. या उत्सवांमध्ये धार्मिक कार्यक्रमांबरोबरच समाज प्रबोधन तसेच सोंगण्यांच्या माध्यमातून मनोरंजन केले जात आहे. यामुळे गावातील शांतता, एकता आणि सामाजिक बांधिलकी जपली जात असल्याचे दिसून येत आहे.

गावांमध्ये शांतता रहावी, यादृष्टीने दरवर्षी गावांमध्ये उत्सव साजरे करण्याची प्रथा सुरु झाली. ही प्रथा काही गावांमध्ये गेली अनेक साठ ते सत्तर वर्षांपासून पाळली जात आहे. व्यवसाय, नोकरीनिमित्त बाहेरगावी राहणारे लोक या उत्सव पालखीसाठी आपल्या मूळ गावी येतात आणि एकत्रितपणे हा सोहळा आनंदाने साजरा करतात. सुरुवातीला गावांमध्ये देव, देवतांचे उत्सव साजरे करताना भजनांचा कार्यक्रम सुरू झाला. त्यानंतर पालखी मिरवणूक काढण्याची परंपरा सुरु झाली. यावेळी लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेकजण वेगवेगळी सोंग काढून उत्सवाचे आकर्षण वाढवतात. आजच्या पिढीलादेखील उत्सवांमधील सोंगण्याचे आकर्षण आता प्रचंड वाढू लागले आहे. तसेच, या उत्सवांमुळे गावातील शांतता, एकता आणि सामाजिक बांधिलकी जपली जात असल्याचे दिसून येत आहे. नुकताच अलिबाग तालुक्यातील महाजने या गावात गुरुवारी (दि.१२) आई महाजनाई आणि महामारी देवीचा उत्सव मोठ्या आनंदात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी सात वाजता देवतांच्या पूजनाने या उत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर दिवसभर भजनाचे कार्यक्रम झाले. त्यानंतर येणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाप्रसाद देण्यात आला. रात्री श्रींची पालखी मिरवणूक काढण्यात आली. यादरम्यान लाठी काठी, दांडपट्टा हे मर्दानी खेळदेखील खेळले जातात. पालखीसोबत वारकरी भजनांसह खालू बाजा या पारंपारिक वाद्यांचादेखील समावेश होता. यादरम्यान लाठी काठी, दांडपट्टा हे मर्दानी खेळदेखील खेळले जातात. गावांतील तरुण मंडळींसह लहानग्यांनी वेगवेगळ्या प्रकारची वेशभुषा केली होती. यामध्ये देवदेवतांच्या वेषभूषेसह, कोळी वेशभूषा, प्राणी, कार्टून अशी वेगवेगळी सोंग काढण्यात आली होती. काही सोंगांद्वारे समाजात वेगवेगळ्या घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांची माहिती समाजापर्यंत पोहचविण्याचे काम उत्सवाच्या माध्यमातून केले जात आहे. एकंदरीत या उत्सवातून सामाजिक सलोखा राखण्यासह समाज प्रबोधनाचे ही काम केले जात आहे. उत्सवांमध्ये मिरवणूकीच्या दरम्यान सोंगणं काढण्याची परंपरा आता आधुनिकतेच्या मार्गावर असल्याचे चित्र आहे. समाजात वेगवेगळ्या घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांची माहिती या सोंगण्याद्वारे पोहचविण्याचे काम उत्सवाच्या माध्यमातून केले जात आहे. यातून समाज प्रबोधनाचे ही काम केले जात आहे.

उत्सवाच्या निमित्ताने खाद्य पदार्थांसह वेगवेगळ्या प्रकारची खेळणी, घरगुती साहित्य विक्रीची दुकाने थाटू लागली. या उत्सवाच्या दिवशी गावांमध्ये खेळणी, खाऊ, हार-वेणीवाले अशी वेगवेगळी दुकानेही असतात. त्यामुळे छोट्या छोट्या व्यावसायिकांना या उत्सवांमधून आर्थिक फायदा होत असतो. जिल्ह्यातील वेगवेगळ्या गावांमध्ये उत्सवाचा हा हंगाम मे महिन्यापर्यंत सुरू राहणार आहे. २६ मार्चला वावे या गावात श्रीराम नवमीचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर बेलोशी, मल्याण, बापळे, फणसापुर, चिंचोटी, अशा अनेक गावांमध्ये हनुमान जयंती साजरी करण्यात येते. सर्व समाज घटकाला एकत्र आणण्याचे काम या गावागावांतील उत्सवांमधून होत असल्याचे दिसून येत आहे.

लोकसंसद

## जगभरात इंधन दराचा भडका, भारतात इंधन दर स्थिर!

एकीकडे अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध चांगलेच भडकले असताना पश्चिम आशियात मोठी युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी जागतिक पातळीवर इंधन पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून प्रमुख ब्रेंट क्रूड ऑइल या कच्च्या तेलाची किंमत १०६.७१ डॉलर्स प्रति बॅरलवर पोहोचलेली आहे. त्यामुळे जगभरातील ९५ देशांमध्ये पेट्रोल-डिझेलच्या दरांनी चांगलीच उसळी घेतली आहे. याची सर्वाधिक झळ कंबोडिया या देशाला बसली असून येथील इंधनाचे दर तब्बल ६७.८ टक्क्यांनी वाढले आहेत. त्यानंतर व्हिएतनाम (४९.७ टक्क्यांनी वाढ), नायजेरिया (३५ टक्के), लाओस (३२.९ टक्के) आणि कॅनडा (२८.४ टक्के) या देशात इंधनाचे दर वाढले आहेत. तर ऑस्ट्रेलिया (१८.२३ टक्के), अमेरिका (१६.५ टक्के) आणि सिंगापूर (१५.६९ टक्के) या देशांमध्ये इंधनाचे दर वाढले आहेत. विशेषतः इंधन आयातीवर अवलंबून असलेल्या देशांमध्ये असलेली मर्यादित इंधन उत्पादन क्षमता, डॉलरच्या तुलनेत तेथील स्थानिक चलनांचे झालेले अवमूल्यन इत्यादी कारणांमुळे तेथील इंधनाच्या किंमती वेगाने वाढत आहेत. तर जागतिक पातळीवर इंधनदरांचा भडका उडाला असला तरी भारतातील इंधन दर निर्धारण आणि नियंत्रण हे एक 'संमिश्र प्रारूप' (हायब्रीड मॉडेल) असल्यामुळे सरकारी मालकीच्या तेल विपणन कंपन्यांनी सद्य परिस्थितीत पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर ठेवले आहेत.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# जागतिक वन दिन

जागतिक वन दिन जगभर साजरा केला जातो. २१ मार्च १९७१ मध्ये युरोपियन कॉन्फिडरेशन ऑफ अग्रिकल्चरच्या २३ व्या बैठकीत हा दिन साजरा करण्याची संकल्पना पुढे आली. हा दिवस सर्व प्रकारच्या जंगलांच्या महत्वाविषयी जागरुकता निर्माण करतो.

प्रत्येक जागतिक वन दिनाच्या दिवशी, देशांना जंगल आणि झाडे यासारख्या वृक्षारोपण मोहिमेशी संबंधित क्रिया करण्यासाठी स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रयत्न करण्यास प्रोत्साहित केले जाते. दर वर्षी जग आपल्या जीवनात झाडाचे योगदान साजरे करते. हा दिवस आपल्या जीवनातील वनांचे महत्त्व समजून घेण्यासाठी केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या म्हणण्यानुसार जगात ६० हजारपेक्षा जास्त वृक्षांच्या प्रजाती आहेत.



सुमारे १.६ अब्ज लोक अन्न, निवारा, ऊर्जा, औषधे आणि उत्पन्नासाठी जंगलांवर थेट अवलंबून आहेत. दरवर्षी जगभरात सुमारे १० दशलक्ष हेक्टरवरील जंगलांचे काम केले जाते, हे हवेच्या बदलाचे मुख्य कारण आहे. आपण वापरत असलेली २५ टक्के औषधे या जंगलांची आहेत. न्यूयॉर्क, टोकियो, बार्सिलोना आणि बोगोटा यासह अनेक मोठ्या शहरांपैकी एक तृतीयांश शहरे पिण्याच्या पाण्यासाठी या संरक्षित जंगलांवर अवलंबून आहेत. भारतातील ग्रामीण लोकसंख्येचा महत्त्वपूर्ण भाग जंगलावर अवलंबून आहे, ज्यात इंधन, चारा, लहान लाकूड, बांबू आणि लाकूड नसलेली वन उत्पादने आवश्यक आहेत. याव्यतिरिक्त, जंगले जनावरांसाठी निवासस्थान प्रदान करतात. जंगले पृथ्वीवरील वातावरणामध्ये समतोल राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. भारतासारख्या कृषीप्रधान राष्ट्रात तर वनांचे महत्त्व विशेषच आहे. केवळ एक इंच जमिनीचा सुपीक थर निर्माण होण्यासाठी शेकडो वर्षांचा काळ लोटावा लागतो. परंतु जमिनीची धूप वनांच्या अभावी केवळ एखाद्या पावसाळ्यातच होऊ शकते. म्हणून वनांच्या संरक्षणात्मक, उत्पादक आणि आर्थिक क्षमतेमुळे त्यांना शेतकी अर्थव्यवस्थेत मोलाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्रगत राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक भरभराटीत समुद्ध वनांनी फार मोठा हातभार लावला आहे.२१ मार्च हा जागतिक वन दिवस लोकसहभागामधून साजरा व्हावा, यामध्ये शाळा, महाविद्यालयामधील युवकांचा सहभाग वाढावा, या दिवशी मोठ्या प्रमाणावर मोकळया, सुरक्षित आणि वृक्षासाठी योग्य अशा जागेवर सामूहिक वृक्षारोपण करावे ही अपेक्षा असते पण त्याचबरोबर वृक्षारोपण हे फक्त समाज-सेवा म्हणून न करता त्यामागचा वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेणेही आवश्यक असावे. हिवाळ्यात जमिनीमध्ये ओलावा असताना ३१३१३ फूट आकाराचा खोल खड्डा, त्यात पालापाचोळा, शेणखत आणि नंतर दोन वर्षांचे वृक्षबाळ तेथे लावले असता त्याचा सहसा मृत्यू होत नाही. वृक्षारोपणात दोन झाडांमधील अंतर कमीत कमी १५ फूट असावे. जे वृक्षारोपणात सहभागी होतात त्या सर्वांना त्यांनी लावलेल्या वृक्षाचे नाव, त्याचा आपल्याला, समाजाला आणि जैवविविधतेस होणारा फायदा, त्याची काळजी कशी घ्यावी याचे शिक्षणसुद्धा घेणे आवश्यक आहे. २१ मार्च हा वन दिन असला तरी तो वृक्ष सन्मानाचा दिवस आहे याचा विसर पडता कामा नये.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ मार्च
१) श्री.श्रीकांत दामोदर पाटील
मु.कुरूळ, अलिबाग
दि.२१-३-१९४३
२)श्री.हरेंभ शंकर गोगटे
चोंढी, अलिबाग
दि.२१-३-१९५२
३)श्रीम.किरण कृष्णा खराडे
चेंढरे-अलिबाग
दि.२१-३-१९५६
४)श्री.विलास काशिनाथ म्हात्रे
ब्राम्हण आळी, अलिबाग
दि.२१-३-२०२३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**इफ्तिखार रफिक अत्तार, रमजान ईद मुबारक, अलिबाग**

## श्री स्वामी समर्थ

जे दत्तगुरु, जे श्रीपाद
श्रीवल्लभ, जे नृसिंहसरस्वती
ज्यांचा आदि न अंत,
घेऊनी अवतार प्रकटले
कर्दळीवनी, भक्तांच्या उद्धारार्थ,
तेची श्री स्वामी समर्थ, तेची
श्री स्वामी समर्थ ।।
''भिऊ नकोस मी आहे पाठीशी'',
ज्यांचे असे अभय वचन, अशक्य
ही सारे करती जे शक्य.
तेची श्री स्वामी समर्थ, तेची
श्री स्वामी समर्थ ।।
संपते जिथे मर्यादा
माझी तेथूनी चक्र फिरविते
आई माझी, प्रयोजन उमगणे
सोपे नसते माउलीचे
ती घडवून आणते तेची, योग्य
असते जे तिच्या बाळांसी,
तिची स्वामी आई माझी, तिची
स्वामी आई माझी ।। विनवणी
असे तुझ्याठाई, तुझी सेवा घडो
नित्य-निरंतरी, अशीच मायेची
सावली सदैव राहो आम्हांवरी,
अशीच मायेची सावली सदैव राही
आम्हांवरी, श्री स्वामी समर्थ आई
माझी, श्री स्वामी समर्थ आई।।
- सुवि

# रमजान ईद मुबारक!

***मुस्लिम धर्मीय बांधवांना रमजान या पवित्र महिन्यामध्ये रोजा (उपवास) करण्याचा आदेश दिला गेला आहे. या कालावधीमध्ये सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत अन्नग्रहण करण्यास सक्त मनाई केली गेली आहे.***



**सलिम शेख**

इस्लामधर्म म्हणजे ईश्वरी इच्छेला शरण जाणे 'अल्लाह'च्या पुढे नतमस्तक होणे. म्हणजे सजदा करणे होय. इस्लाम धर्म हा संपूर्ण विश्वाला शांततेचा संदेश देतो. पवित्र रमजानच्या महिन्यात 'रोजा' करून भूक व गरिबांच्या यातना काय असतात ते समजून घेणे होय. प्रत्येकांच्या प्रति प्रेमभाव आपुलकी आणि सदाचाराचा भाव या महिन्यात किंबहुना संपूर्ण हयातभर आपण अंगिकारला पाहिजे. इस्लाम धर्मामध्ये हज, जकात, नमाज, रोजा, कलमा या पाच गोष्टींना विशेष महत्व आहे. यातील प्रमुख गोष्ट म्हणजे रोजा होय. सर्व मुस्लिम धर्मीयांमध्ये या पवित्र रमजान महिन्यात रोजा करून अल्लाहाच सानिध्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात व ईश्वरपारायणता अंगिकारण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. रमजान महिना हा बरकतीचा महिना आहे. मनामनात भेदभाव, मत्सर, द्वेष, दरी कमी करून परस्परांमध्ये स्नेहभाव, सद्भाव वाढविणारा हा महिना आहे. हा पवित्र महिनासंयम, त्याग, शांती, सहिष्णुता, चांगुलपणा, प्रामाणिकपणा, माणसांच्या ठायी रुजविणारा हा महिना आहे. हा महिना केवळ अल्लाहाची इबादत करावयाची व सर्व वाईट विचारांपासून कोसो दूर जायचे. या महिन्याचे पवित्र व माहात्म्य मुस्लिम धर्मीयांसाठी अनन्य साधारण असेच आहे.

वाईट बोलायचे नाही, ऐकायचे नाही, अपवित्र शब्दांचा वापर करायचा नाही, कुणाचेही मन दुखेल असे वागायचे नाही, कुणालाही आपल्यामुळे यातना होतील असे आचरण करायचे नाहीत. तन-मनाचं पवित्र जपणं आणि केवळ अल्लाहाच स्मरण करणं, इबादत करणं हेच काम अग्रस्थानी असतं. याच पवित्र महिन्यात हजरत मुहम्मद पैगंबरांना त्यांच्या अखंड साधनेचे फळ प्राप्त झाले. अल्लाहाच्या साक्षात्काराचे मनोभावे दर्शन सर्वांनी मनापासून इबादत केल्यास नक्कीच होते. आपण लोककल्याणासाठी समस्त मानवतेसाठी याच महिन्यात अल्लाहाला मागणं करतो. इमाने इतबारे पवित्र कुराणातील संदेश सर्वांसाठी देतो. याच महिन्यात अल्लाहाच्या प्रसन्नतेची, विशालतेची साक्ष आपल्याला यथोचित होते. माणसाला त्याच्या भल्याबुऱ्यांची पाप-पुण्याची जाणीव करून देणाऱ्या या महिन्यात उपवास अर्थात रोजा करायचा असतो. रोजा म्हणजे आत्म्याचे आचार विचारणाचे शुद्धीकरण करणे होय. रमजान या पवित्र महिन्यातील रोजा म्हणजे सहरीपासून ते इफ्तारीपर्यंत निव्वळ अन्न-पाण्यापासून दूर राहून भुकेची यातना सहन करणे तेवढेच नव्हे तर आखून दिलेले नियम, बंधने, मर्यादा यांचे तंतोतंत पालन या महिन्यात करावयाचे असते. या महिन्यातील अल्लाहाच्या बंदाची इबादत अल्लाहाला अधिक प्रिय असते. या पवित्र महिन्यातील इबादतिया असर, नूर काही वेगळाच असतो. केवळ काहीही न खाणे म्हणजे रोजा नव्हे तर त्याचबरोबर ५ वेळची नमाज अदा करणे, अल्लाहाला आवडेल अशाच गोष्टी करणे, वाईट विचारांपासून स्वतःला दूर ठेवणे व सद्विचार व विवेकाने वागणे. अल्लाहाला ज्या गोष्टी प्रिय आहेत त्याच करणे. नम्र राहणे, अन्याय अत्याचारापासून स्वतःला दूर ठेवणे. नीती मूल्यांची जपणूक करणे. डोळ्यात पवित्र भाव निर्माण करणे, सर्वांसाठी प्रेम मनात ठेवणे, चांगले सद्विचार ऐकणे, परोपकाराची भावना मनात जपणे, महिनाभराच्या या कठोर मनोनिग्रहानंतर ईदचा चाँद दिसला की सर्व मुस्लिम बांधवांना मोठा आनंद होतो. 'ईद का चाँद'ची मुबारक बात एकमेकांना देऊन दुसऱ्या दिवशी ईद साजरी केली जाते. सानथोर, गरीब-श्रीमंत असा भेद अल्लाहला मान्य नाही. अल्लाह सर्वांप्रती सारखेच आहेत.ईदच्या दिवशी ईदगाह काळ जाऊन नमाज अदा केली जाते. अल्लाहाचे आभार मानले जातात. एकमेकांना आलिंगन देऊन ईदमुबारक केली जाते.व त्याच दिवशी सर्वांच्या घरात 'शिरखुर्मा' हा गोड पदार्थ केला जातो. आनंदाने एकमेकांना वाटून हा गोड सण साजरा केला जातो. एक महिनाभर सर्वत्र इबादत दिसते व त्यांचे ईदमध्ये रूपांतर होऊन फक्त आनंद आणि आनंदच अर्थातच खुबी दिसते. अशा या पवित्र रमजान ईदच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! ईद मुबारक !

# साहित्य सोहळा उत्साहात साजरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



मधुबन कट्टा कोमसाप उरण यांच्या १२५ वा साहित्य सोहळा साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे उद्घाटन कोमसापचे कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ यांनी केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, पद्मश्री मधुभाईंनी ज्या भावनेने लावलेले कोमसापचे रोप उरण शाखेकडूनही बहरताना दिसत आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन प्रेरणादायी ठरणारे आहे.विश्वस्त साहित्यरत्न एल.बी., जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ जिल्ह्यातील शाखांकडून साहित्यसेवा करून घेत आहेत.

यावेळी संमेलनाध्यक्ष साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल.बी. कोमसाप का.स.जयू भाटकर, रायगडअध्यक्ष संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष गौपाळ शेळके, रायाप्पा माशाळे, सुभाष कुडके, लवेंद्र मोकळ, गझलकारा ज्योत्स्ना राजपूत, डॉ.सुभाष कटकदौड, चंद्रकांत मुकादम उपस्थित होते. कप्तान योगेश म्हात्रे, दिग्दर्शक वसंत चिरलेकर, आदर्श शिक्षक स.ज. पाटील, ए.डी.पाटील, कृष्णा पाटील, वैशाली भिडे, इ. जिल्ह्यातील २५ सामाजिक सेवकांचा आणि साहित्य क्षेत्रातील २५ साहित्यिकांचा सत्कार यावेळी करण्यात आला. तसेच, कवी रामचंद्र म्हात्रे याच्या गंध मातीचा, कवी न. ग. पाटील यांच्या 'आनंदाचे दोहे', 'मोगऱ्याचा गंध' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ज्योत्स्ना राजपूत, सिध्देश लखमदे, जनार्दन सताणे, वैशाली भिडे, अजय शिवकर, संजना जुवाटकर, अनिल भोईर, शिवप्रताप पंडित रमण पंडित, अनंत पाटील, दिप्ती कुलकर्णी, दौलत पाटील, निलेश म्हात्रे, संजय पवार, सुभाष कुडके, रायाप्पा माशाळे, संजीव पाटील, हेमंत पाटील इ. २५ कवींच्या कवितांचा प्रेक्षकांना आनंद मिळाला.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

भवानी फाऊंडेशनन एमजीएम कामोठे हॉस्पिटलच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २१ मार्च रोजी नवी मुंबईतील बेलापुर-सीबीडी येथील व्ही-टाईम्स स्केअर, सेक्टर-१५ येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करण्याचे आवाहन फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# काचबिंदू जागरूकता कार्यक्रम

**| अलिबाग | प्रतिनिधी |**




काचबिंदूमुळे नकळत दृष्टीहीनता येण्याची शक्यता असते. सुरुवातीला या आजाराविषयी पुर्णतः अनभिज्ञ असलेल्या बहुतांश रुग्णांना कालांतराने पुढील टप्प्यावर अंधत्व येण्याचीही शक्यता असते. तथापी नियमित तपासणी आणि योग्य उपचारांनी हा विकार आटोक्यात ठेवून अंधत्व रोखता येते, असे प्रतिपादन अलिबागमधील नेत्ररोग तज्ज्ञांनी जागतिक काचबिंदू सप्ताहानिमित्त आयोजित चर्चासत्रात केले.

विद्यासन एज्यूकेशन फाऊंडेशनतर्फे राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्सच्या सहयोगाने काचबिंदू जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहात शनिवारी (दि.१४) करण्यात आले होते. या कार्यक्रमात काचबिंदू : कारणे व उपाय या विषयावरील चर्चासत्रात डॉ.अशोक इंगळे, डॉ. विजय जाधव, डॉ.अजय इंगळे, डॉ.समीर नाईक, डॉ.नीरज कुमठेकर व डॉ. संपदा चितळे या नेत्ररोग तज्ज्ञांनी काचबिंदूविषयी उद्बोधक माहिती दिली. या कार्यक्रमास अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, मानव संपदा उपमहाव्यवस्थापक प्रशांत पाटील, जनसंपर्क अधिकारी राकेश कवळे, ज्येष्ठ विधीज्ञ प्रसाद पाटील यांसह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# जगताप विद्यालयात सिकलसेल थॅलेसेमिया तपासणी

**| महाड | प्रतिनिधी |**



विद्यार्थ्यांमध्ये आनुवंशिक आजारांविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जनकल्याण रक्तपेढी, महाड यांच्या वतीने एम. एम. जगताप कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, महाड येथे सिकलसेल थॅलेसेमिया उपचार जागरूकता आणि प्रतिबंध प्रकल्प अंतर्गत मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

ही आरोग्यविषयक तपासणी १६ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयात पार पडली होती. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी यांची मोफत आणि ऐच्छिक रक्त तपासणी करण्यात आली. नुकतेच या तपासणीचे अहवाल महाविद्यालयास प्राप्त झाले असून तपासणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे निगेटिव्ह अहवाल आल्याचे निदान करण्यात आले आहे. याबद्दल महाविद्यालय प्रशासनाने समाधान व आनंद व्यक्त केला.

या प्रसंगी जनकल्याण रक्तपेढीचे समन्वयक अविनाश घोलप व व्यवस्थापक महेश मोरे उपस्थित होते. तसेच डॉ. सागर रहाळकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सिकलसेल व थॅलेसेमिया या आजारांची लक्षणे, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि नियमित तपासणीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

या तपासणी करण्याकरिता महाड ग्रामीण रुणालयातील रक्त तपासणी विभागाचे विशेष सहकार्य लाभले. एम.एम. जगताप महाविद्यालय हे लोकविकास सामाजिक संस्थेचे महाविद्यालय असून जनकल्याण रक्तपेढी आणि एम. एम. जगताप कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्यात परस्पर सहकार्याचा सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. तसेच, रायगड जिल्ह्यातील महाविद्यालयीन स्तरावर सिकलसेल व थॅलेसेमिया तपासणीचा उपक्रम राबवणारे हे कदाचित पहिलेच महाविद्यालय असावे, असेही प्राचार्यांनी नमूद केले.

# 'शेतीकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून बघा'

**| रोहा | प्रतिनिधी |**



रोहा तालुक्यातील डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अधिनस्त कृषी विज्ञान केंद्र रोहा येथे नाविण्यपूर्ण उपक्रमाअंतर्गत माजी प्रशिक्षणार्थी आणि विद्यार्थी संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. केंद्रातील माजी प्रशिक्षणार्थी आणि विद्यार्थी संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

केंद्राचे प्रमुख डॉ. मनोज तलाठीसर, शास्त्रीय सल्लागार समितीचे सदस्य राजेश कोळवणकर आणि सदस्या स्वाती मालुसरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे संमेलन भरविण्यात आले होते. डॉ. प्रमोद मांडवकर यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश विषद केला. त्यानंतर केंद्राचे प्रमुख डॉ. मनोज तलाठीसर यांनी उपस्थित युवा उद्योजकांना कृषी विज्ञान केंद्रामार्फत वेळोवेळी मार्गदर्शन मिळेल आणि यापुढे यशस्वी उदयोजक म्हणूनच नावारूपाला या, असे आवाहन करून सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ठोकळ यांनी शेतीकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून बघा, शेतीही नक्कीच फायद्याची आहे, हे उदाहरणासह सांगितले. काळानुसार नैसर्गिक सेंद्रिय शेती करून जास्तीत जास्त उच्चप्रतीचे उत्पादन घ्या, असे आवाहन केले.

कार्यक्रमाला जिल्ह्यातील विविध तालुक्यातून एकूण ४५ माजी प्रशिक्षणार्थी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**शिक्षण मंत्री दादा भुसे यांचा पुढाकार | कॅनेडियन एज्युकेशन कौन्सिलसोबत करार**

# विद्यार्थ्यांनी अनुभवले विधिमंडळाचे कामकाज

**| नेरळ | प्रतिनिधी |**




कर्जत तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या झुगरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना मुंबई विधिमंडळ येथील अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा अनुभव घेण्याची संधी मिळाली. राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या शिफारशीने आदिवासी भागातील विद्यार्थांना विधिमंडळात जाता आले. दरम्यान आदिवासी विद्यार्थी आणि राज्य सरकारचा शिक्षण विभाग यांची कॅनेडियन कौन्सिल यांच्यात सामंजस्य करार देखील झाला असून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना भविष्य काळात चांगल्या संधी उपलब्ध होणार आहेत.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या पुढाकाराने आदिवासी भागातील शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल घडवण्यासाठी राज्य सरकारने कॅनेडियन एज्युकेशन कौन्सिलसोबत सामंजस्य करार करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्यासाठी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील झुगरेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना राज्याच्या अर्थ संकल्पीय अधिवेशनात कामकाज पाहण्यासाठी नेण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विधिमंडळाच्या गॅलरीत बसून बजेट चर्चा ऐकली, त्यानंतर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात कॅनेडियन एज्युकेशन कौन्सिलच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक झाली.

याप्रसंगी कॅनेडियन एज्युकेशन कौन्सिलच्या प्रादेशिक संचालक सुनीता कृष्णन, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, पदाधिकारी सूर्यकांत गायकवाड, झुगरेवाडी शाळेचे मुख्याध्यापक रवी काजळे आदी मान्यवर उपस्थित होते. कॅनेडियन एज्युकेशन कौन्सिलच्या प्रादेशिक संचालक सुनीता कृष्णन या कॅनडा येथून कॅनेडियन एज्युकेशन कौन्सिलच्या प्रतिनिधी म्हणून उपस्थित होत्या.

या बैठकीत प्रामुख्याने पूर्व-प्राथमिक आणि शालेय शिक्षण क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय मानकांचा अवलंब करण्याबाबत प्राथमिक स्तरावर चर्चा करण्यात आली. पूर्व-प्राथमिक शिक्षण यात अंगणवाड्या आणि बालवाटिकांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास, तसेच तेथील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक सक्षम करण्यासाठी आंतरराष्ट्रीय अनुभवांचा वापर करण्याबाबत बैठकीमध्ये चर्चा झाली. या करारासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता देण्यासाठी राज्यातील पूर्व-प्राथमिक आणि के-१२ पर्यंतच्या शाळांना इंटरनॅशनल ओळख मिळवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या जागतिक निकषांबाबत कौन्सिलने आपली भूमिका मांडली. तसेच शाळांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करणे, शिक्षकांना जागतिक मानकांनुसार प्रशिक्षित करणे आदी बाबींवर सुद्धा बैठकीत चर्चा झाली.

# निवडक

## शिक्षकांसाठी व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण



**चिरनेर :** दहागाव विभागातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज येथे व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता विषयक माध्यमिक शिक्षकांचे दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम दि.१७ व १८ मार्च रोजी उत्साहात पार पडले. प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापिका कांता म्हात्रे, उपमुख्याध्यापक कुटे, पर्यवेक्षिका मुकादम, तसेच अभिजीत मुद्राळे, प्रतिभा टेकाळे, प्रशिक्षण समन्वयक मुकेश महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रशिक्षणात तज्ज्ञ मार्गदर्शकांनी व्यावसायिक शिक्षणाचे बदलते स्वरूप, उद्योजकतेचे महत्व तसेच विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याधिष्ठित शिक्षण विकसित करण्याच्या विविध पद्धतींबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान उपक्रमाधारित अध्यापन, प्रात्यक्षिके व चर्चासत्रे यांचा प्रभावी वापर करण्यात आला. प्रशिक्षणात सहाय्यक सुलभक म्हणून डॉ. सुवर्णा किर्लोस्कर यांनी मोलाचे सहकार्य केले. परिसरातील विविध माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. प्रशिक्षणाच्या या उपक्रमामुळे शिक्षकांना व्यावसायिक शिक्षण व उद्योजकतेबाबत नवा दृष्टिकोन मिळाला असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या प्रशिक्षणाचा निश्चितच उपयोग होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## मैत्रीतून सामाजिक बांधिलकीचा आदर्श



**मुंबई :** मित्रांच्या नात्याला सामाजिक कार्याची जोड देत मालाड येथील इयत्ता १२ वी बॅक बेंचर ग्रुप २०१६ च्या मित्रांनी एक अनोखा उपक्रम राबवत समाजासमोर आदर्श ठेवला. त्यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबीर जिजामाता स्कूल, मालाड (पूर्व) येथे उत्साहात पार पडले. या उपक्रमाचे आयोजन सचिन तळेकर, सिद्धेश तळेकर, दिगंबर जाधव, सचिन तळेकर, सिद्धेश तळेकर, दिगंबर जाधव यांच्या पुढाकाराने यशस्वी झाले. रक्तदान शिबिराचे यंदाचे हे पहिले वर्ष होते. या शिबिरात परिसरातील रक्तदात्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेत ५२ जणांनी रक्तदान केले. या शिबिरात जमा झालेला रक्तसाठा नानावटी रुग्णालय रक्तकेंद्र यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. त्यासोबतच रक्तदात्यांसाठी अल्पोपहाराची व्यवस्थादेखील करण्यात आली होती. या शिबिरात रक्तदान करणाऱ्या रक्तदात्याला रक्तदान प्रमाणपत्र तसेच उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामुळे सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव अधोरेखित झाली.

## कृषी प्रक्रियादार, ग्राहक संमेलन




**धाटाव :** रायगड जिल्ह्यातील कृषी प्रक्रियादार व ग्राहक संमेलन मंगळवारी (दि.१८) वरसे येथील ग्रामपंचायत सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला रोहा तालुक्यासह इतर ठिकाणाहून शेतकरी वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांच्या प्रस्ताविकाने झाली. त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करताना प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री यामागील उद्दिष्ट मांडले. शेतकऱ्यांनी केलेला संघर्ष, त्यांची यशोगाथा आणि उद्योजकतेकडे वाटचाल याची माहिती इतरांना मिळावी, तसेच रोहा तालुक्यात अधिकाधिक कृषी उद्योजक घडावेत, हा या उपक्रमामागील हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. याठिकाणी उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी मार्गदर्शन करताना हा उपक्रम स्तुत्य असल्याचे नमूद केले. तसेच 'बीजामृत शेतकरी उत्पादक कंपनी' व 'ग्रोवेल शेतकरी उत्पादक कंपनी' यांच्या उत्पादनांच्या आकर्षक पॅकेजिंगचे विशेष कौतुक केले. महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यानंतर मान्यवरांनी रोहा तालुक्यातील कृषी प्रक्रिया दारांनी उभारलेल्या विविध स्टॉलना भेट देऊन उत्पादने पाहिली व शेतकऱ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या शेवटी तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

## महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**वाघ्रण :** अलिबाग तालुक्यातील कामले महसूल मंडळाच्या वतीने चिंचवली ग्रा.पं. कार्यालय सभागृहात २५ मार्चला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महसुली सेवा सेवा व मार्गदर्शन करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता सुरु होणाऱ्या शिबिरात प्रलंबित फेरफार ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डीजीटल ७/१२ आणि ८ अ उताऱ्यांचे वाटप, रहिवासी, उत्पन्न, जात प्रमाणपत्र काढणे, विद्यार्थी दाखले, नॉन क्रिमीलेअर, नवीन अर्थसाह्य योजना, एन. ए. जमिनी संदर्भात मार्गदर्शन आदी विषय या शिबिरात होणार असून प्रमुख मार्गदर्शक अलिबाग तहसीलदार विक्रम पाटील उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्यासह अनेकजण उपस्थित राहणार आहेत. तरी या शिबिराचा लाभ घ्यावा, यासाठी कामार्ले मंडळ परीसरातील विविध क्षेत्रातील लाभार्थी व स्थानिक संस्था पदाधिकारी तसेच लाभार्थींना आवाहन करण्यात येत आहे.

## अतिश सागळे यांना मातृशोक



**पाली/गोमाशी :** सुधागड तालुका शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस अतिश सागळे यांच्या मातोश्री सुजाता गोविंद सागळे यांचे अल्पशा आजाराने शनिवारी (दि.१४) भेरव येथे आपल्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या मृत्यूने सागळे कुटूंबियावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात मुलगे अतिश आणि अमित तर मुलगी अमिता आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशविधीक्रिया सोमवार दि.२३ मार्च रोजी उद्धर येथे, तर उत्तरकार्य गुरुवार दि.२६ मार्च रोजी भेरव येथे होणार असल्याची माहिती कुटुंबियांकडून देण्यात आली.

# उरणमध्ये धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



**| उरण | प्रतिनिधी |**

उरण शहरात श्री स्वामी महाराजांचा प्रकट दिन अत्यंत भक्तीमय वातावरणात व मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या पावन दिवसानिमित्त उरण परिसरातील विविध मठांमध्ये सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. उरण शहरासह नवीन शेवा, आंदनगर आणि केगाव येथील श्री स्वामींच्या मठांमध्ये प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटेपासूनच मठांमध्ये पूजा-अर्चा व अभिषेक विधी पार पडले. मंत्रोच्चाराच्या गजरात श्री स्वामी महाराजांना अभिषेक घालण्यात आला आणि त्यानंतर भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले. दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्वामींचे दर्शन घेतले. श्री स्वामी समर्थच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. नवीन शेवा येथे दुपारी पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पालखी सोहळ्यात भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला होता.

## नावात बदल

ही माझे नाव इब्राहीम अब्दुल खादर खलीलुला पासून इब्राहीम अब्दुल खादर अफगाण असे बदलले आहे. (महाराष्ट्र गॅझेट तारीख १३ ऑगस्ट १९९८ क्रमांक X ८४३३ नुसार)

## Change in name

I have changed my name from Ibrahim Abdul Khadar Khalilula to Ibrahim Abdul Khadar Afghan.
(As per Maharashtra Gazette dates 13th August 1998 number - X 8433)

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती मिळकत, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मिलींद भालचंद्र पाटील, सौ.भावना अभय गुरव, सौ.वीना प्रशांत कवळे व सौ.भारती भालचंद्र पाटील यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र | क्षेत्र-(आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड | ५१/१/५१/२/ ५१/३/५५/२/९ | ३-६०-०० | ३६.०० |

अलिबाग,
दि. २०/०३/२०२६

**MAHESH S. MHATRE**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor, Flat No.1.
Ch. Shivaji Chouk, Near Gawade Optics,
Alibag Raigad

---

दिनांक : १८/०३/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक श्री. सुजित वसंत थळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे अशिल यांच्याबरोबर चालु आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| खंदार ता. रोहा | १३ | ०-६८-३० पो. ख ०-१५-१० एकूण ०-८३-४० | ४.७५ |
| खंदार ता. रोहा | ६ | ०-४८-६० पो.ख. ०-०३-०० एकूण ०-५१-६० | ८.०५ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. अमर अशोक घरत,**
मोबा. नं. ७७९८९३०७०८

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्रीमती निता विनय ठाकर रा. माटुंगा मुंबई यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्रीमती रागिनी रेजित कुमबक्कुडी व श्री. रेजित कुमबक्कुडी रा. मिरा भाईंदर, जिल्हा ठाणे यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी सुरु आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिति पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा-जिते, ग्रुप ग्रामपंचायत जिते येथील मौजे-जिते येथील सर्व्हे/गट क्र. ६/४/१ क्षेत्र ०-३२-८० हे.आर. चौ.मी. त्यासी आकार रु. ०४-०५ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर दुसरे कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही याची ग्वाही विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर अधिकार असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पेण- रायगड.
दि. २१/०३/२०२६.

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६.
तळ मजला. शिवाजी पथ,
पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे चिंचवली व मौजे डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकती मेहताब लईक शेख उर्फ मेहताब लईक अहमद शेख यांचे मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीत असून सदरची शेतजमिन मिळकत आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे बोलणी करुन निश्चित ठरले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे :- चिंचवली, तालुका:- कर्जत, जिल्हा :- रायगड**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.प | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|
| १७/१०/अ | जिरायत २-५४-६० पोट खराबा ०-९४-४० एकूण क्षेत्र ३-४९-०० | २.३५ |
| १७/११ | जिरायत ०-७७-०० पोट खराबा ०-२३-०० एकूण क्षेत्र १-००-०० | ०.७० |
| १७/१५/अ | जिरायत ०-२५-०० पोट खराबा ०-०६-०० एकूण क्षेत्र ०-३१-०० | ०.३० |
| १७/१५/ब | जिरायत ०-३४-०० पोट खराबा ०-०७-०० एकूण क्षेत्र ०-४१-०० | ०.३१ |
| १७/१६/ब | जिरायत ०-८३-०० पोट खराबा ०-१४-०० एकूण क्षेत्र ०-९७-०० | ०.६७ |
| १७/१६/क | जिरायत ०-३४-०० पोट खराबा ०-०६-०० एकूण क्षेत्र ०-४०-०० | ०.२८ |

**मौजे:- डिकसळ तालुका:- कर्जत, जिल्हा : रायगड**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.प | आकार रुपये पैसे |
|---|---|---|
| १४/२०/अ | जिरायत ०-३०-०० पोट खराबा ०-०८-०० एकूण क्षेत्र ०-३८-०० | ०.११ |
| १४/२०/ब | जिरायत ०-७-०० | ०.०३ |

तरी सदर मिळकत किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत अगर त्यांच्या हिश्याच्या बाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा इसमांचा कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क, स्वामित्व किंवा स्वारस्य किवा कोणत्याही कराराद्वारे मागणी, विक्री, हस्तांतरण अदलाबदल, साठेकरार, वचनपावती, फरोक्त, कुळ, पोटकुळ, लीज, सबलीज गहाण (इक्वीटेबल) मृत्यूपत्र, बक्षिस, हक्कसोड, लीन, चार्ज, न्यास, वारसा हक्क, पोटगीचा हक्क, दान, ताबा कब्जा, इजमेंट, असाईनमेंट, लायसन्स, निशाणी (डिव्हाईस ) डिमाईस, कटत वाटप प्लेज, गॅरंटी, कौटुंबिक व्यवस्थापन, विकसन हक्क, सह उद्योग, नोल भागिदारी, कुलमुखत्यारपत्र, सहयोग, कर्ज, आगाऊ देणे, भूसंपादन, मृत्यू लेखी मागणी, बोजा, वापर हक्क, मनाई किंवा इतर ॲटॅचमेंट अथवा हती कोणात्याही कोर्टाचा अधिकाऱ्याचा, न्यायाधिकरणाचा महसूली व सविधी धाव मान्य (स्टेंटयूटरी) अधिकारी किंवा लवादाचा हुकूमनामा, आदेश, ॲवॉर्ड अथवा न्याय निर्णय, जप्ती, चालू वहिवाट अगर लागू केलेल्या कायद्याप्रमाणे निर्माण झालेला हक्क, कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत पुराव्यासह हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिलांबरोबर सदर मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर व जमिन मालकांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. २१/०३/२०२६

सही/-
**ॲड. अनिल एस. जाधव**
पत्ता: गाळा नं. १०, धीरा दर्शन रेसिडन्सी, प्लॉट नं.१२ सेक्टर १० ई, हनुमान मंदिर जवळ रोडपाली, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०८,

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक १. शकील अहमद उस्मान खान २. झिनत शकील खान दोघे रा. एच ६, रुम नं. २३, देवनार कॉलनी, गोवंडी, मुंबई ४०० ०४३ यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्ज्यातील खालील वर्णन केलेला निवासी सदनिका माझे स्नेही यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर माझे स्नेही यांनी केला आहे. सदर मिळकत निर्वेध असा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या स्नेही यांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे वरसोली, ता. अलिबाग येथील स.नं. ५०/१, ४,५,७ व स.नं. ५१/५ या मिळकतीतील भूखंड क्र. ६ व ७ वर बांधण्यात आलेल्या ''सुरभी सहकारी गृहनिर्माण संस्था वरसोली'' या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील बी-विंग मधील निवासी सदनिका क्र.२१, क्षेत्र ५०५ चौ.फूट बिल्टअप, ग्रामपंचायत घर क्र.११३१/६

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हिसंबंध, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथम दर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहित धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक- २०/०३/२०२६

सही/-
**शेखर विष्णू मगर**
पत्ता :- दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड.

---

## जाहीर नोटीस

दिनांक: २०/०३/२०२६

सर्व संबंधितांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री संजय राजाराम गायकवाड सध्या रा रोहा ता रोहा यांनी मौजे बिरवाडी ता रोहा, जि. रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेली शेती मिळकत ही श्री. अंकित किसन राऊळ या विद्यमान मालकांकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी रीतसर बोलणी केलेली असून त्याप्रमाणे व्यवहार ठरवलेला आहे. सदरहु शेती जमीन ही फेरफार नोंद क्र ९१६ या नोंदीने ती त्यांचे नावे मालक व कबजेदार म्हणून लागली आहे. सदरची मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिला आहे.

तरी विद्यमान मालकाव्यतिरिक्त अन्य कोणाचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, गहाण, बक्षीस, पोटगी, वारसा विश्वस्त, लीगसी, ताबा, विक्री, असाईमेंट अन्य कोणत्याही स्वरूपाचे हक्क हितसंबंध अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत खाली सही करणार यांचे ऑफीस पत्त्यावर त्यासंबंधी योग्य त्या लेखी सुचनांसह / खुलाश्यासह, पुराव्यासह हरकत नोंदवावी.

तरी त्यासंबंधी कोणांकडूनही लेखी हरकत, तक्रार निवेदन न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही अगर असल्यास सदर व्यक्तिने/पार्टीने तो सोडून दिला आहे असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीसंबंधी पुढील व्यवहार पुर्ण करतील हे कळावे.

**मिळकतीचे वर्णन:**
**गाव: मौजे: बिरवाडी, ता रोहा, जि. रायगड येथील शेती जमीन:-**

| गट नंबर | क्षेत्र: हे.आर पॉईंट | आकार रू.पै. | प्रकार |
|---|---|---|---|
| ३३ | एकूण क्षेत्र हे.०.५७.४० या पैकी हे. ०.१६.४० राऊळ यांच्या मालकीचे | १२.१९ २.९५ | भोगवटादार वर्ग १, खुद्द |

रोहा,
दिनांक : २०/०३/२०२६

सही /-
**पी. एच. पाटकर, वकील,**
धनगर आळी, रोहा रायगड
मोबाईल नंबर:- ७२७६४६१६३३

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे दोन पॅकेट प्रणाली अंतर्गत खालील कामासाठी विशेष मर्यादित निविदा मागवित आहे. **कामाचे नाव:** सविस्तर डिझाईन सल्लागार (डिडिसी) व साइट सेवा / पर्यवेक्षण – (i) गोवा राज्यातील कोकण रेल्वे मार्गावर विद्यमान 544 मीटर लांबीच्या ओल्ड गोवा बोगद्याच्या समांतर एक नवीन बोगदा तसेच विद्यमान 1561 मीटर लांबीच्या पेडणे बोगद्याच्या समांतर दुसरा नवीन बोगदा बांधकामासाठी आणि (ii) विद्यमान ओल्ड गोवा व पेडणे बोगद्यांच्या पुनर्वसनासाठी. **निविदा सूचना क्र.: केआर/डब्ल्यू/09/2025/24. जाहिरातीत नमूद कामाची किंमत:** रु. 17,13,50,000/- (जीएसटी वगळून). **बंद होण्याची दिनांक/वेळ:** 13.04.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** 38 (अडतीस) महिने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. दुरुस्तीपत्रक/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

---

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमुद वर्णनाची शेत जमिन मिळकत सौ. प्राची शाम देशपांडे व श्री.शाम सखाराम देशपांडे, राहणार पनवेल, यांच्या सामाईक मालकीची असून सदरील शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेली आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सहाण, ता.अलिबाग, | १३९ | ०-२९-६० ०-०३-८० पो.ख. ०-३३.४० एकूण | ७-६३ |

अलिबाग,
दिनांक : २०/०३/२०२६

सही/
**(ॲड. निवास ना. पाटील)**
श्री क्षेत्र, सहाण,
ता.अलिबाग, जि.रायगड.
खरेदीदाराचे वकील

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. भावेश दिलीप पाटील, रा. फ्लॅट नं. २०३, बिल्डींग नं. ७, गोकुळ कॉम्पलेक्स, डेरवली, पो. आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२२१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सापेले, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३२/५ | ०.०८.१० पो.ख. ०.०१.०० | ०.०९ | श्री. संदीप अंकुश नाईक |
| ३२/६ | ०.१०.०० | ०.०९ | श्री. संदीप अंकुश नाईक |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २१/०३/२०२६.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. दशरथ तुकाराम साबळे यांनी खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकती तीचे विद्यमान मालक मे सुचसुतीक ऐटर प्रायझेस तर्फे भागीदार श्री. प्रकाश वसंतलाल पटेल, श्री. अशोक मघजी पटेल, आणि श्री. हरेश के. पटेल यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ. मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ९२ | १९ | ३४८-०० | ३४-८० |
| ११३ | ११ | ३१०-०० | ३१-०० |
| ११३ | १२ | २१४-५० | २१-५० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दि. २१/०३/२०२६.

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता- शॉप नं.९, समर्थ कृपा हौसिंग
सोसायटी नेरळ, महेश टॉकीज जवळ,
नेरळ ता, कर्जत, जि. रायगड
पिनकोड नं.४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल सौ.कविता वैभव रांगणेकर, यांनी मौजे-मिरचोली, ता.कर्जत जि.रायगड येथील जमीन मिळकतींचे मालक श्री.शरद भास्कर जाधव यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीच्या, आणि भोगवटासदरी नावे असलेल्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, कायमच्या विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मिरचोली | १५/८ | ३.४७.०० या एकूण क्षेत्रापैकी ०.०२.५० इतके क्षेत्र विकत देणेचे ठरलेले आहे. | ०.०३ |
| मिरचोली | १५/२४ | ०.१६.०० या एकूण क्षेत्रापैकी ०.०५.६८ इतके क्षेत्र विकत देणेचे ठरलेले आहे. | ०.०४ |
| मिरचोली | २५/४/अ/२ | ०.३४.९० या एकूण क्षेत्रापैकी ०.११.८७ इतके क्षेत्र विकत देणेचे ठरलेले आहे. | १.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकती विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत/साठेकरार/कुळअखत्यारपत्र करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस:-श्री साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो.९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत दि. २१/०३/२०२६

---

## महाड नगर परिषद, महाड
**छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन,**
**महाड जि. रायगड. पिन : ४०२३०१**

दुरध्वनी व फॅक्स क्रमांक : ०२१४५-२२२३७४ Email : mahadnagarpalika@gmail.com
मुख्याधिकारी ( दुरध्वनी : ०२१४५-२२२२५५ coud.mahad@maharashtra.gov.in
जावक क्र.म.न.प./बांधकाम विभाग/६१११/२०२५-२०२६ दिनांक :-२०/०३/२०२६

**जाहीर निविदा सूचना सन २०२५-२६**

महाड नगरपरिषद हद्दीतील खालील कामांसाठी ऑनलाईन पद्धतीने टक्केवारी दराच्या ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | महाड नगरपरिषद हद्दीतील गांधारी नाका ते राष्ट्रीय महामार्ग सेवा रस्त्यापर्यंतचा रस्ता तयार करणे. | २,०१,२१,६५०/- |
| ०२ | महाड नगरपरिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक शाळा क्र.०५ समोरील मैदान विकसित करणे. | १,६७,२७,७६३/- |

तरी सदर कामांसाठी इच्छुक निविदा धारकांनी त्यांच्या निविदा नगरपरिषदेच्या अटी व शर्तीस अधीन राहून http://www.mahatenders.gov.in येथे ऑनलाईन पद्धतीने सादर कराव्यात. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ०६/०४/२०२६ अशी राहील.

सही/-
**(धनंजय कोळेकर)**
**मुख्याधिकारी**
**महाड नगर परीषद**

सही/-
**(सुनिल वसंत कविस्कर)**
**नगराध्यक्ष**
**महाड नगर परीषद**

---

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरूड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड, जि.रायगड)**

ज.म.र अर्ज ३१५/२०२५

**जाहिर नोटीस**

रिजवाना हसन कलाब,
रा.मु.खैरा खुर्द, पो.ता.रोहा, — अर्जदार
जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार रिजवाना हसन कलाब, हिचा जन्म दिनांक २५/०७/१९७० रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे राजपुरी, ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत राजपुरी कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार रिजवाना हसन कलाब, हिचा दिनांक २५/०७/१९७० रोजी जन्म झाल्याबाबत कोणतीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि.०६/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.१८/०६/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली, कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड जंजिरा,**

---

अर्जदारतर्फे ॲड.अभिजीत बाळाराम पाटील

**जाहिर नोटीस**
**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर सो. यांचे कोर्टात**
**दिवाणी चौकशी अर्ज क्र.२९/२०२६**

**१) श्री.अजित निळकंठ दिघे,**
वय :- ७० वर्षे, व्यवसाय: निवृत्त
दिवाणी चौकशी अर्ज क्र. २९/२०२६
अर्जदार क्र. १ व २ रा. डी-१/१०४, मेपल बिल्डिंग,
निळकंठ ग्रीन्स, तीकुजिनी वाडीरोड,
हॅप्पी वॅली मागे, मानपाडा, ठाणे (प),
महाराष्ट्र -४००६१०.
**स्वतःकरिता व कायदेशीर नोंदणीकृत अखत्यारपत्राद्वारे अर्जदार क्रमांक २ व ३ यांचेकडून त्यांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून.**
२) श्री. अमेय अजित दिघे,
वय :- ४० वर्षे, व्यवसाय: नोकरी,
सध्या रा. १७/१६८ हेक्टर स्ट्रीट, - अर्जदार
ऑसबॉर्न पार्क, ऑस्ट्रेलिया.
(नोंदणीकृत अखत्यार पत्राद्वारे अर्जदार क्र. १ यांना अखत्यार दिलेला आहे.)
३) ऋतुजा अजित दिघे,
वय :- ४१ वर्षे, व्यवसाय: नोकरी,
रा. द्वारा श्री. अजित दिघे, फ्लॅट नंबर १०४,
डी-१, मेपल बिल्डिंग, निळकंठ ग्रीन्स,
मुल्ला बाग, चितलसार, मानपाडा, ठाणे ४००६०७.
(नोंदणीकृत अखत्यार पत्राद्वारे अर्जदार क्र.१ यांना अखत्यार दिलेला आहे.)
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार हे वरील पत्त्यावर राहत असुन अर्जदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ यांची आई कै. रिमा अजित दिघे यांचे वारस असल्याबाबत जाहिर करून मिळणेकरिता मे.कोर्टात तसा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २४/०३/२०२६ रोजी पर्यंत मे.न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २८/०२/२०२६ रोजी माझ्या सहिनीशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक सि.ज.सि.डी.**
**अलिबाग-रायगड.**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**कनिष्ठ लिपिक सि.ज.सि.डी.**
**अलिबाग-रायगड**

---


# क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबाग मधील ऑफिस करीता** खालील जागा भरणे आहे. साईट सुपरवायझर व ऑटोकॅड ड्राफ्ट्समन मो.नं. ९९७०३९१६९७
- **अलिबाग एस.टी. स्टॅंडजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **जागा विकणे आहे :** आमची आक्षी स्तंभाजवळील २०.३ गुंठे जागा विकणे आहे. प्रवेश- अलिबाग रेवदंडा रोडवरून थेट कॉलनीचा मुख्य प्रवेश आहे. जागा पूर्ण सपाट आहे व जागेला पूर्ण कंपाऊंड आहे. जागेमध्ये २५ नारळाची व २५ सुपारीची झाडे आहेत. जागेचा प्रवेश पूर्व पश्चिम आहे. इच्छुकांनी थेट संपर्क करावा. संपर्क : ०९६१९०१६१३५

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**




## राशीभविष्य

- **मेष** : घरातले वाद घरातच मिटवा. गैरसमजामुळे मानसिक स्वास्थ दुरावेल. फाजील आत्मविश्वास नको.
- **वृषभ** : व्यवसायातील बिघडलेले संबंध सुधारतील. आश्वासने पाळाल. रेंगाळलेली कामे मार्गी लागतील.
- **मिथुन** : शब्दांचा वापर जपून करावा. भावनेच्या भरात मदत करू नका. संततीच्या मागण्या वाढतील.
- **कर्क** : प्रिय व्यक्तीचा सहवास मिळेल. आरोग्यात सुधारणा होईल. नोकरीत तुमच्या शब्दास मान मिळेल.
- **सिंह** : नातेवाईकांचे सहकार्य मिळेलच असे नाही. मिळालेली आश्वासने फसवे ठरतील. जपून रहा.
- **कन्या** : अडलेले व्यवहार यश देतील. प्रतिष्ठित व्यक्तीच्या ओळखीचा फायदा होईल.
- **तूळ** : गैरसमजाला वाव देऊ नका. मुलांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करू नका. प्रेमप्रकरणात सावध राहावे.
- **वृश्चिक** : शासकीय कामातील अडथळे दूर होतील. आर्थिक विवंचना मिटतील. संततीबद्दल शुभवार्ता.
- **धनु** : पतीपत्नीत विसंवाद निर्माण होईल. आर्थिक व्यवहारात सावध राहा. मन शांत ठेवणे गरजेचे राहील.
- **मकर** : नातेवाईकांचा सल्ला उपयोगी पडेल. तुमचे लिखाण प्रसिद्ध होईल. शेजाऱ्यांशी उत्तम संवाद साधाल.
- **कुंभ** : गृहकर्तव्यास प्राधान्य द्यावे लागेल. नातेवाईकांच्या लुडबुडीस आळा घालावा लागेल. व्यसन टाळा.
- **मीन** : अचानक धनप्राप्तीचे योग. आवडीच्या क्षेत्रात काम कराल. स्वगुणांची झलक दाखवाल.

सौंदर्यसाधना

## उपयुक्त टोनर्स

त्वचेच्या देखभालीत क्लिंजिंग, टोनिंग आणि मॉईश्चरायजिंगची महत्त्वाची भूमिका असते. त्यातही टोनिंगच्या प्रक्रियेला विशेष महत्त्व असतं. बाजारात विविध कंपन्यांचे क्लिंजर्स, टोनर्स आणि मॉईश्चरायजर्स मिळतात. नैसर्गिक उत्पादनांचा वापर करणाऱ्या महिला गुलाब पाण्याने टोनिंग करतात. मात्र त्वचेचा पोत लक्षात घेऊन टोनरची निवड करायला हवी. हा टोनर घरच्या घरी तयार करता येईल. कोणत्या प्रकारच्या त्वचेला कोणता टोनर हवा याबाबतचं मार्गदर्शन...

✻ सर्वसामान्य त्वचेसाठी ॲपल सिडर व्हिनेगार आणि ग्रीन टी युक्त टोनर वापरा. ॲपल सिडर व्हिनेगारमध्ये अँटी फंगल घटक असतात. यामुळे चेहऱ्यावरच्या मुरुमांची समस्या कमी होते. त्वचेच्या पीएच बॅलन्सचं संतुलन राखण्याचं काम ॲपल सिडर व्हिनेगार करतं. तसंच मृत त्वचाही निघून जाते. ग्रीन टी मधलं कॅफेन आणि अँटी ऑक्सिडंट्स त्वचेचं रक्षण करतात. हे टोनर बनवण्यासाठी पाव कप ॲपल सिडर व्हिनेगारमध्ये एक कप ग्रीन टी उकळलेलं पाणी घाला. तुमचं टोनर तयार होईल. **(क्रमश:)**

## २१ मार्च

दिनविशेष

**२०१३** : वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरिक्षक सचिन सूर्यवंशी मारहाणप्रकरणी क्षितिज ठाकूर आणि राम कदम गुन्हे शाखेसमोर शरण.
**२०१६** : संबंध सुधारण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांचा क्युबा दौरा सुरू.
**२०१७** : केंद्र सरकारने रोखीच्या व्यवहारांवरील मर्यादा तीन लाखांवरून दोन लाखांवर आणली.
**२०१८** : कॅबिनेटने 'आयुष्यमान भारत' लाँच करण्यासाठी मंजुरी दिली.

व्हॉट्स न्यू?

## रोबो करणार युद्ध!

दोस्तांनो, माणसाला उपयोगी पडणारा रोबो आता लढाईच्या मैदानातही दिसेल. अनेक ठिकाणी अशा रोबोंची चाचणी सुरू आहे. रशियाचं लष्कर स्वयंचलित रणगाडा आणि ड्रोनची चाचणी करत आहे तर ब्रिटिश लष्करानेही रोबोटिक तंत्रज्ञानासाठी ६०० कोटी रुपये गुंतवणूक करायचं ठरवलं आहे.

रशियाच्या 'अँडव्हान्स रिसर्च फाउंडेशन'तर्फे असे रोबो तयार केले जात आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'रोबो आर्मी' तयार करण्याचं आमचं उद्दिष्ट असल्याचं या फाउंडेशनचं म्हणणं आहे. रशियन लष्कर चाचणी घेत असलेला ड्रोन सध्या रिमोट कंट्रोलवर चालतो. मात्र लवकरच तो पूर्णपणे स्वयंचलित असेल. ब्रिटिश लष्कराच्या ड्रोनचा आकार माणसाच्या हाताच्या तळव्यापेक्षाही लहान असेल. हे ड्रोन सैनिकांना धोक्याच्या सूचना देतील. आकाशात विहार करत असलेले हे ड्रोन एखाद्या माशीसारखे दिसतील. खराब हवामानातही ते काम करू शकतील. अर्थात असे रोबो भविष्यात माणसांसाठी धोकादायक ठरू शकतात, असं काही शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

### पंचांग

**शनिवार, २१ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु. ३ **(रमजान ईद)**,
चंद्रराशी : मेष,
नक्षत्र : अश्विनी, योग : ऐंद्र,
सूर्योदय ६.४४, सूर्यास्त ६.४८

### फॉरवर्ड्स

**बेदख़ल क़िया था क़ुछ ख्वाइशों क़ो ज़िन्दग़ी सें...**

**कम्बख़त ज़रूरतें बनकर गलें सें हीं लिपट ग़यी...!**

आरोग्यमंत्र

## इच्छाशक्ती ठेव

एखाद्या गंभीर आजाराचं निदान ऐकून नैराश्यावस्थेत जाणारे युवक-युवती इच्छाशक्तीच हरवून बसतात. पण मंडळी, या बॅडपॅचमधूनही बाहेर पडता येतं. बॉलिवूडमधले अनेक तारे तारका अशा प्रसंगी आदर्श म्हणून समोर ठेवावेत. इच्छाशक्ती, प्रगत उपचार यांच्या बळावर त्यांनी नकारात्मक परिस्थिती योग्य रितीने हाताळली आहे.



✻ अमिताभ बच्चन- आज 'बिग बी' अनेक ॲडस्‌मध्ये आरोग्याची काळजी घेण्याचं आवाहन करताना दिसतो. पण एके काळी अमिताभला टीबीसारख्या घातक आजाराचा सामना करावा लागला होता. ✻ शाहरुख खान- शाहरुखने अनेक आजारांचा सामना केला आहे. त्याच्या डोळे, गुडघे आणि घशावर शस्त्रक्रिया झाली आहे. तरीही तो तंदुरुस्त आहे. ✻ मनीषा कोईराला- एके काळी टॉप स्टार राहिलेली मनीषा २०१२ मध्ये ओवेरियन कर्करोगाने त्रासली होती. आज ती त्यातून ती पूर्णपणे बाहेर पडली आहे. ✻ सोनम कपूर- आजची स्टार आयकॉन असणारी सोनम एके काळी लठ्ठ आणि मधूमेहग्रस्त होती. पण आरोग्यदायी लाईफस्टाईल आणि नियमित व्यायामाच्या बळावर तिने यावर मात केली. ✻ सलमान खान - सल्लूमियाला ट्राईजेमिनल न्यूराल्जिया नामक आजार होता. या आजारात रुग्णाला असह्य वेदना सोसाव्या लागतात. यापासून सुटका मिळवण्यासाठी २०११ मध्ये सलमानवर शस्त्रक्रियाही करण्यात आली होती. आता तो तंदुरुस्त आहे.

### स्मार्ट फिटनेस

✻ वेट ट्रेनिंगमुळे शरीरावर ताण येतो. याव्यतिरिक्तही बऱ्याच गोष्टींमुळे ताण येतो. जास्तीच्या ताणामुळे शरीराचं चक्र बिघडतं. त्यामुळे व्यायामाचा आणि मानसिक ताण यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करा. आठवड्यातून तीन ते चार वेळा जीममध्ये जा. सौम्य स्वरुपाचं वेटलिफ्टिंग करा. ✻ 'फेल्युअर ट्रेनिंग'मध्ये बरेच ट्रेनर्स चुकीच्या पद्धतीचा अवलंब करतात. जड उपकरणासह केलं गेलेलं 'फेल्युअर ट्रेनिंग' शरीराला दमवून टाकतं. यामुळे चेतासंस्था आणि सांध्यांवर बराच ताण येतो. ✻ 'फेल्युअर ट्रेनिंग'दरम्यान 'लेग प्रेस', 'चेस्ट प्रेस'सारखी मशीन्स वापरा.

स्टाईल स्टेटमेंट

## असं जपा वैविध्य

जीन्स, शॉर्टस, फॉर्मल्स, चिनोज यापैकी कशावरही शोभून दिसणारे टी शर्ट तुमच्या वॉर्डरोबमध्ये हवेतच. यातही तुम्ही वैविध्य जपू शकता. कसं ते पहा.



✻ ब्लॅक आणि व्हाईट टी शर्टला पर्याय नाही. मात्र लवेंडर, बेज अशा पेस्टल शेड्‌ससोबतच नेव्ही ब्लू, बॉटल ग्रीन, लाल रंगाचे टी शर्टसही खरेदी करा. यामुळे लेअरिंगचे बरेच पर्याय खुले होतात. ✻ प्रिंटेड टी शर्ट खरेदी करा. अशा टी शर्टचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे 'मिनिमलिस्ट' आणि दुसरं म्हणजे 'ओव्हर द टॉप प्रिंट'. जॉगर्स किंवा ट्राउझरवर कॅरी करण्यासाठी 'मायक्रो डिट्सी', 'कॉन्व्हरसेशनल' आणि 'टायपोग्राफी'सारख्या 'मिनिमलिस्ट' प्रिंट्सची निवड करा. 'ओव्हर द प्रिंट'मध्ये 'बोल्ड ग्राफिक्स' किंवा 'फ्लोरल'ला पसंती द्या. ✻ टी शर्टचा सर्वात स्टायलिश प्रकार म्हणजे 'पोलो नेक'. अशा टी शर्टशिवाय मुलांचा वॉर्डरोब अपूर्णच राहील. पहिल्या डेटला पोलो नेक टी शर्ट घाला. ✻ उन्हाळ्यात 'सुपिमा कॉटन'चे टी शर्ट घ्या. नेहमीच्या कॉटनपेक्षा 'सुपिमा कॉटन' चार पट मऊ असतं. ✻ फुल स्लीव्ह टी शर्टही खूप छान दिसतात. योग्य बॉटम्स आणि ॲक्सेसरीजनी तुम्ही हा लूक खुलवू शकता.

खेचाखेची

## जावं की नाही?

मला काल लग्नाचं निमंत्रण आलं. पत्रिकेत खाली लिहिलं होतं,
**'युवर प्रेझेन्स इटसेल्फ इज अ गिफ्ट. वी डोन्ट वाँट एनी गिफ्ट्स ॲट वेडिंग.'**

हे वाचून मी कन्फ्युज झालो. म्हणून पुन्हा पुन्हा वाचलं. आता तासभर झालाय पण मी अजूनही कन्फ्युज्ड आहे.

आता तुम्हीच सांगा, मला नक्की बोलावलंय की नाही?

### वेगळं काही

पुढच्या पिढीला याचं महत्त्व कळावं यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. त्यांनी एका टेलिफोन बूथचं रुपांतर म्युझियममध्ये करून टाकलं. 'ब्रिटन टेलिकम्युनिकेशन'ने वापरात नसलेले ४३ टेलिफोन काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता. मात्र 'वॉरले कम्युनिटी असोसिएशन' नामक संस्थेने त्यांचं जतन करायचं ठरवलं. २००८ पासूनच ही संस्था विविध मार्गांने पैसे जमवून पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करते आहे. याच प्रयत्नांतून पश्चिम यॉर्कशायरमधल्या एका टेलिफोन बुथचं रुपांतर म्युझियममध्ये करण्यात आलं. हे म्युझियम अवघ्या ३६ चौरस फूट परिसरात पसरलं आहे. एवढ्या छोट्या जागेत बऱ्याच गोष्टी ठेवण्यात आल्या आहेत.

ॲक्सेसरीज

## इयररिंगची खरेदी करताना...

पेहराव कितीही सुंदर असला तरी त्याला साजेशा ॲक्सेसरीजमुळे लूक अनेक पटीने उजळतो हे कोणीही नाकारणार नाही. या धर्तीवर पाहता भारतीय असो की पाश्चात्य, या दोन्ही प्रकारच्या साजेसे कानातले नखरा खुलवून जातात. मात्र इयररिंग खरेदी करताना चेहऱ्याचा आकारही लक्षात घ्यावा.



उदाहरणार्थ, चेहरा गोल असेल तर तो लंबुळका भासवण्यासाठी ओव्हरसाईज इयररिंग छान दिसतात. ✻ चौकोनी चेहरा असणाऱ्या सखींनी रुंद इयररिंग वापरु नये. या महिलांनी झुमके वापरावे. या चेहऱ्याला हेवी इयररिंग अधिक सूट करतात. टॉप्सही शोभून दिसतात. ✻ आयताकृती चेहरा असल्यास जॉ लाईन शार्प आणि हनुवटी गोलाकार असते. या महिलांनी स्टड्‌स वापरणं योग्य ठरतं. त्या चंकी स्टड्‌स, बटन अथवा राऊंड स्टड्‌सही वापरु शकतात. ✻ या बाबतीत ओव्हल शेप चेहरा असणाऱ्या महिला लकी असतात. या चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारच्या इयररिंग्ज शोभून दिसतात. ✻ चेहरा दीपिकासारखा हार्ट शेपचा असेल तर त्रिकोणी, काहिशा रुंद इयररिंग्ज तुमच्यासाठीच बनल्या आहेत हे लक्षात घ्या.

## सुडोकू ८०


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ६ | ३ | ८ | ७ | ४ | | | |
| १ | | ७ | २ | | ५ | ३ | | ९ |
| | | | ९ | | १ | | | |
| | | | | | | | ५ | |
| ५ | | २ | | ४ | | १ | | ७ |
| | १ | | | | | | | |
| | | | ३ | | ८ | | | |
| २ | | ४ | १ | | ७ | ५ | | ८ |
| | | | ४ | २ | ६ | ७ | ३ | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ७९चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ९ | १ | ३ | ४ | २ | ८ | ५ | ६ |
| ३ | ४ | ६ | ९ | ८ | ५ | १ | २ | ७ |
| २ | ५ | ८ | १ | ६ | ७ | ४ | ३ | ९ |
| १ | ८ | ४ | ७ | ३ | ६ | ५ | ९ | २ |
| ६ | ७ | ५ | ४ | २ | ९ | ३ | १ | ८ |
| ९ | ३ | २ | ५ | १ | ८ | ६ | ७ | ४ |
| ८ | २ | ३ | ६ | ९ | १ | ७ | ४ | ५ |
| ५ | १ | ९ | ८ | ७ | ४ | २ | ६ | ३ |
| ४ | ६ | ७ | २ | ५ | ३ | ९ | ८ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ८०




**आडवे शब्द :-**
१) बोलकी बाहुली कार्यक्रमातील रामदास पाध्ये यांच्या बाहुल्याचे नाव
५) जुगार
६) विश्रांती
८)अथवा, किंवा
९) लोणच्यातील द्रवमसाला
१०) मीठ
१२) ✻✻✻ निर्यात
१४) मनाची फिरणारी इच्छा
१६) राक्षसी, डाकीण
१७)कपाळ
१८)वैमानिकाचे वाहन
२०) पोर्णिमाच्या विरुद्ध
२१) सर, हार
२३) पंख
२४) अग्नी
२६) आश्चर्य
२७) एक आदिवासी जमात
२९) एक चतुर्थांश भाग
३०) राक्षस
३१) चणचण, न्यूनता
३४) जिंकलेला (इं.)
३६) घागरा
३७) चट्टा
३८) पावसाची झड
४०) युद्ध
४२) केशवृद्धीची सुगंधी वनस्पती
४४) माल साठविण्याची जागा
४५) चांगली वागणूक
४८) टपाल (इं.)
५१) हत्ती
५३) बाजाराचा
५५) झाडाची पाने, काटक्या इ.
५७) बोकड
५९) म्हैस, शिवाय
६१) पातळ खांब
६२) भगर
६३) माकडातील एक प्रकार
६४) सरळ लांब बांबू
६६) कर्णेंद्रिय
६९) राखेचा ढीग
७२) दुबळा, गरीब
६५) मासा
७३) विणून कापड तयार करण्याचे साधन
७४) राजसूख
७६) तरतरी आणणारे उष्ण पेय
७७) समुदाय
७८) कोवळ्या दुधाचा पदार्थ
७९) संगीतातील एक रागिणी, अमर ✻✻✻ एक जुना मराठी चित्रपट

**उभे शब्द :-**
१) भारी किमतीचा
२) सरपणाचे दुकान
३) टिंगल
४) अरण्यवास
५) च्यासह
६) सिंहाच्या मानेभोवतीचे केस
७) रात्र
११) चामखीळ
१२) नभ
१३) पुष्कळ
१५) यज्ञात टाकण्याचे इंधन
१६) पेरणी
१९) पुरुष
२१) श्रीमंत
२२) दह्याचे पातळ पेय
२४) अखेर, शेवट
२५) किंचित छोटा
२६) लग्नाचा मुलगा
२७)पत्ता
२८) कणीदार पीठ
२९) पातक
३२) धमनी
३३) हत्ती
३५) दारुचा एक प्रकार
३९) निकट, आजूबाजूस
४१) आवड, धातूचा द्रव
४३) तह, ऐक्य, सलोखा
४६) अवस्था
४७) पर्वत
४९) अर्धांगवायू
५०) शेगावचा एक प्रसिद्ध खाद्यपदार्थ
५२) एक गळीत धान्य
५३) फुलांची माळ
५४) पृथ्वी
५६) पवित्र
५७) दुष्काळ
५८) सोन्याचा धागा
६०) फणसातील खाद्यभाग
६५) निर्भेळ
६६) धातूची कड घासण्याचे खडबडीत हत्यार
६७) शरीर
६८) देखावा, सजावट
७०) उट्टे, सूड
७१) कोवळी फांदी
७३) महिना
७५) छाती

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर





**मराठी चित्रपट व नाटकात कामे करणारे मधु आपटे अर्थात मधुकर शंकर आपटे यांचा जन्म कोल्हापुरातील एका गरीब घराण्यात होऊन सुद्धा त्यांनी पुढे एकूण २०० चित्रपटांत व २० नाटकांमध्ये कामे केली. १ मार्च हा त्यांचा जन्मदिन आहे तसेच १३ मार्च हा त्यांचा स्मृतिदिन आहे, त्यानिमित्ताने आपण त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेऊया.**

# हास्य अभिनेता मधु आपटे

रंगबहार

शरद कोरडे





एक मार्च १९१९ मध्ये कोल्हापुरातील एका गरीब घराण्यात मधु आपटे यांचा जन्म झाला. घरच्या भाऊबंदकीच्या ईस्टेटीच्या वादावरून घरात कलह चालू असतानाच त्यांच्या वडिलांचे ऐन उमेदीतच निधन झाले व त्यानंतर त्यांच्या आई गंगुबाई आपल्या तीन मुलांना घेऊन भावाकडे म्हणजे ताम्हणकरांकडे आल्या. मुलांच्या संगोपनासाठी त्यांनी लोणची, पापड, हलव्याचे दागिने, जरीच्या टोप्या इत्यादी तयार करून विकण्याचा व्यवसाय केला आणि मुलांचे संगोपन केले. मधुच्या नवव्या वर्षी त्याला आलेल्या सततच्या व अति तापामुळे त्याची वाचा गेली. मिरजेतील डॉक्टर वाणलेस यांनी त्यांचे घशाचे ऑपरेशन केले. त्यामुळे त्यांना थोडे अडखळत अस्पष्टपणे का होईना बोलता येऊ लागले, पण त्यांचा तोतरेपणा कायम आयुष्यभर राहिला. घरची गरीबी असल्यामुळे मुलांची शाळेची फी भरता न आल्याने व अंगात हुशारी, स्मरणशक्ती व उत्तम हस्ताक्षरे असूनही मुलांना पाचवीच्या पुढे शिक्षण घेता आले नाही. मधू आपटेंच्या मामांना १९२९ मध्ये प्रभात फिल्म कंपनीत नोकरी लागली. मधुचा मोठा भाऊ अनंत याला प्रभात मध्ये बालनट म्हणून नोकरी लागली व मधुही १९३४ मध्ये पेंटिंग खात्यात कामाला लागला.

आपल्या अपंगत्वावर मात करून त्यांनी प्रथम उदरनिर्वाहासाठी प्रभात फिल्म कंपनीमध्ये नोकरी पत्करली व पुढे फत्तेलाल मामा व व्ही शांताराम यांच्या प्रेरणेमुळे त्यांनी प्रथम चित्रपटात बालकलाकार म्हणून कामाला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी अनेक हिंदी, मराठी चित्रपटांत कामे केली. नाजूक प्रकृतीमुळे ते जादा कष्ट करू शकत नव्हते तरीही त्यांनी वर्षभर ते काम केले. कंपनीचे एक मालक साहेबमामा फत्तेलाल यांच्याशी त्यांची ओळख झाल्यावर त्यांनी मधु आपटे यांची बदली स्टील डिपार्टमेंट मध्ये केली, त्यामुळे पुढे मधुच्या तोंडाला रंग लागला व ते अभिनेते झाले. एक दिवस योगायोगाने स्टील डिपार्टमेंट मध्ये व्ही. शांताराम यांचा फोन आला. तेथे इतर कोण नसल्यामुळे फोनमधुनेउचलला. अवघडलेल्या व भ्यालेल्या मधुने त्यांच्याशी घाबरत तोतरेपणाने बोलणे केले, ते बापूंना काहीही कळले नाही, परंतु त्यानंतर त्यांनी चौकशी करून मधुला आपल्या केबिनमध्ये बोलावून घेतले. बापूंनी बोलावले आहे त्या अर्थी आपल्या हातून काहीतरी चूक झाली असेल व बापू शिस्तप्रिय असल्यामुळे त्यांच्यासमोर जाताना सारे कलाकार घाबरत असत. मधु बापूंच्या समोर गेल्यावर घाबरत उभा राहिला. त्यांनी त्यांना अनेक प्रश्न विचारले त्याची बोलण्याची पद्धत तोतरेपणा व त्यात लपलेला विनोदीपणा बापूंनी हेरला व त्याला 'संत तुकाराम' या चित्रपटात 'सालोमालो' नावाच्या ईरसाल व्यक्तिमत्वाची भूमिका दिली व मधु आपटे अभिनेता झाला.


पुढे प्रभातच्या अनेक चित्रपटात मधु आपटे यांनी छोट्या मोठ्या भूमिका केल्या व ते प्रसिद्धीच्या झोतात आले. त्यानंतर प्रभात फिल्म कंपनी पुण्याला गेली तेव्हा मधु आपटे पुन्हा बेरोजगार झाले.

सीताकांत लाड व चित्तरंजन कोल्हटकर यांनी मधु आपटे यांना आकाशवाणीवर संधी मिळवून दिली, तथापि त्यांनी आकाशवाणी सोबतच काही नाटकातून भूमिका करण्यास सुरुवात केली. १९४० मध्ये त्यांनी मास्टर दिनानाथ मंगेशकर यांच्या नाटक मंडळीतूनही भूमिका केल्या. 'संगीत भावबंधन' या नाटकातून त्यांना लतादीदींसोबत काम करण्याची संधी मिळाली. अधून मधून ते बाबुराव गोखले यांच्या नाटकांतून ही भूमिका करत असत, पण नाटकांतही जम न बसल्यामुळे त्यांनी शशधर मुखर्जींच्या फिल्मीस्थान कंपनीत नोकरी धरली. तेथे त्यांचा परिचय चित्रमाऊली सुलोचनादिदींशी झाला. त्यांच्या ओळखीने मधुला हिंदी चित्रपटांतून छोट्या छोट्या भूमिका मिळू लागल्या. पुढे सुलोचनादिदींनी मधु आपटे यांना आपला मुलगा मानून स्वतःच्या घरात आश्रय दिला. मधु दीदींसोबत चित्रीकरणाचे वेळी मदतनीस म्हणून म्हणून जात असल्यामुळे त्याची अनेक निमात्यांची ओळख झाली व मधुला कामे मिळू लागली. ओमप्रकाश, राजेंद्र कुमार, मनोज कुमार यांच्यासोबत मधुला कामे करण्याची संधी मिळाली. त्यांतील राजेंद्रकुमार यांच्यासोबत मधुने 'आप आये बहार आयी' 'अंजाना', 'आई मिलन की बेला', 'गँवार' आदी चित्रपटांतून कामे केली. त्याबाबत राजेंद्र कुमार म्हणत असे, 'आप डायलॉग बोलते बोलते कहा रुकेंगे ये मालूम नही पडता, लेकिन आपके साथ मजा आती है'. राजेंद्र कुमारने मधुला एक घड्याळही बक्षीस दिले होते. निर्माते वसंत जोगळेकर यांनी आपल्या 'कारागीर' या चित्रपटात ओम प्रकाश व ललिता पवार या भांडकुदळ जोडप्याच्या इरसाल मुलाची भूमिका दिली होती. यांच्या तोतरेपणामुळे व बोलण्याच्या शैलीमुळे भूमिका मिळत असल्या तरी तेवढ्यावरच ते थांबत नसत, तर समोरच्या कलाकाराच्या बोलण्यावर ही ते विनोदी पद्धतीने रिॲक्ट होत प्रतिक्रिया देत असत व धमाल उडवित असत. त्यांच्याबद्दल बोलताना ओम प्रकाश म्हणत असत, 'मधु सोबत काम करताना मी चेहऱ्यावरील हावभाव करीत नसे, कारण मला माहित होते की त्यावेळी प्रेक्षक फक्त मधुकडेच पाहत असतील. त्यामुळे मला फार मेहनत घ्यावी लागत नसे'. मधु आपटे यांनी आपल्या चाळीस वर्षांच्या कारकिर्दीत हिंदी मराठी सुमारे २०० चित्रपटांतून व २० नाटकांतून कामे केली. व्यंग असूनही बुद्धीचातुर्य व हजरजबाबी असलेल्या या कलाकाराचे १३ मार्च १९९३ रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ७५ व्या वर्षी पुण्यामध्ये निधन झाले.

मधु आपटे यांनी सौभाग्य, गंमत जंमत, घोळात घोळ, फटाकडी, बदला, अफलातून, कडकलक्ष्मी, माझा पती करोडपती, अशी ही बनवाबनवी, नवरी मिळे नवऱ्याला, हा खेळ सावल्यांचा, सगळीकडे बोंबाबोंब, आम्ही जातो आमच्या गावा, थांब लक्ष्मी कुंकू लावते, आपली माणसं, जीवा सखा, मधुचंद्र, चटक चांदणी, पाटलीण, ऐकावं ते नवलच, शेवग्याच्या शेंगा, धाकटी सून, आदी मराठी चित्रपटांतून कामे केली, तसेच 'एक सपेरा एक लुटेरा', 'आप आये बहार आयी', 'अनपड', 'चुनौती', 'काजल', 'एक के बाद एक', 'आये दिन बहार के', 'आशा', 'आया सावन झुमके', 'अंजाना', 'माँ और ममता', 'ऑंचल' आदी हिंदी चित्रपटातून भूमिका केल्या. तसेच दूरचित्रवाणीवर याकूब सैद यांच्यासोबत 'हास परिहास', या मालिकेतूनही भूमिका केली. मधु आपटे यांच्या विनोदी भूमिकांतूनही एक कारुण्याची झलक असे. 'आम्ही जातो आमच्या गावा' या मराठी चित्रपटात नायिका उमा यांच्यासाठी वेडा झालेल्या अपंग तरुणाचे काम त्यांनी केले होते. नायक श्रीकांत मोघे जेव्हा नायिकेला भेटायला येतो, त्यावेळी नायिका मधुला दूरच्या झाडाला फेरी मारून येण्याचे व आपले प्रेम सिद्ध करण्याचे आवाहन करते, त्यावेळी तो ज्या पद्धतीने धावत, पडत येतो व नंतर गांधीलमाशा त्याचा पाठलाग करतात हे दृश्य विनोदासोबत कारूण्यही दर्शवत असते. मधु आपट्यांच्या अभिनयात ही कारुण्याची झलक अनेक भूमिकांतून दिसून आली. प्रतिकुल परिस्थितीत त्याने कष्टाने व संयमाने आपले स्थान निर्माण केले. असा कलाकार होणे नाही. ●●

# मराठी चित्रपट विश्वाचा सोंगाड्या दादा कोंडके

श्रीराम शेटये



विच्छा माझी पुरी करा या वसंत सबनीस-लिखित वगनाट्यामुळे कोंडके अभिनेता म्हणून प्रसिद्धीस आले. इ.स. १९६९ साली भालजी पेंढारकरांच्या तांबडी माती चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. सोंगाड्या (इ.स. १९७१), आंधळा मारतो डोळा (इ.स. १९७३), पांडू हवालदार (इ.स. १९७५), राम राम गंगाराम (इ.स. १९७७), बोट लावीन तिथे गुदगुल्या (इ.स. १९७८) हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट होत.

दादा कोंडके हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते..... व्हाईट कॉलर्ड (पांढरपेशा) वर्गाला त्यांच्या कमरेखालच्या विनोदांनी त्यांच्या सिनेमांपासून दूरच ठेवले. पण पिटातल्या प्रेक्षकांनी त्यांना जे डोक्यावर उचलून घेतले त्यानेच त्यांची कारकीर्द यशस्वी करवली. द्विअर्थी विनोदाकडे झुकणारे संवाद, चित्रपटातल्या तारिकेशी पडद्यावरची नको तितकी घसट व ह्या सर्वांमुळे सतत सेन्सॉर बोर्डाशी उडणारे खटके/वादंग ह्यांनी त्यांच्या चित्रपटांना सतत निगेटिव्ह प्रसिद्धी मिळत राहिली. पिटातल्या प्रेक्षकांना ह्या सर्वांशी काही देणे घेणे नव्हते. दादांचा प्रेक्षक वर्ग ठरलेला असे. दूरदर्शन अस्तित्वात नसलेल्या काळात - दिवसभर घाम गाळून विरंगुळ्याच्या चार क्षणांसाठी पिटात शिट्या वाजवत 'गंगू'च्या तंगड्यांची चर्चा करणारा वर्ग हा त्यांच्या चित्रपटांचा 'मायबाप' होता.

८ ऑगस्ट १९३२ ला जन्मलेल्या दादा कोंडकेंचे खरे नांव कृष्णा कोंडके होते. नायगाव - मुंबईच्या मिलमजूर कामगाराच्या घरात गोकुळाष्टमीला जन्मलेल्या ह्या ''कृष्णा'' ने नावाचे सार्थक मराठी चित्रपट सृष्टीच्या पडद्यावर दाखवून दिले. बँड पथकातून सुरुवात करून हळूहळू वगनाट्य, नाटके ह्यांनी सुरुवात केलेल्या दादांचे चित्रपट जीवन मेहनतीने साकारले गेले. नाटकांच्या निमित्ताने केलेल्या राज्यभराच्या दौऱ्यांनी दादांना सर्वसामान्यांसाठी करमणुकीचे महत्त्व व कोसा-कोसांवर बदलत जाणारी रसिकता कळली व हेच पुढे त्यांच्या यशाचे गमक सिद्ध झाले.

दादांचे बालपण नायगावच्या - मराठी कामगार वस्तीतल्या चाळीत गेले. लहानपणापासून खोड्याळ (काहीसे मवाली) असलेल्या दादांनी 'अपना बाजार' येथे नोकरी केली. सोडावॉटर बाटल्या, दगड-विटांनी मारामारी केल्याचे दादांनी एका मुलाखतीत सांगितले आहे. एका वर्षातच त्यांच्या कुटुंबातल्या प्रमुख व्यक्तींशी ते काळाने दुरावले व तेव्हापासून एकटे पडलेल्या दादा कोंडकेंनी जीवन हे खेळकरपणे घालवण्याचा निश्चय केला. नायगाव परिसरात - ''बँडवाले दादा'' ह्या नावाने त्यांना लोकं ओळखू लागले. तेथेच त्यांना जीवाभावाचे मित्र मिळाले. सुपरस्टार झाल्यावरही दादा तेथे जात व जुन्या मित्र मंडळीत रमत.

कलेची सेवा बँड पथकाच्या मार्फत करणाऱ्या दादांनी मग 'सेवा दलात' प्रवेश केला. तेथून सांस्कृतिक कार्यक्रम व नंतर नाटके असा त्यांचा प्रवास सुरू झाला. प्रख्यात लेखक वसंत सबनिसांशी ते ह्याच संदर्भातून जोडले गेले. स्वत:ची नाटक कंपनी उघडून त्यांनी वसंत सबनिसांना नाटकासाठी लेखन करावयास विनंती केली. तोवर वसंत सबनिसांना त्यांच्या ''खंकरपूरचा राजा''ह्या नाटकातल्या भूमिकेने प्रभावित केलेलेच होते. हसरे व खेळकर व्यक्तिमत्त्व लाभलेल्या दादा कोंडकेंसाठी सबनिसांनी मदतीचा हात पुढे केला. सबनिसांनी लिहिलेल्या ''विच्छा माझी पुरी करा'' ह्या नाटकाने दादांना सुपरस्टार रंगकर्मी बनवले.१५०० च्या वर प्रयोग झालेल्या ह्या नाटकामुळे दादांना भालजींच्या चित्रपटात काम करण्याची संधी प्राप्त झाली. आशा भोसले 'विच्छा.... ' चा मुंबईतला एकही प्रयोग सोडीत नसत. त्यांनीच दादांना भालजींकडे पाठवले. दादांचे शब्दोच्चार एके ५६ रायफल मधून सुटणाऱ्या गोळ्यांसारखे सुसाट असायचे पण नेमक्या ठिकाणी पॉज घेतल्याने प्रेक्षक अख्खे थिएटर (मग ते नाटकाचे असो की सिनेमाचे) डोक्यावर घ्यायचे.

१९६९ साली भालजी पेंढारकरांच्या ''तांबडी माती'' ह्या चित्रपटातून पदार्पण केलेल्या दादांनी मग मागे वळून बघितले नाही. तांबडी माती पाठोपाठ आलेल्या ''सोंगाड्या -(१९७१)'' ने दादांचे आयुष्य बदलून टाकले. 'सोंगाड्या' ही त्यांची प्रथम निर्मिती. वसंत सबनिसांनी लिहिलेल्या ह्या चित्रपटाचे दिग्दर्शन गोविंद कुळकर्णींनी केले होते. बॉक्स ऑफिस वर सुपर डुपर हिट ठरलेल्या ह्या चित्रपटानंतर एकामागोमाग एक हिट चित्रपटांची लाइन लावून दिली. स्वत:च्या ''कामाक्षी प्रॉडक्शन'' ह्या चित्रपट निर्मिती कंपनीतर्फे १६ चित्रपट प्रकाशित करणाऱ्या दादांनी ४ हिंदी व १ गुजराती चित्रपट प्रकाशित केला. १९७२ - एकटा जीव सदाशिव, १९७३ - आंधळा मारतो डोळा, १९७५- पांडू हवालदार, १९७६ - तुमचं आमचं जमलं, १९७७ - राम राम गंगाराम, १९७८- बोटं लावीन तेथे गुदगुल्या, १९८०- ह्योच नवरा पाहिजे, १९८७ - आली अंगावर, १९८८- मुका घ्या मुका, १९९०- पळवा पळवी, १९९२- येऊ का घरात व १९९४- सासरचे धोतर हे चित्रपट त्यांच्या कामाक्षी प्रॉडक्शन ने प्रकाशीत केले. १९८१ साली 'गनिमी कावा' त्यांनी दुसऱ्या (बहुदा भालजींच्याच) बॅनर खाली केला. एखाद्यावर पूर्ण विश्वास कसा टाकावा हे दादांकडून शिकावे. कामाक्षी प्रॉडक्शन ची टीम वर्षो न वर्षे कायम राहिली. त्यात उषा चव्हाण ही अभिनेत्री, राम लक्ष्मण ह्यांचे संगीत, महेंद्र कपूर व उषा मंगेशकर - पार्श्वगायना साठी तर 'बाळ मोहिते' प्रमुख दिग्दर्शन सहाय्यक..... कुठल्याही 'क्विझ' कार्यक्रमात हा प्रश्न विचारल्यास बेधडक उत्तरे हीच द्यावीत...... लागोपाठ ९ मराठी चित्रपटांच्या रौप्यमहोत्सवी आठवड्यांचे 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' त्यांनी केले. हिंदीतून - तेरे मेरे बीच में (१९८४); अंधेरी रात में दिया तेरे हात में (१९८५), खोल दे मेरी जुबान (१९८६) व आगे की सोच (१९८९) हे चित्रपट त्यांनी प्रकाशीत केले. १९७७ साली पांडू हवालदार ह्या मराठी चित्रपटाच्या धरतीवर ''चंदू जमादार'' हा गुजराती चित्रपट प्रकाशित केला.

सोंगाड्या चित्रपटात त्यांनी नाम्याची भूमिका केली व तीच त्यांच्या जीवनाचा 'टर्निंग पॉइंट' ठरला. नाम्या कलावतीच्या तमाशाला जातो व त्याला तमाशाची चटक लागते हे त्याच्या 'आये' ला आवडत नाही. ती त्याला घराबाहेर काढते व तो कलावतीच्या आश्रयाला जातो व तेथे तो तमाशात नावांरुपाला येतो असे हे कथानक आहे. ह्या भोळ्या 'नाम्या' ने दादांना एका रात्रीत यशाच्या शिखरावर नेउन ठेवले. पण उभ्या आयुष्यात त्याच 'नाम्या' सारखे दादा साधेपणाने वावरले. ताडदेवच्या कामाक्षीच्या कार्यालयात त्यांना भेटायला त्यांचे चाहते महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातून यायचे व दादांनी त्यांना कधीच निराश परत जाऊ दिले नाही. चाहत्यांबरोबर फोटो सेशन हा त्यांचा वेगळा दैनिक कार्यक्रम असे. चाहत्यांकडून स्वत:च्या चित्रपटातले संवाद, क्षण वगैरे ते त्यांच्यात समरसून ऐकून घेत. कुणी त्यांना आपल्या मुला बाळांच्या विवाहाचे निमंत्रण देण्यास येई तर कुणी दुकानांच्या उद्घाटनाचे. पण 'तांबडी माती' हा पहिला चित्रपट केलेल्या ह्या साध्या भोळ्या नटसम्राटाने स्वत:चे पाय त्याच मातीवर घट्ट रोवून ठेवले होते! त्यांच्या सारखा खरोखरचा 'डाउन टू अर्थ' नट मिळणे असंभव !

वादग्रस्त दादांच्या यशस्वी कारकीर्दीची सुरुवातही वादग्रस्तच असायला हवी असाच विधीसंकेत असावा. कोहिनूर सिनेमाच्या मालकांनी दादांच्या (सोंगाड्याच्या) आगाऊ आरक्षणाला बगल देऊन देवानंदचा 'तीन देवीयां' हा चित्रपट प्रकाशित करण्याचे ठरवले. दादांनी बाळासाहेब ठाकरेंना साकडे घातले. मग काय विचारता; शिवसैनिकांनी कोहिनूर बाहेर ''राडा'' घातला! कोहिनूरच्या मालकांना सेनेचा दणका मिळताच 'सोंगाड्या' प्रदर्शित करावयाचे सोंग आणावे लागले. पण सोंगाड्या सुपर डुपर हिट्ट ठरला व मरगळलेल्या मराठी चित्रपटसृष्टीत खळबळ माजली. दादांची अवघी कारकीर्द वादग्रस्त होती. सेन्सॉरच्या दंडेलीपुढे नमते न घेण्याची प्रवृत्ती किंवा नियमाविरुद्ध जाण्याची खुमखुमी; त्यांची शिवसेनेशी बांधिलकी; त्यांचे प्रणय; त्यांचे व्यक्तिगत आयुष्य ते मृत्यूनंतर उठलेले वाद हे एका वादग्रस्त चरित्राचे पैलू असावेत. कायद्याने ते विवाहित होते व तेजस्विनी नावाची त्यांना कन्या होती. पण जनमानसांत ते अविवाहित म्हणून वावरले.

मार्च १४, १९९८ रोजी पहाटे ३.३० ला रमा निवास ह्या दादरच्या निवासस्थानी त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना बाजूच्याच सुश्रुषा नर्सिंग होममध्ये हालवण्यात आले. आदल्याच दिवशी त्यांचे स्नेही डॉ. अनिल वाकणकरांनी त्यांना तपासले होते पण शेवटी त्यांचे सुश्रुषा हॉस्पिटलात प्राणोत्क्रमण झाले. त्यावेळी त्यांची मोठी बहीण लिलाबाई मोरे हयात होत्या. पुतण्या विजय कोंडकेंनी त्यांच्यावर अंतिम संस्कार केले. मृत्यूनंतरही वादांनी दादांचा पिच्छा पुरवला. वाद होता दादांच्या वारसा हक्कांबाबत. दादांनी मृत्युपत्रात आपली संपत्तीची कार्यवाह म्हणून एक संस्था स्थापित केली होती/ करायला सांगितले होते. विश्वस्त म्हणून उषा चव्हाण, डॉ. अनिल वाकणकर, साबीर शेख (त्या काळचे कामगार मंत्री), गजानन शिर्के व वसंत भालेकरांचा समावेश होता. पुढे दादांच्या वारसांनी त्यांच्या मृत्युपत्राला न्यायालयात आव्हान दिले व त्यांची सर्व संपत्ती वादग्रस्त ठरली. आज दादा नाहीत पण ते आपल्या कलाकृतीने चित्रपट विश्वात मात्र सदैव आठवणीत राहतील. ●●



# बालांगण

## हॉटेल बर्फाचं

अनोखं जग

हॉटेलमध्ये जाऊन खायला तुम्हाला आवडत असेल. पण हे हॉटेल बर्फाचं असेल तर... या बर्फाच्या हॉटेलमध्ये बसून खाताना हुडहुडीच भरेल. गंमत म्हणजे बर्फाचं हे हॉटेल कायमस्वरुपी नाही. ते थंडीत तयार केलं जातं. हिवाळ्याचे चार-पाच महिने संपले की ते वितळून जातं. बर्फाचं हे पाणी मग नदीत मिसळतं. आता हे जगावेगळं हॉटेल आहे तरी कुठे? स्वीडनमध्ये अशा पद्धतीने बर्फाचं हॉटेल बनवलं जातं. १९८९ पासून इथे ही संकल्पना राबवली जात आहे. यंदाही बर्फाचं हॉटेल तयार करण्यात आलं. इथे येणाऱ्या लोकांना कोरोनाविषयक नियमांचं पालन करावं लागलं.



हे हॉटेल स्वीडनमधल्या टॉर्न नदीच्या किनारी वसलं आहे. इथे हिवाळ्यात टॉर्न नदी गोठते. मग हे हॉटेल तयार करण्यासाठी याच नदीतला बर्फ काढला जातो. जवळपास २५०० टन बर्फापासून हॉटेल तयार केलं जातं. ऑक्टोबरपासून हॉटेल तयार करण्याच्या कामाला सुरूवात होते. या हॉटेलच्या बांधकामासाठी जगभरातले कलाकार स्वीडनमध्ये दाखल होतात आणि आपली कल्पनाशक्ती लढवत बर्फापासून छानसं हॉटेल साकारतात.

या हॉटेलमध्ये राहण्याच्या खोल्या तयार केल्या जातात. या खोल्यांमधलं तापमान उणे पाच अंशांपर्यंत असतं. बर्फाच्या हॉटेलमध्ये राहण्याचा अनुभव घेण्यासाठी दरवर्षी जवळपास ५० हजार पर्यटन स्वीडनला भेट देतात. साधारण एप्रिल महिन्यापर्यंत हे हॉटेल टिकतं. त्यानंतर इथे उन्हाळ्याला सुरूवात होते. मग बर्फ वितळू लागतो आणि हॉटेल भूईसपाट होतं. या हॉटेलमध्ये राहण्यासाठी बरेच पैसे खर्च करावे लागतात. अशा या अनोख्या हॉटेलमध्ये राहण्याचा अनुभव एकदा तरी घ्यायला हवा.

## कन्व्हर्ट टू पीडीएफ

स्मार्ट ट्रिक्स

कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपवरची एखादी फाईल पीडीएफ करणं सोपं असतं. पण स्मार्टफोनवरची फाईल पीडीएफ कशी करायची? काळजी करू नका. एका ॲपच्या मदतीने हे शक्य होईल. कन्व्हर्ट जेपीजी टू पीडीएफ हे ॲप डाउनलोड केल्यानंतर तुमची फाईल पीडीएल होईल. गूगल प्ले स्टोअरमधून हे ॲप डाउनलोड करून घ्या. ॲप ओपन झाल्यावर तुम्हाला फाईल आणि फोल्डर असे पर्याय दिसतील. तुम्हाला फोल्डरमधल्या काही फाईल्स पीडीएफ करायच्या असतील तर फाईल्समध्ये जावून सिलेक्ट करा किंवा फोल्डरमध्ये जावून संपूर्ण फोल्डर सिलेक्ट करता येईल. तुमच्या फोल्डरमधल्या सर्व फाईल्स जेपीइजी फॉरमॅटमधल्या असणं आवश्यक आहे. फाईल किंवा फोल्डर सिलेक्ट झाल्यानंतर तुम्हाला पोर्टेबल किंवा लँडस्केप मोड यापैकी एकाची निवड करावी लागेल. तुमच्या पीडीएफ फाईलला पासवर्डही देता येईल. यामुळे तुमची फाईल सुरक्षीत राहील. आता खालच्या बाजूला कन्व्हर्ट टू पीडीएफ हा पर्याय असेल. त्यावर क्लिक करा. यानंतर फाईल कन्व्हर्ट होण्याची क्रिया सुरू होईल. अवघ्या काही सेकंदात तुमची फाईल पीडीएफ झालेली असेल.




## अनोखं प्रेझेंटेशन पेन



स्मार्ट गॅझेट

कॉम्प्युटर, लॅपटॉपला हात लावायचा नसेल तर यूएसबी प्रेझेंटेशन पेनचा वापर करता येईल. तुमच्याकडे वायरलेस माउस असेल. हेच तंत्र या पेनमध्ये वापरण्यात आलं आहे.

या पेनचा वापर करून फाईलमधला डाटा वर-खाली स्क्रॉल करता येतो. शिवाय लॅपटॉपला हात न लावता फाईलही ओपन करता येते. या उपकरणाचा आकार पेनसारखा असल्यामुळे त्याला प्रेझेंटेशन पेन असं म्हटलं जातं. हे पेन खिशात अगदी सहज मावतं. पेनवर वेगवेगळी बटणं असतात. या बटणांच्या मदतीने वेगवेगळ्या क्रिया करता येतात. पॉवर, व्हॉल्यूम, ऑपरेट, लाईटची ही बटणं तुम्ही अगदी सहज वापरू शकता. या पेनमधल्या लेझर लाईटचा वापर करून एखाद मुद्दा समजावून सांगता येतो. या पेनचा वापर करून प्रेझेंटेशन सुरू आणि बंद करता येतं. या पेनमध्ये एक बॅटरी असते. याचा यूएसबी ॲडॉप्टर लॅपटॉप किंवा पीसीच्या यूएसबी पोर्टमध्ये बसवला की झालं काम! मग हे पेन काम करू लागतं. बाजारात वेगवेगळ्या आकाराची प्रकारची प्रेझेंटेशन पेनं मिळतात.

## मृत समुद्रात माणूस का तरंगतो?

डेड सी म्हणजेच मृत समुद्र जगातील सर्वात खारट जलाशयांपैकी एक आहे. तो जॉर्डन आणि इस्त्रायलच्या दरम्यान आहे. याला समुद्र म्हणतात, पण प्रत्यक्षात ते खाऱ्या पाण्याचे मोठे सरोवर आहे. डेड सीच्या पाण्यात साधारण समुद्रापेक्षा खूपच जास्त मीठ आहे. त्यामुळे माणूस त्यात सहज तरंगतो. तिथे अनेक पर्यटक पाण्यावर पाठीवर झोपून वर्तमानपत्र वाचतानाचे फोटो काढतात. आपण पाण्यात जातो तेव्हा पाणी आपल्याला वर उचलण्याचा प्रयत्न करतं. यालाच उत्प्लावन शक्ती म्हण-तात. खारट पाणी जास्त जड असल्यामुळे ते आपल्याला अधिक जोराने वर ढकलतं. म्हणून समुद्रात आपण सहज तरंगू शकतो. या पाण्यात खूप खनिजे असल्यामुळे त्वचेसाठी ते उपयोगी मानले जाते. इतक्या खारटपणामुळे तिथे मासे किंवा झाडं जगू शकत नाहीत. म्हणून त्याला डेड म्हणजे मृत समुद्र असे नाव पडले.



## वसा पर्यावरण रक्षणाचा

कोण होणार?

पर्यावरण रक्षण ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी फक्त सरकार, पर्यावरण रक्षणाचं कार्य करणाऱ्या संस्थांवर टाकून होणार नाही. या पृथ्वीवरील प्रत्येक माणसाने आपल्या परीने यासाठी प्रयत्न करायला हवेत. पर्यावरणाबद्दल आपुलकी असेल तर तुम्हीही पर्यावरण रक्षणाचा वसा घेऊ शकता. बारावीनंतर एन्व्हायर्न्मेंटल इंजिनिअरींगचा अभ्यासक्रम पूर्ण करून या क्षेत्रात करीअर करता येईल.



या क्षेत्रात करीअर करण्यासाठी विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण होणं गरजेचं आहे. फिजिक्स, केमिस्ट्री आणि मॅथ्स हे विषय बारावीत असायला हवे. इथे करीअरच्या अनेक संधी आहेत. तुम्ही खाजगी तसंच सरकारी क्षेत्रात काम करू शकता. पर्यावरणाच्या प्रश्नावर काम करणाऱ्या एनजीओसाठीही तुम्हाला काम करता येईल. संशोधनही करता येईल. या क्षेत्रात पीएचडी करून प्राध्यापक म्हणूनही काम करू शकता.

वाढत्या शहरीकरणामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. सगळीकडे प्रदूषण, कचऱ्याची समस्या वाढली आहे. अशा परिस्थितीत या सगळ्याचं व्यवस्थापन करणं गरजेचं आहे. एन्व्हायर्न्मेंटल इंजिनियर्स पर्यावरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी वेगवेगळ्या उपायोजना करतात. तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरणाचा प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने ते प्रयत्न करतात. यासाठी ते देशोदेशी वापरल्या जाणाऱ्या तंत्रांचा अभ्यास करतात. आपल्याकडे त्यातील कोणती तंत्र अवलंबता येतील याचा तुलनात्मक अभ्यास करतात. हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्हीही पर्यावरण तज्ज्ञ बनू शकता.

## खनिज तेल-काळे सोने

खनिज तेल हे पृथ्वीच्या आत खोलवर सापडणारे एक महत्त्वाचे ऊर्जास्रोत खनिज आहे. त्याचे आर्थिक मूल्य खूप मोठे आहे त्यामुळे याला काळे सोने असेही म्हणतात. हे तेल जमिनीखालील खडकांच्या थरांमध्ये लाखो वर्षे दडलेले असते. प्राचीन काळात समुद्रात राहणारी सूक्ष्म वनस्पती आणि प्राणी मृत्यूनंतर चिखलाखाली गाडले गेले. त्यांच्यावर दाब आणि उष्णता यांचा परिणाम होऊन हळूहळू खनिज तेल तयार झाले. खनिज तेल थेट वापरता येत नाही. ते प्रथम जमिनीखालून बाहेर काढले जाते. त्यासाठी खोल




विहिरी खोदल्या जातात. काढलेले तेल शुद्धीकरण केंद्रात नेले जाते. त्यातून पेट्रोल, डिझेल, रॉकेल, वायू, डांबर आणि इतर अनेक पदार्थ तयार होतात. हे सर्व पदार्थ आपल्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडतात. मोटारगाड्या, बस, विमान, जहाजे यांना इंधन म्हणून पेट्रोल आणि डिझेल लागते. खनिज तेलापासून प्लास्टिक, कृत्रिम तंतू, रंग, औषधे, सौंदर्यप्रसाधने आणि अनेक रसायने तयार होतात. त्यामुळे उद्योगधंद्यांमध्ये त्याचे मोठे महत्त्व आहे.

खनिजांची माहिती

जगातील काही देश खनिज तेल उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत. सौदी अरेबिया, रशिया आणि अमेरिका हे देश मोठ्या प्रमाणावर तेल उत्प-ादन करतात. भारतात खनिज तेल प्रामुख्याने मुंबई हाय, आसाम, गुजरात आणि राजस्थान या भागात सापडते. तेलशुद्धीकरण कारखाने जामनगर, पानिपत, मथुरा, दिग्बोई आणि मुंबई येथे आहेत. तरीही आपल्याला बरेच तेल इतर देशांतून आयात करावे लागते.

खनिज तेलाच्या ज्वलनामुळे प्रदूषण निर्माण होते. धूर आणि वायू वातावरणात मिसळून पर्यावरणावर परिणाम करतात. त्यामुळे आज जगभर पर्यायी ऊर्जास्रोत शोधण्यावर भर दिला जात आहे. पण तरीही खनिज तेल म्हणजे पृथ्वीने माणसासाठी लाखो वर्षे जपून ठेवलेला ऊर्जेचा साठा आहे. तो आपण काळजीपूर्वक आणि समजूतदारपणे वापरायला हवा.

## ज्वालामुखी फुटतो म्हणजे काय ?

रंजक विज्ञान

पृथ्वीच्या आत खूप उष्णता असते. त्या उष्णतेमुळे तिथले खडक वितळून द्रवरूप होतात. या गरम द्रवाला मॅग्मा म्हणतात. तो जमिनीखाली साचत राहतो. कधी कधी मॅग्मावर खूप दाब तयार होतो. त्यामुळे तो बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधतो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर कुठे भेग किंवा उघडे तोंड असते तिथून तो अचानक बाहेर येतो. हाच ज्वालामुखीचा उद्रेक. मॅग्मा बाहेर आला की त्याला लाव्हा म्हणतात. लाव्हा खूप गरम असतो. ज्वालामुखी फुटल्यावर त्याला मार्ग मिळतो. तो वाहत खाली येतो. त्याच्यासोबत राख, धूर आणि वायूही बाहेर पडतात. काही वेळा मोठा आवाज आणि स्फोटही होतो.



ज्वालामुखी धोकादायक असला तरी त्यातून नवीन जमीन तयार होते आणि माती सुपीक बनते. जपान आणि इंडोनेशिया हे दोन्ही देश भूकंप आणि ज्वालामुखींसाठी प्रसिद्ध आहेत.

## इतिहास ‘ओके’चा

नॉलेज अपडेट

इंग्रजीतला ‘ओके’ हा शब्द बरेचदा वापरला जातो. वापरानुसार या शब्दाचे अर्थ बदलतात. आपण ‘आय ॲम ओके’ असं म्हटलं की ‘मी बरा किंवा बरी आहे’ असा अर्थ होतो. ‘वातावरण ओके आहे’ असं म्हटल्यावर ते चांगलं आहे असा अर्थ होतो. एखाद्याचं म्हणणं पूर्ण झाल्यावर ओके म्हटलं की ठिक आहे, तुझं बोलणं माझ्यापर्यंत पोहोचलं, असा त्याचा अर्थ होतो. शब्द एक आणि अर्थ अनेक असं ओके या शब्दाबाबत म्हणता येईल.




ओके या शब्दाचा शोध कसा लागला किंवा हा शब्द कधीपासून वापरला जाऊ लागला असा प्रश्न तुमच्या मनात येत असेल. मुलांनो, साधारण १७० वर्षांपूर्वी घडलेल्या एका चुकीतून ओके शब्दाची निर्मिती झाली, असं मानलं जातं. ’ऑल करेक्ट’चं स्पेलिंग लिहिताना चूक झाल्याने ‘ओके’ हा शब्द अस्तित्त्वात आला. अमेरिकेत 'orl kor-rect' असं या शब्दाचं स्पेलिंग झालं आणि त्यापासून ओके हा शब्द आला.

‘ऑक्सफर्ड वर्ड ॲण्ड लँग्वेज सर्व्हिस’ म्हणजे (owls) च्या डिक्शनरीज टीमने हा दावा केला आहे. ही टीम इंग्रजी भाषेशी संबंधित विविध प्रश्नांना उत्तरं देते. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने १९८३ मध्ये owls ची स्थापना केली. त्यांना ओके या शब्दाची उत्पत्ती कशी झाली, असा प्रश्न विचारण्यात आला होता. अर्थात याबाबत वेगवेगळे तर्क मांडण्यात आले. पण काही पुराव्यांनिशी ‘ेश्र झ्रीशर्ली’ चा तर्क योग्य मानण्यात आला. या शब्दाशी संबंधित एक खटलाही चालवण्यात आला. जपानमधला तांदुळ विक्रेता आणि अमेरिकेतली एक बँक यांच्यातला हा खटला होता. या विक्रेत्याने काही बिलांवर स्वत:च्या नावासह ओके असं लिहिलं होतं. ओके या शब्दाचा अर्थ काय असावा, असा या खटल्याचा विषय होता. रश्रश्र र्ज्ञीशर्ली असं याचं पूर्ण रूप घ्यावं, असं न्यायालयाने स्पष्ट केलं. दोस्तांनो, आता ओके वेगवेगळ्या पद्धतीने लिहिलं जातं आहे. हे शब्द कसे अस्तित्त्वात आले याचा शोध घेतला जात आहे. तुम्हीही तो नक्की घ्या.

## फोटो करा रिसाईझ




ॲप वर्ल्ड

साशल मीडियावर तुम्ही बरेच फोटो शेअर करत असाल. व्हॉट्स ॲपवर तर सतत फोटो पाठवले जातात. इन्स्टाग्राम ही तर खास फोटोंचीच साईट आहे. फोटो टाकताना ते क्रॉप किंवा रिसाईझ करावे लागतात. हे काम खूप कटकटीचं असतं. पण फोटो रिसाईझ करणारी बरीच सॉफ्टवेअर आणि ॲप्स उपलब्ध आहेत. त्यापैकी फोटोशॉप आणि जीआयएमपी या सॉफ्टवेअर्सची माहिती घेऊ या.

फोटोशॉपविषयी जाणून घ्या

फोटोशॉप आयओएस आणि विंडोज १० अशा दोन्हीमध्ये वापरता येतं. फोटोशॉप डाउनलोड करून घ्यावं लागतं. फोटोशॉप ओपन करून फोटो ओपन करा. यानंतर फोटोशॉपच्या मेनूमध्ये वरच्या बाजूला फाईल हा ऑप्शन दिसेल. त्यावर क्लिक करा. ओपन हा पर्याय निवडा. सेव्ह लोकेशनमधून फोटो निवडा. मग उजव्या बाजूला खाली ओपन हा ऑप्शन दिसेल तो निवडा. आता इमेज ओपन होईल. फोटोशॉपच्या वरच्या बाजूला फोटोवर क्लिक करा. यानंतर रिझल्ट ड्रॉप डाउन मेनूमधून फोटोचा साईझ निवडा. तुमच्यासमोर ओपन झालेल्या पॉपअप विंडोत फोटो रिसाईझ करण्याचे बरेच ऑप्शन्स दिसतील. इथून गरजेनुसार फोटोची उंची, लांबी, रूंदी, पिक्सल निवडा. फोटोचं एडिटिंग पूर्ण झाल्यानंतर ओके वर क्लिक करा. एडिट झालेला फोटो तुम्ही शेअर करू शकता.

काय आहे जीआयएमपी?

जीआयएमपी हे फोटो एडिटिंग ॲप आहे. हे ॲप पीसीमध्ये डाउनलोड करून इन्स्टॉल करून घ्या. यानंतर ॲपच्या वरच्या बाजूला मेन्यूमध्ये जाऊन फाईल हा ऑप्शन निवडा. रिझल्ट ड्रॉप डाउन मेनूमधल्या ओपन वर क्लिक करा. फोटो निवडा. आता सेव्ह लोकेशनमधून फोटो निवडून वरच्या बाजूला उजवीकडे दिलेल्या ओपन बटणावर क्लिक करा. इमेज ओपन झाल्यावर जीआयएमपीच्या मेन्यूमध्ये जाऊन इमेज ऑप्शनवर क्लिक करा. आता ड्रॉप डाउन मेन्यूमधून स्केल इमेज निवडा. पॉप अप विंडो ओपन होईल. यात रिसाईझ आणि इमेज ऑल्टरचे विविध पर्याय दिसतील. इमेजची उंची, लांबी, रूंदी निवडा. स्केल बटणावर क्लिक करा. तुमची इमेज रिसाईझ होईल.

## उडणाऱ्या गाड्या खरेच येतील?

उडणाऱ्या गाड्या आपण चित्रपटात पाहिल्या आहेत. पण आता त्या खऱ्या आयुष्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जगात अनेक कंपन्या उडणाऱ्या गाड्यांवर काम करत आहेत. ॲलेफ एरोनॉटिक्स या अमेरिकन कंपनीने अशी गाडी तयार केली आहे. ही गाडी रस्त्यावर धावू शकते आणि गरज पडल्यास आकाशात उडू शकते. या कंपनीने उड्डाणाची चाचणीही केली आहे. त्याचप्रमाणे पाल-व्ही ही नेदरलँड्समधील कंपनी रस्त्यावर चालणारी आणि छोट्या विमानासारखी उडणारी गाडी विकसित करत आहे. काही मोठ्या विमाननिर्मिती कंपन्याही या क्षेत्रात उतरल्या आहेत. एअर बस आणि बोईंग यांनीही छोट्या वैयक्तिक उड्डाण वाहनांवर संशोधन सुरू केले आहे. या उडणाऱ्या गाड्यांमधल्या काही गाड्या पूर्णपणे इलेक्ट्रिक ऊर्जेवर चालतात. त्यांना उभ्या दिशेने उड्डाण करता येते. त्यामुळे त्यांना मोठ्या धावपट्टीची गरज नसते. या गाड्यांमध्ये पंख किंवा फिरणारे पंखे म्हणजे प्रोपेलर्स असतात. हे प्रोपेलर्स त्यांना हवेत उचलतात. रस्त्यावर चालणाऱ्या साध्या गाड्यांना चाके आणि इंजिन पुरेसे असते.मात्र उडणाऱ्या गाड्यांमध्ये अतिरिक्त उड्डाण यंत्रणा, हलका पण मजबूत धातू आणि विशेष रचना लागते. उडणाऱ्या गाड्यांचे वजन शक्य तितके कमी ठेवावे लागते. म्हणून त्यात कार्बन तंतूसारखी हलकी सामग्री वापरली जाते.



या गाड्यांमध्ये सुरक्षिततेसाठी अतिरिक्त नियंत्रण प्रणाली, हवेत दिशा बदलणारी यंत्रणा आणि आपत्कालीन व्यवस्था असते. नेहमीच्या गाड्या फक्त रस्ते नियम पाळतात, पण उडणाऱ्या गाड्यांना जमिनीवरील आणि हवाई दोन्ही नियमांनुसार बनवावे लागते. अर्थात सध्या या गाड्या चाचणी टप्प्यात आहेत. काही देशांमध्ये मर्यादित परवानग्या दिल्या जात आहेत. तज्ज्ञांच्या मते पुढील काही वर्षांमध्ये मोठ्या शहरांमध्ये हवाई टॅक्सी सेवा सुरू होऊ शकते. उडणाऱ्या गाड्या हे आता फक्त स्वप्न राहिलेले नाही. संशोधन वेगाने सुरू आहे. भविष्यात कदाचित आपण थेट आकाशातून शाळेत किंवा कार्यालयात जाऊ शकू.

## अल्ताई पर्वतरांग

ओळख पर्वतरांगांची

अल्ताई पर्वतरांग आशिया खंडातील अत्यंत सुंदर आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची पर्वतरांग मानली जाते. ही पर्वतरांग रशिया, मंगोलिया, चीन आणि कझाकस्तान या चार देशांच्या सीमाभागात पसरलेली आहे. त्यामुळे या प्रदेशाला सांस्कृतिक आणि भौगोलिक वैविध्य लाभले आहे. उंच टोकदार शिखरे, बर्फाच्छादित भाग, हिरव्यागार दऱ्या आणि स्वच्छ नद्या यामुळे हा प्रदेश निसर्गसंपन्न मानला जातो. बेलुखा शिखर हे अल्ताई पर्वतरांगेतील सर्वोच्च शिखर आहे. येथील उंच प्रदेशात मोठ्या प्रमाणावर बर्फ साचतो. उन्हाळ्यात दऱ्यांमध्ये हिरवळ पसरते आणि रानफुले फुलतात. अनेक स्वच्छ तलाव आणि हिमनदीजन्य जलस्रोत येथे आढळतात. अनेक महत्त्वाच्या नद्या या पर्वतरांगेतून उगम पावतात. त्यांपैकी ओब आणि इर्तिश नदीचा उगम या भागात होतो.



ओब नदी मुख्यतः रशियात वाहते. नंतर सायबेरिया भागातून उत्तरेकडे वाहत जाऊन अखेरीस आर्क्टिक महासागरात मिसळते. इर्तिश नदी चीन, कझाकस्तान आणि रशिया या तीन देशांमधून वाहते आणि शेवटी रशियात ओब नदीला मिळते. येथे स्थानिक आदिवासी जमाती राहतात. अल्ताई लोक, कझाख, मंगोल असे विविध समुदाय इथे राहतात. काही लोक पारंपरिक पद्धतीने पशुपालन करतात. इथे घोडे, मेंढ्या आणि याक यांचे पालन मोठ्या प्रमाणावर केले जाते. अनेक कुटुंबे अजूनही पारंपरिक तंबूमध्ये किंवा साध्या घरांमध्ये राहतात. त्यांच्या लोककथा, संगीत आणि धार्मिक परंपरा या प्रदेशाच्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. पर्यटनाच्या दृष्टीनेही अल्ताई पर्वतरांग आकर्षक आहे. गिर्यारोहण, पायी भटकंती, निसर्ग छायाचित्रण आणि नदीतील जलक्रीडा यासाठी पर्यटक येथे येतात. शांत, स्वच्छ आणि कमी प्रदूषण असलेला हा प्रदेश निसर्गप्रेमींसाठी खास मानला जातो. अल्ताई पर्वतरांग केवळ डोंगरांची रांग नसून निसर्ग, संस्कृती आणि जलसंपत्ती यांचा सुंदर संगम आहे.

## गुरुत्वाकर्षणाची जादू

गुरुत्वाकर्षणामुळेच आपण जमिनीवर घट्ट उभे राहू शकतो. नाहीतर आपण हवेत तरंगायला लागलो असतो. आपले वजन म्हणजे पृथ्वी आपल्याला तिच्याकडे ओढते तो ताण असतो. आपल्या शरीरात जितका जास्त पदार्थ म्हणजे वस्तुमान असेल, तितकी पृथ्वी आपल्याला जास्त जोराने ओढते. म्हणून जड माणसाचे वजन जास्त आणि हलक्या माणसाचे वजन कमी असते. जर पृथ्वीवर गुरुत्वाकर्षण नसते, तर चेंडू वर फेकला की तो परत खालीच आला नसता. तो सरळ अवकाशात निघून गेला असता पृथ्वीवर काही ठिकाणी गुरुत्वाकर्षण थोडे जास्त किंवा कमी असू शकते. कारण पृथ्वी पूर्णपणे गोल आणि एकसारखी नाही. त्यामुळे वजन मोजताना अगदी छोटासा फरक पडू शकतो. गुरुत्वाकर्षणामुळेच तारे, ग्रह आणि चंद्र आपल्या जागी फिरत राहतात. गुरुत्वाकर्षण ही अदृश्य शक्ती असली, तरी ती आपलं रोजचं आयुष्य चालवणारी मोठी जादूच आहे.

# हॉकी वर्ल्ड कपचे बिगुल वाजले

## भारत-पाकिस्तान पुन्हा आमने-सामने ; १६ संघांचे गटवारी जाहीर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

ऑगस्टमध्ये हॉकी वर्ल्ड कप २०२६ स्पर्धा सुरू होणार आहे. ही स्पर्धा बेल्जियम आणि नेदरलँड्स येथे खेळला जाणार आहे. या स्पर्धेत १६ संघ सहभागी होणार आहेत. दरम्यान, मंगळवारी (दि.१७) मार्च रोजी स्पर्धासाठी गटवारी जाहीर झाली आहे. ही गटवारी जाहीर झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान हे कट्टर प्रतिस्पर्धी पहिल्याच फेरीत आमने-सामने येणार हे निश्चित झाले आहे.

भारतीय संघाचा समावेश पाकिस्तानसह ड गटात केला आहे. या गटात इंग्लंड आणि वेल्स या संघांचाही समावेश आहे. या गटातील सामने नेदरलँड्समध्ये खेळवले जाणार आहेत.



दरम्यान, महिलांचाही हॉकी वर्ल्ड कप होणार असून भारतीय महिला संघाने काही दिवसांपूर्वीच पात्रता मिळवली आहे. त्यांचाही समावेश डी गटात झाला असून या गटात चीन, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका संघ आहेत. तथापि, अद्याप वेळापत्रकाची घोषणा झालेली नाही..भारतीय संघ २०१६ पासून पाकिस्तानविरुद्ध हॉकीमध्ये पराभूत झालेला नाही. भारतीय हॉकी संघाने गेल्या १० वर्षात पाकिस्तानवर पूर्ण वर्चस्व ठेवले आहे. हे दोन हॉकी संघ यापूर्वी शेवटचे २०२४ मध्ये आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आमने सामने आले होते. त्यानंतर २०२५ च्या आशिया कप स्पर्धेत हे दोन्ही संघ आमने-सामने येणार होते, सुरक्षेच्या कारणाने पाकिस्तानने भारतात येण्यास नकार दिला होता. आता आमने-सामने असतील.

### हॉकी वर्ल्ड कप २०२६ साठी गटवारी

**पुरुष :अ गट : नेदरलँड्स, अर्जेंटिना, न्यूझीलंड, जपान (नेदरलँड्समध्ये सामने)ब गट : बेल्जियम, जर्मनी, फ्रान्स, मलेशिया (बेल्जियममध्ये सामने)सी गट : ऑस्ट्रेलिया, स्पेन, आयर्लंड, दक्षिण आफ्रिका (बेल्जियममध्ये सामने)डी गट : इंग्लंड, भारत, पाकिस्तान, वेल्स (नेदरलँड्समध्ये सामने)**

**महिला :अ गट : नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, चिली, जपान (नेदरलँड्समध्ये सामने)ब गट : अर्जेंटिना, जर्मनी, अमेरिका, स्कॉटलंड (बेल्जियममध्ये सामने)सी गट : बेल्जियम, स्पेन, न्यूझीलंड, आयर्लंड (बेल्जियममध्ये सामने)डी गट : चीन, इंग्लड, भारत, दक्षिण आफ्रिका**


# निवडक

## लिओनेल मेस्सीचे ९०० गोल



**फ्लोरिडा :** फुटबॉलच्या महान खेळाडूंपैकी एक असलेल्या लिओनेल मेस्सीनं आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. त्याने अधिकृत सामन्यांमध्ये ९०० गोल पूर्ण केले असून, असे करणारा तो ख्रिस्तियानो रोनाल्डोनंतर जगातील दुसरा पुरुष फुटबॉलपटू ठरला आहे. त्यानं हा टप्पा कॉनकाकॅफ चॅम्पियन्स कपमध्ये नॅशविलविरुद्ध इंटर मियामीकडून खेळताना गाठला. या कामगिरीमुळं, मेस्सी आता त्याचा सर्वात मोठा प्रतिस्पर्धी असलेल्या रोनाल्डोच्या विशेष क्लबमध्ये सामील झाला आहे. रोनाल्डोनं सप्टेंबर २०२४ मध्ये ९०० गोलचा टप्पा ओलांडला होता. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फुटबॉल हिस्ट्री अँड स्टॅटिस्टिक्स (खत्रझ्र्रुद्ध) नुसार, रोनाल्डो सध्या ९६५ गोलांसह १००० गोलच्या जादुई टप्प्याच्या जवळ पोहोचला आहे. मात्र, मेस्सीनं सर्वात जलद ९०० गोल करुन रोनाल्डोला मागे टाकले. मेस्सीनं हा पराक्रम ११४२ सामन्यांमध्ये केला, तर रोनाल्डोला हा टप्पा गाठण्यासाठी १२३६ सामने लागले.

## कुस्तीपटू सालेहला फाशीची शिक्षा



**नवी दिल्ली :** इराणमध्ये युद्ध भडकलेले असताना एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कोममधील आंदोलनादरम्यान पोलिसांना ठार मारल्याच्या आरोपावरून, १९ वर्षीय इराणी कुस्तीपटू सालेह मोहम्मदीसह तिघांना सार्वजनिकरीत्या फाशी देण्यात आली. छळ आणि अन्यायपूर्ण खटल्याच्या आरोपांनी गाजलेल्या त्याच्या या प्रकरणामुळे, असंतोष आणि खेळाडूंवरील इराणच्या दडपशाहीवर संताप आणि टीका केली जात आहे. मोहम्मदीच्या फाशीच्या शिक्षेवर मानवाधिकार संघटना आणि आंतरराष्ट्रीय समुदायाकडून मोठ्या प्रमाणावर टीका होत आहे. ब्रिटिश बीबीसीने २० तारखेला वृत्त दिले की, इराणच्या सरकारी माध्यमांनुसार, जानेवारी महिन्यात सरकारविरोधी आंदोलनादरम्यान पोलीस अधिकाऱ्यांच्या हत्येप्रकरणी खटला चालवलेल्या तीन जणांना फाशी देण्यात आली. त्यांच्यामध्ये अशा प्रकारच्या शिक्षेला सामोरे जाणारा मोहम्मदी हा पहिला किशोरवयीन मुलगा होता. जानेवारी महिन्यात खामेनी सरकारच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या आंदोलकांच्या यादीत या तिघांचा समावेश होता.



## तनिष ११ संघ ठरला विजेता

**सुतारवाडी :** श्री दत्तक्रीडा समाजसेवा मंडळ सुतारवाडीतर्फे सुतारवाडी प्रीमियर लीग २०२६ चे आयोजन संतोष पालांडे यांच्या सावरवाडी येथील भव्य मैदानात आयोजित केले होते. प्रीमियर लीगचे हे चौथे वर्ष होते. सुतारवाडी येथील युवकांनी एकत्र येऊन सुतारवाडी प्रीमियर लीगची स्थापना केली. गेल्या तीन वर्षापासून प्रीमियर लीगचे मालक सुनील साळवी, रोहित नवशे, विनोद मेहता, संतोष देशमुख, शंकर चव्हाण या संघ मालकांच्या कुशल मार्गदर्शनाखाली (दि.१५) मार्च रोजी प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन सुतारवाडी गावचे अध्यक्ष नथुराम साळवी, हरिश्चंद्र महाडिक, संतोष देशमुख, सुनील साळवी, दिलीप नवशे, विजय सावंत, अशोक सुतार, आदींच्या उपस्थितीत करण्यात आले. पंच म्हणून ऋषिकेश साळवी, क्षितिज साळवी यांनी काम पाहिले तर समालोचन योगेश जाधव यांनी कले. यास्पर्धेत प्रथम क्रमांक तनिष वॉरियर्स, द्वितीय क्रमांक युवराज वॉरियर्स. तृतीय क्रमांक देशमुख वॉरियर्स, चतुर्थ क्रमांक नवशे वॉरियर्स, पाचवा क्रमांक साळवी वॉरियर्स यांनी पटकावला. उत्कृष्ट गोलंदाज म्हणून हर्षद तवटे, उत्कृष्ट फलंदाज म्हणून आशिष सुतार, तर क्षेत्ररक्षक म्हणून संदेश नाकती यांना गौरविण्यात आले. तर मॅन ऑफ द सिरीज म्हणून ऋतिक देशमुख यांचा गौरव करण्यात आला. यावेळी नथुराम साळवी, सुनील साळवी, हरिश्चंद्र महाडिक, संतोष देशमुख, विनोद मेहता, संदीप साळवी, जगदीश खेतले, चंद्रकांत पवार, अंकुश पुराडकर, चंद्रकांत कोरपे, प्रकाश सातंबेकर, रमेश नवशे, शंकर चव्हाण, विजय सावंत, वैभव सुतार, सोहम चिविलकर, अंकित मानकर, नितेश साळवी, निलेश सुतार, विश्वजीत देशमुख आदींचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

## गणेश पेडामकर 'मुंबई श्री'चा विजेता

**| मुंबई | प्रतिनिधी |**

कधी कधी विजय हा एकाच फटक्यात मिळत नाही. तो चार वेळा दार ठोठावल्यावरच दरवाजा उघडतो. शरीरसौष्ठवाच्या मसल्स स्टेजवर अशीच कथा घडली ती बॉडी वर्कशॉप जिमच्या गणेश पेडामकरची.

तीन प्रयत्नांत हातातून निसटलेल्या किताबाला अखेर चौथ्या प्रयत्नात त्याने गवसणी घातली आणि मानाच्या प्रतिष्ठेच्या मुंबई श्रीच्या मुकुटावर आपले नाव कोरले. महिलांच्या गटात रेखा शिंदेने आपले वर्चस्व कायम राखत अव्वल स्थान पटकावले.



मालाड येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय उद्यानातील मंचावर चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्सच्या अंतिम फेरीत आठ गटविजेते स्टेजवर उभे ठाकले तेव्हा वातावरणात जणू मसल्सचा गडगडाट घुमू लागला. या फेरीत गणेश पेडामकर, मनीष वाघेला, अक्षय खोत आणि चेतन नाईक यांच्याकडे प्रेक्षकांचे डोळे खिळले होते, पण पेडामकरचा आखीवरेखीव देहबांधा, स्नायूंचे संतुलित आकार आणि आत्मविश्वासपूर्ण पोझिंग यांनी परीक्षकांना अक्षरशः प्रभावित केले. शेवटी त्याने सर्व प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत मुंबई श्रीच्या किताबावर शिक्कामोर्तब केले आणि आपल्या या यशाचे श्रेय आपला भाऊ अनिकेत माने आणि भावी पत्नी मंजरी हाटे यांनी घेतलेल्या कष्टाला दिले. बृहन्मुंबई शरीरसौष्ठव संघटना आणि मुंबई उपनगर शरीरसौष्ठव व फिटनेस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने, जय भवानी व्यायाम मंदिर ट्रस्टच्या सहकायनि ही मानाची स्पर्धा उत्साहात पार पडली.

## पाकिस्तानची रणनिती

**नवी दिल्ली :** पाकिस्तानने भारतात झालेल्या टी २० वर्ल्डकपमध्ये अनेक नाटकं केली होती. त्यांनी सुरक्षेच्या कारणास्तव त्यांचे सामने हे भारत सोडून इतर ठिकाणी हलवण्याची मागणी केली होती. टी २० वर्ल्डकपमध्ये पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत खेळवण्यात आले होते.

आता याच धरतीवर फिफा वर्ल्डकपमध्ये देखील मागणी होत आहे. सध्या अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू आहे. त्यातच ११ जूनपासून फिफा वर्ल्डकप होत आहे.

## दिव्यांग क्रिकेट स्पर्धेत जय अंबेला जेतेपद

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई क्रिकेट असोसिएशन फॉर डिसेबल यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे पार पडलेल्या एलआयसी पुरस्कृत आंतर मुंबई दिव्यांग क्रिकेट स्पर्धेत जय अंबे संघाने थरारक विजयासह जेतेपद पटकावले.

स्पर्धेत ठाणे इलेव्हन, बोरिवली इलेव्हन, जय अंबे, पालघर इलेव्हन, नवी मुंबई आणि कुलाबा इलेव्हन या सहा संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामन्यात ठाणे इलेव्हनने प्रथम फलंदाजी करत १२७ धावा उभारल्या. प्रत्युत्तरादाखल जय अंबेने धडाकेबाज खेळ करत जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या स्पर्धेत प्रसाद चव्हाणला मालिकावीर व सामनावीर, तर विजय सरोजला उत्कृष्ट फलंदाज, अजय म्हात्रेला उत्कृष्ट गोलंदाज, तर दयानंदला उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेचे बक्षीस वितरण अनिल जोगळेकर, रेखा वाडेकर, विजय येवलेकर, महेश शेट्ये, दिनेश पाटील, प्रीती पोतदार, भाग्यश्री वर्तक, अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत झाले. याप्रसंगी पुरुषोत्तम जाधव, सूर्यकांत लाडे, विलास मोरे, मोहन पाटील, रवी पडवळ, बाबाराव धोत्रे, राजन भरताव, सचिन गायकवाड, राजेश सुर्वे उपस्थित होते.

## कांथीचा ५५० किमी सायकल प्रवास

**| मुंबई | प्रतिनिधी |**

अल्ट्रा डिस्टन्स सायकलिस्ट कांथी दत्त यांनी हैदराबाद ते मुंबई या ७५० किलोमीटर सायकल मोहिमेतील ५५० किलोमीटरचा महत्त्वाचा टप्पा पुण्यात पूर्ण केला. फिनिक्स मार्केटसिटी येथे आयोजित विशेष कार्यक्रमात धावपटू, सायकलिंगप्रेमी आणि फिटनेसप्रेमी सहभागी झाले होते. स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने राबवण्यात येत असलेल्या या सात दिवसांच्या मोहिमेचा उद्देश समुदायाभिमुख फिटनेसला प्रोत्साहन देणे हा आहे. या मोहिमेद्वारे द फिअर प्रोजेक्ट या उपक्रमाचीही सुरुवात करण्यात आली आहे.

## युद्धामुळे एफ१ रेस रद्द

**| दुबई | वृत्तसंस्था |**

आखाती देशांमध्ये परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. याचा परिणाम तिथल्या देशांमधील जनजीवन विस्कळीत होण्यावर झाला आहे. आता तर जगप्रसिद्ध F१ कार रेस देखील रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मध्यपूर्वेतील इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या युद्धामुळे जागतिक क्रीडा विश्वावरही त्याचे गडद सावट पसरले आहे. एप्रिल महिन्यात होणाऱ्या फॉर्म्युला वनच्या बहरीन ग्रँड प्रिक्स आणि सौदी अरेबिया ग्रैंड प्रिक्स या दोन महत्त्वाच्या शर्यती सुरक्षेच्या कारणास्तव



रद्द करण्यात आल्याची अधिकृत घोषणा शनिवारी रात्री करण्यात आली.

या निर्णयामुळे २०२६ चे एफ-१ कॅलेंडर आता २४ ऐवजी २२ शर्यतींचे होणार आहे. इराणने बहरीन आणि सौदी अरेबियातील काही भागांना लक्ष केल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. बहरीनमध्ये अमेरिकेच्या पाचव्या नौदलाचे मुख्यालय असल्याने ते थेट इराणच्या रडारवर आहे.

## हनुमान स्पोर्ट्स क्लब सोनघर प्रथम मानकरी

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड तालुक्यातील कला, क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या ओम गणेश सेवा मंडळ खुटील मुळगांव ग्रामस्थ मुंबई पुणे यांच्या सहकार्याने ओम गणेश युवा मंडळ व श्री जननी सोमजाई फायटर्स खुटील मुळगांव यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित श्री जननी सोमजाई चषक स्पर्धेत तालुका महाड ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे २४ नोंदनीकृत क्रिकेट संघ या स्पर्धेत खेळले, क्रिकेटप्रेमींमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

यंदाचे जननी सोमजाई चषकाचे तिसरे वर्ष होते, संपूर्ण



स्पर्धेदरम्यान झालेल्या सर्व सामने अत्यंत रोमहर्षक ठरले, अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळ करत हनुमान स्पोर्ट्स क्लब सोनघर या संघाने विजेतेपद पटकावले तर श्रीराम मंदिर ट्रस्ट जगदंब खुटील रामवाडी संघाने उपविजेता ठरला, तसेच जननी सोमजाई क्रिकेट क्लब खुटील यांनी तृतीय क्रमांक कोरले तसेच या स्पर्धेचा उत्कृष्ट फलंदाज नितेश सुकूम ठरला तर उत्कृष्ट गोलंदाज जयेश भुवड तर मालिकावीर विकास भुवड यांनी किताब पटकवला. या स्पर्धेचे सुंदर समालोचन हरेश गोलांबरे, अनिकेत मोरे यांनी खेळाडूंना प्रोत्साहीत केले तर पंच म्हणून सुनिल देवळे, रुपेश भुवड, सागर होडबे, विनायक खेरटकर, स्कोरिंग म्हणून चेतन अगबुल यांनी जबाबदारी घेत ग्रामीण भागातील खेळाडूना प्रोत्साहित केले.

## चिन्नास्वामी स्टेडियमला हिरवा कंदील

**| बंगळुरू | वृत्तसंस्था |**

बंगळुरूतील एम. चिन्नास्वामी स्टेडियमला अखेर इंडियन प्रीमियर लीगच्या यंदाच्या हंगामातील सामन्यांचे आयोजन करण्याची परवानगी मिळाली आहे.

कर्नाटक राज्य शासनाने सोमवारी कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेसह केलेल्या बैठकीनंतर याविषयी घोषणा केली. त्यामुळे बंगळुरू येथे पाच साखळी सामन्यांसह बाद फेरीतील दोन सामन्यांचे आयोजनदेखील केले जाणार आहे, असे समजते. आता सर्वांना आयपीएलच्या १९व्या हंगामाचे वेध लागले आहेत. २८ मार्चपासून आयपीएलचा १९वा



हंगाम सुरू होईल. या स्टेडियमवर बंदी घालण्यात आली होती. कारण येथील प्रेक्षकक्षमता झेलण्याइतपत कर्नाटक पोलिसांनी असहकार्य दर्शवले होते. आता वर्षभराने अखेरीस चिन्नास्वामीवरील बंदी उठवण्यात आली आहे. प्रथेप्रमाणे गतविजेता संघ पुढील हंगामात स्पर्धेचा पहिला सामना तसेच अंतिम सामन्याचे आयोजन करतो. त्यामुळे बंगळुरू येथे सलामीचा तसेच महाअंतिम मुकाबला रंगू शकतो. बंगळुरूचा संघ त्यांचे घरातील पाच सामने चिन्नास्वामीत, तर अन्य दोन लढती रायपूर येथे खेळणार आहे.

## मल्लखांबाचे प्रात्यक्षिक

**| मुंबई | प्रतिनिधी |**

ड्गगिरणगाव सांस्कृतिक प्रतिष्ठानफच्या वतीने हिंदू नववर्षाच्या निमित्ताने परळ ते लालबाग येथे भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य शोभायात्रेत मर्दानी खेळ, मल्लखांबाचे प्रात्यक्षिक आकर्षण ठरले. शिवशंभो क्रिएशनतर्फे ऐतिहासिक संदर्भांवर आधारित श्री शिवराज्याभिषेकाचे थ्रीडी शिल्प, दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे विविध गड-दुर्गांच्या प्रतिकृती, महिला संस्थांकडून मर्दानी खेळ व मल्लखांबाचे प्रात्यक्षिक सादर केले गेले.



## कुंडलिका खाडीत होड्यांच्या शर्यतीचा थरार

- **आग्रावची हिरावती प्रथम, हिरकणी व्दितीय,**
- **कोर्लईची मलावती-तृतीय व पद्मावती चतुर्थ**

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

प्रतिवर्षा प्रमाणे एकविरा मातेचा नारळाची ओटी भरण्याचा निमित्ताने आयोजीत पारंपरीक शिडवाल्या होड्यांचा शर्यतीचा थरार कुंडलिका समुद्र खाडीत असंख्य इंजिन होड्यांच्या जत्रौत्सवाने संपन्न झाला. या स्पर्धेत आग्राव येथील गुरूदास कामत यांची हिरावती शिडवाल्या होंडीने प्रथम क्रमांक तर आग्राव मधील हरिश्चंद्र शेट्टी यांच्या हिरकणी शिडवाल्या होंडीने व्दितीय क्रमांक पटकाविला. तर कोर्लईमधील कमलावती शिडवाली होडी तृतीय व पद्मावती शिडवाली होडी चतुर्थ क्रमांकाची मानकरी ठरल्या.

गुढी पाडव्याचे दुसऱ्या दिवशी प्रतिवर्षा प्रमाणे आग्राव दर्यातरंग मित्रमंडळ पुर्वापाडा आयोजीत शिडवाल्या होड्यांच्या जंगी शर्यतीचा थरार आग्राव जेटी येथून दुपारी बारा वाजता सुरू झाला. यावर्षी एकूण आठ शिडवाल्या होंड्यानी स्पर्धेत सहभाग घेतला होता, तर सोबतीला असंख्य इंजिन होंड्या स्थानिक कोळी बांधव व भगिनीसह पै-पाहुण्यांसह कुंडलिका समुद्र खाडीत होत्या, जणुकाही इंजिन होंडयाचा जत्रौत्सव कुंडलिका समुद्रखाडीत साकारला होता.

या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे शिडवाली होंडीस १ लाख रूपये व भव्य चषक, द्वितीय क्रमांकास रूपये ५५ हजार व भव्य चषक, तृतीय क्रमांकास ३५ हजार रूपये व भव्य चषक तर चतुर्थ क्रमांकास उत्तेजनार्थ बक्षिसे मान्यवरांचे हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत हिरकणी, हिरावती, वसुंधरा, कमलावती, पद्मावती, लक्ष्मी, जयवंती, व महालक्ष्मी या शिडवाल्या होंड्यानी सहभाग घेतला होता. तर मोठया संख्येने इंजिन होड्यांनी कुंडलिका समुद्र खाडी गजबजून गेली होती.

## माऊली जमदाडेचे आव्हान संपुष्टात | सिकंदर शेख, शिवराज राक्षेकडे लक्ष

# महाराष्ट्र केसरीत महेंद्र, बाळूची विजयी सलामी

**| वाघोली | प्रतिनिधी |**

६८ व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धेत गुरुवारी नेत्रदीपक लढती झाल्या. बाहुबली अशी ओळख असलेल्या महेंद्र गायकवाड, अहिल्यानगरच्या सुदर्शन कोतकरने नेत्रदीपक विजय मिळवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. बाळू बोडकेने माऊली जमदाडे याचा पराभव केला.

महाराष्ट्र केसरी गटातील पहिल्या फेरीतील या लढती उत्कंठावर्धक झाल्या. महेंद्र गायकवाड (सोलापूर) विरुद्ध विशाल बनकर (सोलापूर) यांची पहिली लढत झाली. सुरुवातीलाच महेंद्रने आक्रमक खेळ करीत एकेरी



पटाची पकड करीत दोन गुणांची कमाई केली. प्रारंभी दोघांमध्ये खडाखडी होती. विशाल टांग डावात पटाईत आहे. पहिल्या फेरीअखेर ०-२ असा गुणफलक होता. महेंद्रने दोन गुणांची आघाडी घेतली होती. त्याने हप्ता डाव टाकून ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. यात दोन गुण घेतले; मात्र या झटापटीत महेंद्रच्या डोळ्यात माती गेल्याने रक्तस्राव झाला, त्यामुळे डॉक्टरांना मैदानात पाचारण करावे लागले. विशाल आक्रमक झाला; परंतु महेंद्रने पुन्हा ताबा मिळवत दोन गुण घेतले. त्यामुळे महेंद्रकडे सहा गुणांची भरभक्कम आघाडी झाली. महेंद्रच्या नकारात्मक कुस्तीचा विशालला एक गुण बहाल करण्यात आला. त्यामुळे या कुस्तीत महेंद्रने पाच विरुद्ध एक असा एकतर्फी विजय मिळवत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. दुसरी लढत ज्ञानेश्वर जमदाडे (अमरावती) विरुद्ध बाळू बोडके (नाशिक) यांच्यात झाली. त्यात भारंदाज डावाने जमदाडे याने चार गुण घेतले. त्या अगोदर बाळूने दोन गुण घेतले होते. पुन्हा जमदाडेने एक गुण घेतला. बाळूने चपळाईने आक्रमक होत दोन गुण घेतले; मात्र त्याला चॅलेंज झाले; मात्र ते फेटाळले गेले. त्यामुळे आणखी गुण बहाल केला. परिणामी, त्यांच्यात बरोबरी झाली. बाळूने आक्रमण चालूच ठेवले. स्टेपआऊट झाल्याने बाळूला गुण मिळाला. माउली पाच विरुद्ध सहा असा पिछाडीवर पडला. बाळूने ताबा मिळवत दोन गुण घेत आठ गुणांची निर्णायक आघाडी घेतली. माउली आक्रमक होत पटाला गेला; मात्र त्याचे आक्रमण धुडकावून बाळूने ताबा मिळवत दोन गुण घेतले. एकंदरीत दहा गुण घेत विजय मिळवला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुला९बा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)